म. ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र.

३१

IRBK-0112810
IRBK-0112810

दी क्र. ७२८७०
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
अनुक्रम ७१४५९ वि क्र.वा.
क्रमांक ३८३० नोंद दि. ३१.३.

शीलसंवर्धक माला : पुष्प दहावे

# कर्मकुशलांच्या कथा

लेखक
श्री. ह. भा. वाघोलीकर, एम्. ए., बी. टी.,
उपमुख्याध्यापक, राजा धनराज गिरजी
हायस्कूल, पुणे २.

प्रस्तावना
श्री. प्र. शं. जोशी, एम्. ए., बी. टी.,
काव्यतीर्थ, काव्यविनोद, जगन्नाथ शंकरशेट
शिष्यवृत्तीचे मानकरी, अखिल भारतीय संस्कृत
पाठ्यपुस्तक स्पर्धेतील पहिल्या क्रमाङ्काच्या
'संस्कृत-विहार'चे लेखक, मुख्याध्यापक,
न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग, पुणे ३०

IRBK-0112810

१ रुपये व पन्नास पैसे

प्रकाशक :
न. शं. कुलकर्णी,
जयन्त आणि कंपनी,
स. नं. ७२०चा २०,
नवी पेठ, पुणे ३०.

☆ ☆ ☆

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन
प्रथमावृत्ति : सन १९६९

☆ ☆ ☆

अन्तर्गत चित्रे : श्री. म. वि. सोवनी
कव्हर चित्र : श्री. म. वि. सोवनी

☆ ☆ ☆

शुक्रवार, दिनांक : २५ जुलै १९६९
शयनी एकादशी : शके १८९१

☆ ☆ ☆

मुद्रक:
न. शं. कुलकर्णी,
टीचर्स प्रिंटिंग प्रेस,
स. नं. ७२०चा २०,
नवी पेठ, पुणे ३०.

# प्रस्तावना

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारताची सार्वांगिण प्रगती झपाट्याने होईल, असा विश्वास अनेकांनी व्यक्त केला. एकसंध भारत निदान आशियातील उदयोन्मुख राष्ट्रांचे नेतृत्व करील अशी अपेक्षा असणे हेही स्वाभाविक होते. आपण स्वतंत्र होऊन आज दोन तपे होत आली आहेत; पण स्वतंत्र भारताची स्वप्ने अजून अपेक्षेप्रमाणे साकारलेली दिसत नाहीत; याची जी अनेक कारणे आहेत, त्यांपैकी एक प्रमुख कारण म्हणजे ज्ञानगंगेचा लाभ खेड्यापाड्यात घरोघरी वायकामुलांपर्यंत पोचविण्याची अवघड कामगिरी अजून आपल्याला पार पाडता आली नाही. शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होत आहे. खेड्यापाड्यातून नवीन शाळा-प्रशाळा निघत आहेत; पण हे प्रयत्न अगदी तोकडे आहेत आणि ' नव्या पिढीची सार्वांगिण उन्नती ' हे शिक्षणाचे ध्येय सरकारी यंत्रणेलाहि अजून साधता आले नाही.

आजच्या शिक्षण-व्यवस्थेत नेमलेल्या विषयांची प्राथमिक माहिती करून देण्यापलीकडे फारसा भर नसतो. शरीर, बुद्धी आणि मन ह्या तिन्ही घटकांचा समतोल उत्कर्ष साधल्याशिवाय मनुष्याची सार्वांगिण उन्नती होणार नाही.

आजच्या शिक्षणव्यवस्थेत बुद्धीला काही प्रमाणात खाद्य पुरवता येत असले तरी विद्यार्थ्यांच्या शरीरसंवर्धनासाठी पुरेसे प्रयत्न होत नाहीत. विद्यार्थ्याच्या मनाचा विकास घडवून आणणे, त्याचे मन सुसंस्कृत करणे, हे शिक्षणाचे खरे ध्येय आज बाजूला पडले आहे. म्हणूनच स्वराज्य मिळूनही त्याचे सुराज्य करण्याची स्वप्ने साकार होत नाहीत. आजच्या शिक्षणव्यवस्थेत काहीतरी क्रान्तिकारक बदल झाल्याशिवाय शरीर, बुद्धी आणि मन ह्या तिन्ही अंगांनी विद्यार्थ्यांची उन्नती घडविणे शक्य दिसत नाही. त्यासाठी समाजातील तळमळीच्या कार्यकर्त्यांनी पुढे येऊन यथाशक्ति प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे.

जातिवंत शिक्षकाची या दिशेने धडपड चालू असते. त्याचे प्रत्यंतर म्हणजे, मेसर्स जयंत आणि कंपनीचे श्री. न. शं. कुलकर्णी यांनी विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन सुरू केलेली प्रकाशनसंस्था हे होय.

बाल-मन अत्यंत संस्कारक्षम असते. जिज्ञासा ही त्याच्या ठिकाणी असलेली एक प्रबळ अशी स्वाभाविक प्रवृत्ति असते. रुक्ष वास्तवापेक्षा कल्पनारम्य अद्‌भुताकडे बाल-मनाचा नैसर्गिक ओढा असतो. शिक्षकी पेशात डोळसपणे वावरणाऱ्या व्यक्तींना बाल-मनाचे हे दर्शन प्रत्यही घडत असते.

> श्री. न. शं. कुलकर्णी यांनी ह्या गोष्टींचा तरुण पिढीचे मन सुसंस्कृत करण्याच्या दृष्टीने पुरेपूर फायदा उठविण्याचे कौशल्य दाखविले आहे. त्यांनी विद्यार्थ्यांची मने जाणणाऱ्या शिक्षकांकडून ती मने सुसंस्कृत करण्यासाठी पौराणिक, ऐतिहासिक आणि वर्तमानकालीन मोठ्या व्यक्तींच्या चरित्रातून निवडक प्रसंग रंगवून घेतले आहेत. ते प्रसग प्रत्यक्षातले असूनही काल्पनिक घटनांपेक्षा अद्‌भुत-रम्य वाटतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना ते आवडतात.

शीलसंवर्धकमालेतील आतापर्यंत प्रकाशित झालेल्या नऊ पुस्तकात वेगवेगळ्या क्षेत्रात आदर्शभूत ठरलेल्या व्यक्तींच्या जीवनांतील निःस्पृहपणा, शीलाचे रक्षण, सत्य, विनय, साहस, उद्योग, सेवा, क्षमा, प्रयत्न या सारख्या गुणांचा ठसा बाल-मनावर प्रभावीपणे उमटविण्याचा प्रयत्न श्री. ह. भा. वाघोलीकर यांनीं यशस्वीपणे केला आहे. या मालेतील दहाव्या पुस्तकात 'योगः कर्मसु कौशलम्' या गुणाचे दर्शन घडविले आहे.

'कर्मकुशलांच्या कथा' ह्या पुस्तकात पुराण कालीन योगेश्वर श्रीकृष्णाच्या जीवनातील प्रसंगावर आधारीत अशी एक कथा, पेशवेकालीन व्यक्तींच्या जीवनावर आधारलेल्या दोन कथा आणि विसाव्या शतकातील दोन थोर व्यक्तींच्याजीवनावर आधारलेल्या दोन कथा अशा एकूण पाच कथा आहेत.

कथेसाठी निवडलेल्या व्यक्तींचा जीवन-परिचय अपेक्षित नाही. त्या त्या व्यक्तींच्या ठिकाणी दिसून येणारी कर्मकुशलता-चतुराईने कार्य साधण्याची हातोटी—ज्या प्रसंगातून व्यक्त होते, ते ते प्रसंग कथांतून गुंफले आहेत. भीष्माचार्य, द्रोणाचार्य, आणि कर्ण ह्या तिन्ही सेनापतींनी पराक्रमी पांडवांनाही 'दे माय धरणी ठाय'

करून सोडले होते; पण श्रीकृष्णांनी त्या त्या प्रसंगी युक्ती योजून चतुराईने कार्यभाग साधला. दुर्योधन आणि धृतराष्ट्र यांचे डाव कृष्णानेच कौशल्याने त्यांच्यावर उलटविले. हे पाच प्रसंग योगेश्वर श्रीकृष्ण ह्या पहिल्या कथेत परिणामकारकरीत्या चितारले आहेत.

स्वराज्याचे खरे वारसदार शाहूमहाराज दिल्लीश्वराच्या तावडीतून मुक्त होऊन दक्षिणेत येत असताना 'तोतया' म्हणून त्यांची ससेहोलपट करण्याचा डाव रचला जात होता. अशा प्रतिकूल परिस्थितीत बाळाजी विश्वनाथांनी–धनाजी जाधवांच्या पदरी असलेल्या एका कारभाऱ्याने-आपल्या चतुराईने शाहू महाराजांच्या पाठीशी मोठमोठे सरदार कसे उभे केले आणि सय्यद बंधूंना हाताशी धरून दिल्लीच्या तख्तावरही आपली पकड कशी बसविली हे काही निवडक प्रसंगांतून 'पहिला पेशवा' या कथेत दाखवून दिले आहे.

पेशवाईच्या पडत्या काळात बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणीस यांनी विशीच्या घरात असतानाच आपल्या बुद्धि-चातुर्याने राघोबा-सारख्या घरभेद्या राजकारणी पेशव्यांनाही कसे पाणी पाजले आणि निजामाला व इंग्रजांना कसे खडे चारले ते 'चतुर नाना' ह्या कथेत पाहायला मिळते.

लहानपणासूनच समाजसुधारणेचे धडे जनतेला देणाऱ्या रांगड्या भाऊने मॅट्रिक नसतानाही पुढे पुणे विद्यापीठाची डी. लिट्. पदवी मिळविण्याची किमया कशी केली ते 'कर्मवीर भाऊराव पाटील' ह्या कथेत उद्बोधक रीतीने निवडक प्रसंगातून दाखविले आहे.

बालपणापासूनच विरक्त आणि सेवाधर्मी असलेल्या विनायकाने महात्माजींचे शिष्यत्व स्वीकारून जमीनदारांकडून तेहेतीस लाख एकरांपेक्षा अधिक जमीन भूमिहीनांना चतुराईने मिळवून देण्याची अद्भुत कामगिरी कशी पार पाडली ते 'आचार्य विनोबा भावे' या कथेतून स्पष्ट होते.

श्री. वाघोलीकरांनी निवडलेल्या कथा आणि त्यात रंगवलेले प्रसंग त्यांच्या आकर्षक लेखनशैलीमुळे रजक झाले आहेत. कथांची भाषा सोपी नि प्रवाही आहे. निरनिराळ्या प्रसंगांतून योगः कर्मसु कौशलम्, ही

कल्पना प्रभावीपणे मांडली आहे. विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या मनावर सुसंस्कार घडविण्याचे उद्दिष्ट शीलसंवर्धक मालेतील या पुस्तकांच्या द्वारे साध्य होण्याला मदत होईल, यात तिळमात्र शंका नाही.

नव्या पिढीला साक्षर नि शिक्षित करण्याचे कार्य शिक्षण-व्यवस्थेतून मोठ्या प्रमाणात होत आहे; पण नवी पिढी सुशिक्षित आणि सुसंस्कृत घडविण्याचे उदिष्ट प्रचलित शिक्षण-व्यवस्थेला अजून साध्य करून घेता आलेले नाही. नवी पिढी सुशिक्षित नि सुसंस्कृत बनावी अशी आंतरिक प्रेरणा असलेल्या श्री. न. शं. कुलकर्णी यांना शिक्षकीपेशा सोडून स्वतंत्र प्रयत्न करण्याची निकड भासली. प्रचलित बहुसंख्य प्रकाशन-संस्थांची व्यावहारिक दृष्टी बाजूला ठेवून यथाशक्ति नवी पिढी घडविण्यासाठी त्यांनी आपली स्वतःची प्रकाशन-संस्थेची यंत्रणा उभी केली.

शिक्षकपेशात वावरणारे नि संस्कारक्षम मनावर संस्कार घडवू शकणारे लेखक त्यांनीं प्रयत्नपूर्वक मिळविले. चालू शिक्षण-व्यवस्थेतील मन सुसंस्कृत करण्याचे मुख्य उद्दिष्ट आपल्या प्रयत्नांनी अंशतः का होईना साध्य करावे हे त्यांचे ध्येय आहे. स्वराज्याचे सुराज्य करायचे असेल तर केवळ सत्तेच्या जोरावर ते करता येत नाही. त्यासाठी भावी पिढी सुशिक्षित नि सुसंस्कृत करायला हवी.

स्वतंत्र भारताची स्वप्ने साकार व्हायची असल्यास मनाच्या क्षेत्रात हळुवार हाताने सद्‌गुणांच्या बीजांची पेरणी करायला हवी. दुर्गुणांची, वाईट विचारांची तणे निपटून काढली पाहिजेत. ते सद्‌गुण रुजण्यासाठी नि फोफावण्यासाठी ज्ञानगंगेचे पाणी शिंपायला हवे.

आपल्या प्रकाशन-संस्थेच्या मदतीने ही ज्ञानगंगा खेडोपाडी लहानथोरापर्यंत पोचविण्याचे मोठे अवघड काम श्री. कुलकर्णी यांनी हाती घेतले आहे. चतुराईने आपले उद्दिष्ट साध्य करण्यात 'योगः कर्मसु कौशलम्' या तत्त्वाचेच ते आचरण करीत आहेत. हे त्यांचे प्रयत्न मोठ्या प्रमाणांत यशस्वी होवोत, हीच परमेश्वराच्या चरणी प्रार्थना.

रमणबाग, पुणे ३०<br>
दिनांक . २४-७-१९६९

— प्र. शं. जोशी

# कथा-लेखकाचे निवेदन

**'योगः कर्मसु कौशलम्।'** म्हणजे 'कर्मातील कुशलता हाच योग.' हे तत्त्व विशद करणाऱ्या ह्या कर्मकुशलांच्या कथा मी मोठ्या आनंदाने माझ्या कुमारमित्रांच्या हातात देत आहे. 'शीलसंवर्धक माले'चे हे दहावे पुष्प आहे कुमारांनी नऊ पुष्पांचे सहर्ष स्वागत केले. हे दहावे पुष्पही त्यांना तितकेच स्वागतार्ह वाटेल असा विश्वास वाटतो.

**भगवान् श्रीकृष्णांनी जो कर्ममार्ग सांगितला, तोच मानवी-जीवनातला सर्वश्रेष्ठ मार्ग आहे. ह्या मार्गाची यशस्वी वाटचाल करणाऱ्या थोर पुरुषांच्या कथा सांगण्याचा हेतू एवढाच की कुमारांनी त्यांच्याप्रमाणे कर्मकुशल होण्याचा प्रयत्न करावा.**

ह्या हेतूने मी पहिली कथा जी सांगितली आहे, ती ह्या कर्म-योगाचा मार्ग सांगणाऱ्या भगवन्ताचीच. दुष्टांचे पारिपत्य आणि सज्जनांचे रक्षण हे भगवन्ताचे स्वीकृत कार्य होते. पाण्डवांना निमित्तमात्र करून भगवन्तांनी आपले कार्य फार कुशलतेने केले. खरे पाहिले असतां भीष्म, द्रोण, कर्ण, दुर्योधन हे सर्व कौरववीर पराक्रमाच्या बाबतीत पांडवांच्यापेक्षा कांकणभर सरसच; पण श्रीकृष्ण-कुशलतेमुळेच पांडव विजयी झाले. पांडवांचा सत्पक्ष होता तरी तो श्रीकृष्ण सहाय्यामुळेच यशस्वी झाला.

हीच गोष्ट शांतवृत्ती शाहूमहाराजांची. सारे मातबर सरदार ताराबाईच्या पक्षाला होते. त्यामुळे दिल्लीश्वराने मुक्त केलेल्या शाहूमहाराजांना परत दिल्लीश्वराकडेच जावयाचा प्रसंग निश्चित् यावयाचा. पण तो आला नाही बाळाजी विश्वनाथांच्या कुशलते-मुळे. ज्यांना राज्य खरोखर मिळविण्याचेही सामर्थ्य नव्हते, ते डगमगत्या मोगलबादशाहीला आधार देण्याइतके समर्थ झाले— बाळाजी विश्वनाथांच्या कर्मकुशलतेमुळे.

हीच कर्मकुशलता नानांच्या अंगी होती. त्यांनी मराठेशाहीच्या अखेरच्या दिवसात घरातल्या आणि बाहेरच्या शत्रूपासून मराठे-शाहीचे रक्षण केले. स्वतः शस्त्रधारी नसता शस्त्रधारींना हाताशी धरून त्यांनी दौलत सांभाळली. त्यांची ही कर्मकुशलता पाहून इंग्रजांनी पुण्यात प्रवेश करण्याचा विचार सोडून दिला होता.

कर्मवीर भाऊराव पाटील ह्यांनी बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करण्याचे कंकण बांधले होते. त्यांच्या प्रचण्ड कार्याला खरोखर कोठेच तोड नाही.

कर्मवीर भाऊरावांचे ज्ञानदान हे कार्य आणि विनोबाजींचे भूदान हे कार्य, हे तर अर्वाचीन महाराष्ट्राच्या इतिहासातले अद्‌भुत चमत्कारच म्हणावयास हवेत. ही सर्व ह्या थोर पुरुषांच्या कर्म-कुशलतेची किमया आहे.

ह्या थोर पुरुषांची कर्मकुशलता चित्रकार श्री. सोवनी ह्यांनी चित्रांकित केली आणि कुमारांपुढे ठेवली; त्यामुळे कुमारांच्या मनावर ह्या कर्मवीरांच्या कर्मकुलतेचा जास्त स्पष्ट ठसा उमटू शकेल. तसेच आमच्या चर्चामंडळाने ज्या वेळोवेळी सूचना केल्या त्यांचा बहुमोल उपयोग झाला. ह्या सर्व माझ्या मित्रांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.


न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग पुणे ३० ह्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्र. शं. जोशी ह्यांनी आमच्या विनंतीला मान देऊन उद्‌बोधक प्रस्तावना लिहून दिली. त्यांचे आमच्यावर फार मोठे ऋण आहे.

ज्या ग्रंथांचा मागोवा घेत ह्या कथा मी सांगितल्या, त्या ग्रंथांचे ऋण मान्य करून आणि ज्यांच्या कर्मकुशतेमुळे ह्या कर्मकुशलांच्या कथा प्रकाशात आल्या, ते माझे प्रकाशक मित्र श्री. न. शं. कुलकर्णी ह्यांचे आभार मानून हे निवेदन मी संपवितो.

वेणु निवास २३०/६, शुक्रवार पेठ, पुणे २ दिनांक २५-७-१९६१ — लेखक ह. भा. वाघोलीकर

अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| ※ योगेश्वर श्रीकृष्ण | ... | १– ३२ |
| ※ पहिला पेशवा | ... | ३३– ५६ |
| ※ चतुर नाना | ... | ५७– ७८ |
| ※ कर्मवीर भाऊराव पाटील | ... | ७९– ९४ |
| ※ विनोबा भावे | ... | ९५–११२ |




पुष्प दहावे योगः कर्मसु कौशलम् ।



न धरी शस्त्र करी। प्रतिज्ञा विसरला श्रीहरी ॥

ग्रा. क्र. १२६९० ...
दि. ...


जो रणांगणावर शत्रू म्हणून आपणासमोर उभा राहिला तो भाऊ असो, गुरू असो किंवा आजोबा असो त्याला शत्रूच समजून त्याचे पारिपत्य करावयास हवे, हे आपले कर्तव्य आज तो विसरला होता. उलट ह्या आप्तादिकांच्या रक्ताने माखलेले राज्योपभोग त्याज्य आहेत असे त्याला वाटू लागले होते. राज्यसुखाच्या लोभाने स्वजनांना मारण्याचे मोठे पाप करण्यास आपण तयार झालो आहोत, असा प्रज्ञावाद, तो सांगू लागला होता. तो कर्मच्युत होत होता. आपले कर्तव्य तो करीत नव्हता. त्याला कर्मप्रवृत्त करावयाचे होते. "कर्म करणे हा आपला अधिकार. कर्मफलाचा आपण विचार करावयाचा नाही." हे त्याला पटवून द्यावयाचे होते. हे कठिणकर्म श्रीकृष्णाला करावयाचे होते. त्याने ते मोठ्या कुशलतेने केलेही. त्याने अर्जुनाला सांगितले, "भीष्म-द्रोणांना तू मारणार म्हणजे तुझ्या हातून पाप होणार, असे तुला वाटते. पण हा तुझा भ्रम आहे. तू त्यांना मारू शकत नाहीस; कारण भीष्म-द्रोण म्हणजे त्यांची शरीरे नव्हेत त्यांचे आत्मे. आत्मा अमर आहे. त्यांच्या शरीराच्या नाशाला तू केवळ निमित्त मात्र आहेस कारण ती शरीरे नाशवंतच आहेत."

हे श्रीकृष्णाचे अमृतबोल ऐकल्यानंतर अर्जुन त्याला शरण गेला आणि "मला खरा मार्ग दाखव" अशी त्याने त्याला विनवणी केली. तेव्हां भक्तियोग, कर्मयोग आणि ज्ञानयोग श्रीकृष्णाने आपल्या शिष्योत्तमाला समजावून सांगितला. कर्माचे श्रेष्ठत्व त्याने त्याला पटवून दिले आणि

**'सर्व धर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।'**

सर्व धर्म टाकून मला शरण ये,

**'माम नुस्मर युद्ध्य च।'**

"मला स्मर आणि युद्ध कर."

असे अर्जुनाला सांगून आप्तादिकांच्या हत्त्यच्या भयाने हातातून खाली गळून पडलेले गांडीव धनुष्य त्याने त्याला उचलायला लावले. अर्जुनाच्या देवदत्त शंखाच्या गर्जनेने पुन्हा एकदा कुरुक्षेत्र दणाणून गेले, आणि कुरूंची हृदये धडधडू लागली कारण अर्जुन आपल्या रथामध्ये आपल्या जागी युद्धाच्या पवित्र्यात स्थानापन्न झाला होता.

ही श्रीकृष्णाची कर्मकुशलता. कर्मच्युत अर्जुनाला कर्मप्रवृत्त केले होते त्या अच्युताने.

## ' योगः कर्मसु कौशलम् । '

योग म्हणजे कर्मातील कौशल्य. तत्त्वज्ञानाची भाषा बोलून रणांगणाकडे पाठ फिरवू पहाणाऱ्या अर्जुनाला पुन्हा रणांगणाकडे वळविण्याचे कठिण कर्म श्रीकृष्णाने मोठ्या कुशलतेने केले होते. हाच त्याचा योग. आणि म्हणूनच तो योगेश्वर श्रीकृष्ण. त्याने अर्जुनाला सांगितले होते,

**' यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।**
**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।। '**

" हे भरतकुलोत्पन्न अर्जुना, जेव्हां जेव्हां धर्माची ग्लानी होते, धर्म नष्ट होऊ लागतो, आणि अधर्म वळावू लागतो तेव्हां मी जन्म घेतो. सज्जनांच्या संरक्षणाकरिता, दुर्जनांच्या नाशाकरिता व धर्माची संस्थापना करण्याकरिता मी प्रत्येक युगात जन्म घेतो."

सज्जनांचे संरक्षण करणे दुर्जनांचा नाश करणे आणि धर्माची संस्थापना करणे हे योगेश्वर श्रीकृष्णाने आपले कर्तव्य-कर्म मानले होते. ते त्याने कुशलतेने केले आणि करविले. कौरवांसारखे दुष्ट भूमीला भार झाले होते. त्यांच्यामुळे अधर्म वळावत होता आणि धर्म क्षीण

होऊ लागला होता. दुर्जन डोईजड झाले होते आणि सज्जनांना त्राता उरला नव्हता. आणि म्हणूनच अर्जुनाला निमित्त मात्र पुढे करून त्याने कौरवनाशाचा व्यूह रचिला होता. पण निमित्तमात्र पुढे केलेला तो अर्जुनच जेव्हां संभ्रमित होऊन शस्त्रे टाकून बसला, तेव्हां मोठी कठिण समस्या निर्माण झाली होती. भगवंताच्या कर्मयोगाच्या उपदेशाने ही समस्या सुटली आणि अर्जुनाने शस्त्र हाती धरिले. भारतीय युद्धाची सुरुवात झाली.

अर्जुनाचे सारथ्य भगवन्ताने केले होते. सर्वच बाबतीत तो विजयाचा म्हणजेच अर्जुनाचा मार्गदर्शक होता, सहाय्यक होता. नव्हे विजयाला मिळालेल्या विजयाचे कारणच तो परमेश्वर होता. हे पार्थ जाणत होता. यादवाधीशाचे श्रेष्ठत्व त्याला माहीत होते आणि म्हणूनच यादव सेनेऐवजी यादव राणा त्याने आपल्या सहाय्यास मागून घेतला होता. आता तो यादवाधीश ह्या कौंतेयाचे सारथ्य करीत होता. पांडवांचे सैन्य भीमरक्षित होते; तर कौरवांचे सैन्य भीष्मरक्षित होते. पितामह भीष्माचे तेज अर्जुनाला सहन होण्यासारखे नव्हते. कौरवांचा पहिलाच सेनापती महापराक्रमी होता. त्याच्यापासून अर्जुनाचे संरक्षण झाले नसते तर सज्जन रक्षणाचे कार्य झाले नसते आणि म्हणूनच भीष्म-तेजाची प्रखरता कमी करण्याचे श्रीकृष्णाने ठरविले.

दुसऱ्याच दिवशी अगदी भल्या पहाटे भीष्माचार्यांच्या शिबिरात द्रौपदीने प्रवेश केला. प्रात:संध्या नुकतीच संपली होती. सर्वेश्वराच्या प्रार्थनेसाठी मन एकाग्र होऊ लागले होते. नयन अर्धोन्मीलित होते. इतक्यात, " मामंजी, नमस्कार करते." असे म्हणून द्रौपदीने खाली वाकून नमस्कार केला. भीष्माचार्यांच्या मुखातून सहजच आशीर्वाद वाणी बाहेर पडली,

" अष्टपुत्रा सौभाग्यवती भव."

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय
अनुक्रम ............ वि...........
क्रमांक ............ नोंद दि.........

ही आशीर्वादवाणी ऐकताच वर झालेले द्रौपदीचे हसरे मुखकमल पहाताच भीष्माचार्यांना मनस्वी दु:ख झाले. ज्या पांडवांना यम-सदनास पाठविण्यास आपण सिद्ध झालो आहोत त्यांच्याच पत्नीला " सौभाग्यवती भव " असा आशीर्वाद आपण दिला. किती विलक्षण दैवदुर्विलास ! महापुरुषांचे शस्त्र जितके प्रभावी असते तितकेच त्यांचे शब्दही प्रभावी असतात. द्रौपदीकडे पहात भीष्माचार्यांनी विचारले, " तुझ्या बरोबर कोण आलं आहे ?"

" माझे जोडे राखणारा सेवक !" खाली पहात द्रौपदी म्हणाली.

" बहुतेक त्याचे नाव श्रीकृष्णच असेल !" भीष्माचार्य म्हणाले. द्रौपदी काहीच बोलली नाही. ती मुकाट्याने बाहेर पडली. तिच्या मागोमाग तिचे सौभाग्य राखणारा तिचा मानलेला भाऊ श्रीकृष्ण चालू लागला.

मनाने कच खाल्ली की पराक्रमाचा कणखरपणा थोडा कमीच होतो. तरीही भीष्म पराक्रमापुढे अर्जुन पराक्रम निस्तेज ठरू लागला. भीष्माचार्यांच्या शर वर्षावातून अर्जुनाला बाचवावे म्हणून श्रीकृष्णाने रथापुढे शिखण्डीला उभे राहण्यास सांगितले. अर्जुन शिखण्डीच्या आडून बाण सोडू लागला. भीष्माचार्यांनी मात्र शरसंधान थांबविले. शिखण्डी पुरुष नव्हता. त्याच्यावर बाण टाकण्याचे त्या पुरुषोत्तम भीष्माचार्यांनी नाकारले. अर्जुन बाण सोडत होता. भीष्माचार्य स्वस्थ होते. " हे एक-पक्षी युद्ध अधर्मयुद्ध आहे " असा एकच आरडाओरडा सगळीकडे झाला आणि मग अर्जुनाच्या रथापुढून शिखण्डी बाजूला झाला. अर्जुनाच्या बाणांचे स्वागत करायला भीष्माचार्यांचे बाण वेगाने सुटू लागले. भक्तसखा श्रीकृष्णाचे हृदय धडधडू लागले भक्ताच्या काळजीने. भीष्माचार्यांनी अत्यंत प्रभावी असे सर्पास्त्र अर्जुनावर सोडले. खाली मान करून डोळे झाकून भीष्माचार्यांनी धनुष्याची

प्रत्यंचा, दोरी कानापर्यंत ताणलेली पहाताच अर्जुनावर कोसळणारे संकट श्रीकृष्णाने ताबडतोब ओळखले. एका हाताने घोड्यांचे लगाम खेचून एका हाताने अर्जुनाला त्याने मागे खेचले. भीष्माचार्यांच्या धनुष्यातून सुटलेला बाण अर्जुनाच्या मुगुटाला स्पर्शून गेला. ज्या बाणाने अर्जुनाचे मस्तक धडावरून खाली उतरविले जावयाचे त्या बाणाने फक्त मुगुटच मस्तकावरून खाली उतरविला गेला कृष्ण कृपेमुळे. कंस वधानंतर "न धरी शस्त्र करी" अशी ज्याने प्रतिज्ञा केली होती. आणि "गोष्टी सांगेन युक्तीच्या चार।" असे ज्याचे धोरण ठरून गेले होते त्या श्रीकृष्णाने आपले धोरणही सोडले आणि प्रतिज्ञाही मोडली, आवडत्या भक्तासाठी, अर्जुनासाठी, भीष्माचार्यांच्या पराक्रमापुढे अर्जुन वाचणे अशक्य असे दिसताच श्रीकृष्णाने रथावरून खाली उडी घेतली. सुदर्शन चक्र गरगरू लागले. श्रीकृष्णच्या हातातून सुटलेले चक्र भीष्माचार्यांच्या छातीवर आदळले. . . कौरवांचा पहिला सेनापती गतप्राण झाला. योगेश्वर श्रीकृष्णाच्या कर्मकुशलतेमुळे.

ज्यांनी कौरवपांडवांना धनुर्विद्या शिकविली ते कौरवपांडवांचे गुरु द्रोणाचार्य आता कौरवांचे सेनापती म्हणून रणांगणावर आले. पितामहांशी सामना झाला. आता गुरुवर्यांशी दोन हात सुरू झाले. विचारांच्या चक्रव्यूहातून श्रीकृष्णाने सोडविले होते.आता आचार्यांनी सैन्याचा चक्रव्यूह रचिला होता आणि अर्जुनपुत्र अभिमन्यू त्याचा भेद करता करता वीरगती पावला होता. आचार्यांचा पराभव अर्जुन करू शकणार नाही अशी लक्षणे दिसू लागली. आणि मग अभिमन्यूची जी स्थिती झाली तीच अर्जुनाची होणार. पांडवांचा विनाश होणार. दुष्ट कौरवांचा जय होणार. दुर्जन उन्मत्त होणार. छे ! छे ! असे होऊन कसे चालेल ? कसे चालेल ? विचारांनी त्रस्त झालेले मस्तक दोन्ही हातात धरून भगवान श्रीकृष्ण आपल्या शिबिराबाहेर बसला होता. इतक्यात–

" अश्वत्थामा मेला ! अश्वत्थामा मेला ! " अशी एकच आरोळी श्रीकृष्णाच्या कानावर आली. काही सैनिक चालले होते. ते आपसात मोठ्याने बोलत होते. "अश्वत्थामा मेला म्हणतात." आणि ह्या शब्दांनी गोंधळलेले श्रीकृष्ण-मन विचारमग्न झाले. आदल्या दिवशीच्या युद्धाच्या धुमश्चक्रीमध्ये अनेक शस्त्रास्त्रांच्या खणखणाटात ही आरोळी श्रीकृष्णाने ऐकली होती. आता तेच शब्द तो पुन्हा ऐकत होता. आता त्याला पक्के आठवले. अश्वत्थामा नावाचा हत्ती मरण पावला होता. पण त्या युद्धाच्या घाईगर्दीत मनुष्य का हत्ती ? हे कोण विचारणार आणि कोण सांगणार ? श्रीकृष्णाचे मन तर्क करू लागले–

"द्रोणाचार्यांच्याही कानांवर फक्त 'अश्वत्थामा मेला, अश्वत्थामा मेला " एवढेच शब्द गेले असणार ! ते बिचारे शंकाकुल झाले असतील. त्यांच्या मनाला वाटले असेल. . . माझा मुलगा तर मृत झाला नसेल ! आणि अशुभ शंका सहसा असत्य ठरत नाहीत. . . ते सत्य कोणाला विचारणार ? आणि सत्य त्यांना सांगणार तरी कोण ?. . ."

. . . आणि श्रीकृष्णाच्या विचाराची साखळी मधेच एकदम तुटली. सत्यप्रिय धर्मराजाची सोज्वळ मूर्ती त्याला आठवली. युद्धात सर्व गोष्टी क्षम्य असल्या तरी हा धर्मराज असत्य सांगणार नाही, हे निश्चित. असत्य-कथनाचे पाप करण्यापेक्षा सर्वनाशाचेही स्वागत करण्यास धर्मराजा तयार झाला असता, हे श्रीकृष्ण जसे जाणत होता तसे द्रोणाचार्यही जाणत होते. आणि म्हणूनच पुत्रमोहाने वेडेपिसे झालेले द्रोणाचार्य सत्य हकिगत कळण्यासाठी धर्मराजाकडे खात्रीने येणार हे श्रीकृष्ण ओळखून होता. विचाराची साखळी पुन्हा एकदा जोडली गेली. श्रीकृष्ण तसाच लगबगीने उठला. चपलतेने पुढे आलेल्या दासीने पुढे केलेला किरीट हातात घेऊन त्याने आपल्या मस्तकावर ठेवला आणि आपली पावले धर्मराजाच्या शिबिराकडे वळविली.

प्रातःस्मरणीय असे हे श्रीकृष्णचरण प्रातःकालीच आपल्या शिबिरात प्रवेश करताना पहाताच धर्मराजाला केवढा आनंद झाला. त्याने पुढे होऊन श्रीकृष्णाचे स्वागत केले. श्रीकृष्णाचा हात धरून त्याने त्याला उच्चासनावर बसविले. श्रीकृष्णाची पाद्यपूजा करून त्याने भक्तिभावाने श्रीकृष्णाला वंदन केले आणि म्हटले "आज प्रातःकालीच भक्ताची आठवण झाली."

"म्हटलं भक्ताला आठवण आहे की नाही, बघावं." श्रीकृष्ण हसत म्हणाला.

"भक्ताला देवाची आठवण नाही, असं कधी होईल देवा ?"

"देवाची नाही–"

"मग ?"

"युद्धाची !"

"म्हणजे ?" धर्मराजाने विचारले.

"नाही म्हणजे कौरव-पांडव युद्ध सुरू झालं आहे. पांडव विजयी व्हायचे म्हणजे मोठ्या सावधानतेने सारे डावपेच लढविले पाहिजेत." हे श्रीकृष्णाचे शब्द ऐकल्यावर धर्मराज म्हणाला, "देवा, पांडवांचे सर्वस्व तुम्हीच अहात."

"नुसत्या एवढ्या श्रद्धेने युद्धे जिंकली जात नाहीत, धर्मा..."

"आपण काय सांगाल ते हा दास करायला सिद्ध आहे."

"हे खरं ?"

"हो !"

"मग खोटं बोलायला तू तुझ्या मनाची तयारी करायला हवी."

"म्हणजे ?"

श्रीकृष्ण म्हणाला, "सांगतो.अश्वत्थामा मेला माहीत आहे तुला."

"हो ! अश्वत्थामा नावाचा हत्ती मेला."

" हे विसरायचं. आणि गुरुवर्य द्रोणाचार्यांचा अश्वत्थामा मरण पावला असं सांगायचं."

" कोणाला ?" धर्माने विचारले.

" गुरुवर्यांना !" श्रीकृष्ण गंभीर होऊन म्हणाला,

" गुरुवर्यांना निश्चित माहिती कळालेली नाही. कोणी–खरी गोष्ट सांगतील असा त्यांचा विश्वास नाही. विश्वास आहे तो तुझ्यावर."

" आणि मी विश्वास-घात करू ?" धर्माने विचारले.

" हो आत्मघात टाळण्यासाठी." श्रीकृष्ण म्हणाला,

" छे ! छे ! देवा कसं शक्य आहे हे ? धर्माने खोटं बोलण्याचा अधर्म कसा करावा ?"

" हा अधर्म नाही.... उलट सत्यधर्माचा टेंभा मिरवून तू सत्य निवेदन केलंस तर सर्वनाश ओढवून घेण्याचं पापच तुझ्या हातून होणार आहे."

" पण हे असत्यनिवेदनाचं पाप त्यापेक्षा भयंकर आहे."

" स्वजननाश करण्यास उद्युक्त झालेली तुझी ही आत्मप्रतिष्ठा त्यापेक्षाही भयंकर आहे," असे म्हणून श्रीकृष्ण रागाने उठला.

काकुळतीस येऊन धर्मराज म्हणाला, " देवा रागवू नकोस... पण...?"

" धर्मा, आता पण बीण काही नको..... द्रोणाचार्य तुझ्याकडे येतील... अश्वत्थामा म्हणजे त्यांचाच मुलगा मरण पावला अशी त्यांची समजूत झाली पाहिजे." असे श्रीकृष्ण म्हणाला तरीही धर्मराज अजिजीने म्हणालाच,

" पण देवा खोटे कसे बोलू ?"

" निदान खरं तरी सांगू नकोस." असे म्हणन श्रीकृष्ण शिबिरा-बाहेर पडला.

श्रीकृष्ण आपल्या शिबिरात गेला असेल नसेल तोच एका सेवकाचा आधार घेऊन खचलेल्या मनाचे आणि खचलेल्या शरीराचे द्रोणाचार्य धर्मराजाच्या शिबिराकडे आले. त्यांना सामोरे जाऊन धर्माने त्यांना आत आणून आसनावर बसविले. उतावळ्या मनाला इतका धीर कुठे उरला होता ? आसनावर बसता बसताच द्रोणाचार्यांनी विचारले, "धर्मा, अश्वत्थामा मरण पावला म्हणतात. खरं का ?"

"हो ! असं मीही ऐकलं..." धर्मराज चाचरत म्हणाला.

"काय ऐकलं ?" पुन्हा आचार्यांनी अधीर होऊन विचारले,

स्वत:ला सावरण्याचा शक्य तितका प्रयत्न करीत धर्मराज म्हणाला, "साऱ्या सैन्यात आवई उठली होती ... की ... अश्वत्थामा मरण पावला, अश्वत्थामा मरण पावला. पण अश्वत्थामा कोण, मनुष्य का हत्ती ? नरो वा कुंजरो वा ! काही कळलं नाही."

"तुला देखील काही निश्चित कळलं नाही ?" द्रोणाचार्यांनी शोकाकुल होऊन विचारले. आणि धर्मराजाचा 'नाही' एवढाच शब्द ऐकून खिन्नतेने ते जागचे उठले आणि अधिकच जड पावलांनी ते चालू लागले त्यांच्या मनाची शरीराची ती जडता त्यांच्या बरोबर आलेल्या त्या सेवकाला चांगलीच जाणवली. त्या सेवकाने त्यांना त्यांच्या शिबिराकडे नेले.

शिबिरापाशी आल्यानंतर आचार्य शिबिराबाहेरच विमनस्क मन:स्थितीत मस्तक धरून बसले. आत चलण्याविषयी त्या सेवकाने विनवणी करून पाहिली. त्याचा प्रयत्न सफल झाला नाही. आचार्यांच्या मनाला एकाच विषयाने अगदी भ्रमिष्ट करून टाकले. "अश्वत्थामा मरण पावला असं ऐकलं. पण कोण ? मनुष्य का हत्ती ? नरो वा कुंजरो वा ? काही कळलं नाही." हे धर्मराजाचे शब्द त्यांच्या मनात एकसारखे गरगरत होते आणि पुन्हा पुन्हा भेडसावून सांगत होते...

"अश्वत्थामा म्हणजे तुझा मुलगाच असणार. तुझा मुलगाच असणार." मस्तक तप्त झालं होतं. काही सहन होत नव्हतं. काही समजत नव्हतं. ते मस्तक तुटून पडेल तर बरे होईल असं वाटत होतं. आणि विधिलिखितही तसंच होतं. जिच्या मानलेल्या भावाने तिचे सौभाग्य राखण्यासाठी भीष्माचार्यांवर शस्त्र धरले होते तिच्याच सख्ख्या भावाने धृष्टद्युम्नाने आपल्या खड्गाने आचार्यांचे मस्तक धडावेगळे केले. पांडवांच्या सेनापतीकडून कौरवांचा सेनापती मारला गेला. जे शक्य नव्हते ते शक्य झाले. धर्माकडून आणि धृष्टद्युम्नाकडून. पण कर्ता करविता वेगळाच होता. योगेश्वर श्री कृष्ण. जो धर्म प्राण-त्याग करील पण सत्य-त्याग करणार नाही, त्याला सज्जनहितासाठी सत्य गुंडाळून ठेवायला लावले श्रीकृष्णाने. चक्रव्यूहाच्या रचनेने साऱ्या पांडवांना गोंधळात टाकणारे आचार्य गोंधळात पडले श्रीकृष्ण चातुर्यामुळे. आणि त्यांचा वध करणे सहज शक्य झाले धृष्टद्युम्नाला तेही कृष्ण कुशलतेमुळेच, हाच श्रीकृष्णाचा योग.

महारथी कर्णाच्या शिबिरात पाण्डवमाता कुंती आपला मातृत्वाचा अधिकार सांगायला आणि पुत्रप्राणांचे दान मागायला गेली तेही श्रीकृष्णाच्याच सांगण्यावरून. आचार्यांच्या निधनानंतर कौरवेश्वराने सेनापतिपदाची वस्त्रे महारथी कर्णाला दिली होती. पांडववधाची प्रतिज्ञा करून अंगराज कर्णाने कौरवेश्वराला सुखविले होते. त्याला मोठा धीर आला होता. कर्णपराक्रम श्रीकृष्ण जाणत होता. त्याच्यापासून पांडवांचे संरक्षण करणे ही एक अवघड समस्या होती. वास्तविक पहाता कर्ण हा पहिला पांडव होता. राधेय म्हणून तो लौकिकात ओळखला जात होता, तरी तो कौंतेय होता. पण त्याला त्याची ओळख नव्हती. ती त्याला करून दिली तर पाच पांडवांचे पंचप्राण वाचणार होते. एवढेच नव्हे तर सहा पांडव कुरुक्षेत्रावर

कौरवांशी दोन हात करायला उभे रहाणार होते. पण भवितव्यतेला ते मान्य नव्हते. कर्णाला स्वतः श्रीकृष्णाने सांगून पाहिले, तू "पांडवांचा थोरला भाऊ आहेस. कुंतीचा मुलगा आहेस." शत्रुपक्षाचा सेनापतीच फोडण्याचा हा मोठा कुशल डाव होता. एकदम मोठी झेप प्रथमच न घेता क्रमाक्रमाने पवित्रे घ्यावे लागतात. पहिला पवित्रा फसला. श्रीकृष्णाने कर्णाचे मन वळविण्याचा प्रयत्न प्रयत्न केला. तो त्याला म्हणाला होता, "कर्णा, दुष्टप्रवृत्ती कौरवांचा पक्ष सोड आणि सत्प्रवृत्त पांडवांच्या पक्षाला ये. खरे म्हणजे तो तुझाच पक्षच."

"ही आठवण फार उशिरा झाली. यादवाधीशा, जेव्हां सूतपुत्र, राधासुत म्हणून कर्णाकडे सारे जग तुच्छतेने पहात होते, तेव्हां ह्या कर्णाशी नाते जोडायला पांडव धजावले नाहीत. पांडवांनी ढुंकूनही पाहिले नाही माझ्याकडे. तेव्हा कौरवांनी माझ्या व्यक्तिमत्वाला आकार दिला. त्या कौरवांचा पक्ष सोडू म्हणतोस माधवा, छे ! छे ! ते शक्य नाही !" हे कर्णाचे शब्द त्या गोपालकृष्णाला ऐकावे लागले होते आणि पाठीवर हात ठेवून दुसऱ्या काही मार्गाचा विचार करीत परतावे लागले होते. निराशेला मात्र कृष्णाच्या मनात स्थान मिळाले नाही. निराशेलाही निराश व्हायला लावणारी कृष्णाची कर्मकुशलता होती. त्याला मार्ग सापडला होता आणि म्हणूनच बरेचसे अंधारून आल्यावर कुंतीने कर्णाच्या शिबिरात प्रवेश केला होता.

शिबिराचा प्रवेशाचा मखमली पडदा हळूच बाजूला करून कोणी-तरी आत येत आहे असे दिसताच कर्णाने विचारले, "कोण आहे?"

"मी ! कुंती !" डोक्यावरचे अवगुंठन बाजूला करून कुंती म्हणाली.

"पांडवांची आई !" कर्ण विषादाने म्हणाला.

"नाही ! तुझी आई !"

" इतके दिवस आई मुलाला विसरू शकते."

" नाही."

" मग–?"

" समजते मी तुझ्या मनाचा प्रश्न..." नजर खाली करून आसवांचे मोती पदराने टिपीत कुंती म्हणाली, " कर्णा ... मग मी तुझ्याकडे आजपर्यंत का आले नाही, असं तुला म्हणायचं आहे. ..बरोबर आहे तुझा प्रश्न. पण कर्णा, विसरायचा प्रयत्न करूनही मी विसरू शकले नाही आणि म्हणूनच आज आले तुझ्याकडे ..."

" धर्मार्जुनांच्या प्राणांवर संकट ओढवलं म्हणून." कर्ण म्हणाला.

" तसं नाही ! तुम्ही सर्व माझेच अहात. तुमच्यामध्ये धुमसणारा हा वैराग्नी विझावा म्हणून." कुंती म्हणाली.

" ते आता शक्य नाही ! " हे कर्णाचे निश्चयाचे शब्द ऐकल्यावर व्याकुळ होऊन कुंती पुन्हा एकदा म्हणाली, " मग काय, सर्व पांडवांचा नाश होणार या युद्धात ?"

तिच्या शब्दांची आर्तता जाणून कर्णाने एकवार तिच्याकडे पाहिले आणि झटकन् दृष्टी वळवून तो गंभीरपणाने म्हणाला, " मी फक्त अर्जुनावरच शस्त्र धरीन ! "

कर्ण पाठमोरा झाला.कुंतीला परत फिरावे लागले.चार पांडवांच्या प्राणांची भिक्षा पदरी बांधून तिला परतावे लागले.

कर्णाला त्याचे जन्मरहस्य सांगून श्रीकृष्णाने त्याचे मन विचलित केले होते. मनाची खंबीरता ढासळली होती. कठोरता मृदू झाली होती थोडीशी. पुन्हा त्या मनाला मातेच्या प्रेमाने अधिकच मृदू केले. श्रीकृष्णाच्या योजकतेचे हे फळ होते. त्यातच देवेन्द्राच्या चातुर्याची भर पडली. ब्राह्मणाच्या वेशाने येऊन दानशूर कर्णाकडून इन्द्राने कवचकुंडले मागून नेली. आता शरीराचेही संरक्षण गेले होते. तरीही

कौरवेश्वराचे संरक्षण करण्यासाठी महारथी कर्णाने आपला रथ रणभूमीवर नेला. युद्धाला तोंड लागले. कर्ण पराक्रमाने घायाळ झालेले पांडवांचे सैनिक रणाला पाठ दाखवू लागले. कर्णाचा तो पराक्रम आणि आपल्या सैनिकांचा हा पराक्रम पाहून अर्जुनसुद्धा मनात भयभीत झाला. कर्णार्जुनांचे बाण अंतराळात वेगाने एकमेकावर आपटत होते आणि निष्प्रभ होऊन खाली पडत होते. आपणावर तर असा प्रसंग येणार नाही ना, असे पार्थाला वाटत होते. पण श्रीकृष्णाकडे पाहिल्यावर त्याच्या मनाला धीर वाटे. त्याला वाटे, निराशेच्या गर्तेत जाऊ पहाणारी आपल्या मनोरथाची चाके श्रीकृष्णकृपेमुळेच पुन्हा वर काढली जातील. इतक्यात–

"पार्था, थांब !" ह्या कर्णाच्या शब्दांनी अर्जुन विचारांच्या भोवऱ्यातून बाहेर पडला. त्याने समोर पाहिले. कर्णाच्या रथाचे चाक भूमीने गिळले होते. रथ कलता झाला होता. रथात बसून तिरंदाजी करणे अशक्य होते. रथाखाली कर्ण उतरला होता. त्या वीरबाहूने आपल्या शक्तिशाली बाहूंनी रथचक्र उद्धरिले होते. एका हाताने त्याने चाक वर काढले होते. त्याने शरवर्षाव थांबविला होता. आणि म्हणूनच तो म्हणाला होता, "थांब पार्था."

–पण पार्थसारथी श्रीकृष्ण म्हणाला, "छे ! छे ! पार्था थांबतोस कसला ? ही तर संधी आहे. सोड बाण."

"अर्जुना, हे धर्मयुद्ध नाही. हा अधर्म आहे." कर्ण म्हणाला.

"कर्णा, आता धर्माअधर्मांच्या गोष्टी कशाला ? नानाविध प्रकारांनी पांडवांचा छळ केलात, द्रौपदीची विटंबना केलीत, तेव्हा राधासुता तुमचा धर्म कुठे गेला होता ?" श्रीकृष्णाने कर्णाला विचारले.

"निःशस्त्र योद्धयावर शस्त्र धरणे हा क्षत्रिय धर्म नाही." कर्ण संतापाने म्हणाला.

" आणि चक्रव्यूहामध्ये बाल अभिमन्यूला कोंडून सर्व शूरवीर कौरवांनी त्याचा वध केला हा क्षत्रिय धर्म होता ! पांडवांना लाक्षागृहात जाळण्याचा प्रयत्न केलात हा क्षत्रियधर्मच होता! तुम्ही वागलात तसेच आम्ही वागणार,हाच आमचा क्षत्रिय धर्म...अर्जुना थांबलास कशाला? सोड बाण." श्रीकृष्णाचे हे शब्द ऐकताच पुन्हा एकदा कर्ण म्हणाला,

" अर्जुना, हात मागे घे. हा अधर्म आहे."

त्याचे हे शब्द ऐकताच अर्जुनाने उचललेले धनुष्य खाली ठेवले. ही वेळ गेली तर विजयाची संधी गेली, हे श्रीकृष्ण जाणत होता. म्हणून तो पुन्हा संतापाने म्हणाला, " कर्णा, आम्ही आमच्या धर्माचे रक्षण करीत आहोत. आम्हांला दुसरा धर्म ठाऊक नाही ... आणि अर्जुना, ह्याच धर्माचे पालन करण्यासाठी धनुष्य उचल ... आणि सोड बाण."

अर्जुनाने धनुष्याला बाण लावला. महारथी कर्णाने एका बाहूवर रथचक्र धरले. एका हातात धनुष्य धरले आणि बाण लावून दातांनी दोरी ताणून शर वर्षाव करण्यास सुरुवात केली. इतक्यात पार्थाचा बाण सूं सूं करीत आला. त्या बाणाने आपले लक्ष्य साधले. कर्ण कौरवांचा तिसरा सेनापती धरणीवर कोसळला, आणि त्याच्याबरोबर कौरवांचे सामर्थ्यही धरणीवर कोसळू लागले. दुःशासन, विकर्ण वगैरे कौरवपुत्रांनी देखील भीष्म, द्रोण, कर्ण ह्यांचाच मार्ग अनुसरला. ते पांडवांकडून मारले गेले. शंभर कौरवांची माता गांधारी पुत्रशोकाने विव्हल झाली. तिचे नव्याण्णव पुत्र तिला सोडून गेले. आता राहिला एकुलता एक कुरूंचा सम्राट दुर्योधन.

" तूच आता आमचा एकुलता एक आधार आहेस, आम्हा अंध म्हाताऱ्यांची काठी आहेस. आता तू तरी आम्हांला सोडून जाऊ नकोस. " असे गांधारी दुर्योधनाला म्हणाली. तेव्हां पांडवांचा सूड

घेण्याच्या ईर्षेने संतप्त झालेला दुर्योधन तिला म्हणाला, " मग काय करू ? "

" पांडवांशी चाललेला संग्राम थांबव आणि संधी कर. तू जरी त्यांचा संधी करण्याचा हात झिडकारला होतास तरी संधी करण्यासाठी तू पुढे केलेला हात पांडव निश्चितच झिडकारणार नाहीत. हटवादीपणा सोड आणि तडजोड कर पांडवांशी ! " हे गांधारीचे शब्द सूडाने पेटलेल्या दुर्योधनाला कुठले पटायला ! त्याने गांधारीला निक्षून सांगितले, " पांडवांशी संधी अशक्य. "

गांधारीचा नाइलाज झाला.ती हताश होऊन दुर्योधनाला म्हणाली, " निदान युद्धाला निघण्यापूर्वी एकवार मला भेटून जा. "

मातेची अनुज्ञा मिळाली म्हणून दुर्योधनाला अतिशय आनंद झाला. तो आनंदातिशयाने म्हणाला, " होय आई, तुझा आशीर्वाद घेतल्याखेरीज मी जाणार नाही.'तुझा आशीर्वादच माझं रक्षण करील. "

" खरं आहे. आणि म्हणून दुर्योधना, . . . " अत्यंत गंभीर होऊन गांधारी बोलत होती, " माझ्या आशीर्वादाचे दिव्य कवच तुझ्या सर्व शरीराला लाभावे म्हणून अंगावर कोणतेही वस्त्र न ठेवता माझ्या दर्शनाला ये."

" आई–?" आश्चर्यचकित होऊन दुर्योधन बोलू लागला पण सारे शब्द तोंडातच घुटमळले आणि माघारी वळले. " आता जास्त बोलू नकोस. मी सांगितल्याप्रमाणे कर." ह्या गांधारीच्या शब्दांनी त्यांना माघारी वळविले. आणि मग दुर्योधनाची पावले त्याच्या शिबिराकडे वळली.

दुसऱ्या दिवशी गांधारी अगदी पहाटेच आपले सर्व प्रातःकार्य उरकून आपल्या एकुलत्या एक पुत्राची मोठ्या उत्कटतेने वाट पहात

वसली होती. शंभर पुत्रांची माता आता एकमेव राहिलेल्या मुलाच्या प्राणाच्या रक्षणासाठी आपले सर्वस्व वेचायला सिद्ध झाली होती. तिच्या पातिव्रत्याची पुण्याई आज तिने पणाला लावली होती. "माझ्या आशीर्वादाचे कवच तुझ्या सर्व शरीराला लाभावे म्हणून कोणतेही वस्त्र अंगावर न ठेवता माझ्या दर्शनाला ये." असे तिने दुर्योधनाला सांगितले होते. त्या तिच्या शब्दांना मोठा अर्थ होता. तिचा पती धृतराष्ट्र अंध होता. पतीला दृष्टिसुख नाही मग आपलाही त्या सुखावर अधिकार नाही, असे मानणाऱ्या त्या साध्वी स्त्रीने जाणून बुजून अंधत्व स्वीकारले होते. डोळ्यावर कायमची पट्टी तिने बांधली होती. त्यामुळेच तिच्या दृष्टीमध्ये विलक्षण तेज सामावले होते. ते तेज दुर्योधनाचे शरीर वज्राप्रमाणे करणार होते. हा गांधारीच्या शब्दांचा अर्थ होता. आणि म्हणूनच दुर्योधन कधी येतो, आपण त्याच्या शरीराकडे आपल्या तेजस्वी दृष्टीने कधी पहातो आणि त्या तेजाने त्याचे शरीर वज्राप्रमाणे कठीण कधी करतो, असे तिला झाले होते. त्यासाठी ती उत्सुकतेने वाट पहात होती.

इतक्यात "आई, मी आलो आहे." हे शब्द त्या मातेच्या कानावर आले. केवढा आनंद झाला त्या माउलीला.

"दुर्योधना, माझ्या दृष्टीच्या अमोघ सामर्थ्याने तू अजिंक्य होशील," असे म्हणून गांधारीने आपल्या डोळ्यावरची पट्टी काढली. आता मुक्त झालेले ते दृष्टितेज दुर्योधनाचे शरीर पावन करू लागले, समर्थ करू लागले. शंभर पुत्रांची माता पण पुत्रदर्शनाचे सुख तिने कधी अनुभवले नव्हते. किती अधाशीपणाने ती आपल्या पुत्राला पहात होती. पहाता पहाता ती एकदम चरकली आणि खिन्न होऊन दुर्योधनाला म्हणाली,

"अरे अरे ! दुर्योधना, घात झाला रे. मी तुला एकही वस्त्र

अंगावर न ठेवता यायला सांगितले होते. हा तुझ्या मांडीवरचा शेला कुठून आणलास ? कोणी केले हे कर्म ? "

आईचे हे शब्द ऐकताच दुर्योधनाचे मनही खिन्न झाले. घटके-पूर्वीचा सर्व प्रसंग पुन्हा घडत असल्यासारखा त्याला आठवू लागला.

काळोखाचे पांघरूण सृष्टीने अजून पुरतेसे बाजूला केले नव्हते. एखाद दुसरा बालरवीचा किरण सृष्टीला जागे करण्याचा अयशस्वी प्रयत्न करीत होता. अंधार आहे तोच मातेच्या दर्शनाला जावे ह्या हेतूने दुर्योधन घाईने आपल्या शिबिरातून बाहेर पडत होता. त्याच्या अंगावर वस्त्र नव्हते. आईच्या आज्ञेप्रमाणे पूर्ण नग्नावस्थेत तो निघाला होता. मन संकोचाने अर्धमेले झाले होते. तसेच ते सावरून तो मातृमंदिरापाशी आला. कोणी पहात नाही याची खात्री करण्यासाठी त्याची कावरी-बावरी दृष्टी इकडे तिकडे भिरभिरू लागली. तोच दाराशी कोणीतरी उभे असल्यासारखे त्याला वाटले. त्याने दचकून विचारले, " कोण ? "

" मी . . . कृष्णा माळी. " आवाज आला.

" काय आहे ? "

" काही नाही. हा फुलांचा शेला आहे. महाराजांनी कंबरेला बांधावा. फुलाचा शेला आहे हा. हे काही वस्त्र नाही." हे कृष्णा-माळ्याचे शब्द दुर्योधनालाही बरोबर वाटले होते. त्याने तो फुलाचा शेला कंबरेला बांधला होता आणि आता तो आईच्या दर्शनाला आला होता. हे सारे स्मृतिचित्र त्याला कसे स्पष्ट दिसत होते. तो अगदी गोंधळून गेला होता.

पुन्हा गांधारीने त्याला विचारले, " कोणी दिला हा शेला ? "

" कृष्णा माळ्याने ! " खाली पहात दुर्योधन म्हणाला,

" पांडवांचा पाठीराखा हा कृष्णा माळी दिसतो ? " गांधारी दुःखी मनाने बोलत होती, " भवितव्यता अटळ आहे. आता मायेच्या

आशीर्वादाखेरीज माझ्याजवळ काही नाही. माझ्या दृष्टीच्या अमोघ तेजाने दुर्योधना, तुझे सारे शरीर वज्राचे झाले आहे. पण कृष्णाच्या ह्या फुलांनी त्या तेजाचा मार्ग कुंठित केला आणि तुझी मांडी त्या फुलांसारखीच नाजूक राहिली. ही कर्मकुशलता त्या कृष्णाचीच."

गांधारीचे हे शब्द खरेच होते. गांधारीच्या दिव्यदृष्टीचे सामर्थ्य श्रीकृष्ण जाणत होता. त्या सामर्थ्याने दुर्योधन अजिंक्य ठरणार होता. ज्या कुशलतेने श्रीकृष्णाने पांडवाना विजयाच्या मार्गावर नेले होते ती कुशलता व्यर्थ ठरू पहात होती. आणि म्हणूनच "मातेच्या दर्शनाला सम्राटांनी अशा अवस्थेत जाणे बरोबर नाही. हा फुलांचा शेला कमरेला बांधायला काहीच हरकत नाही." असे सांगून त्यानेच माळ्याच्या रूपात तो फुलांचा शेला दुर्योधनाला दिला होता. संकटाची पावले ओळखणे, येणाऱ्या संकटाच्या निरसनाचा उपाय शोधणे आणि तो यशस्वीपणे अमलात आणणे ही खरी कर्मकुशलता. हा खरा योग. त्या कुशलतेनेच श्रीकृष्णाने पांडवांचे रक्षण केले होते. आताही तोच पांडवांचा पाठीराखा होता, हे गांधारी जाणत होती. तिने विषण्ण मनाने दुर्योधनाला निरोप दिला. तिच्या मनाची विषण्णता दुर्योधनाच्या पावलांनी उचलली. त्याची ती विषण्ण जड पावले शिबिराकडे वळली.

दुर्योधनाला जलतरणविद्या अवगत होती. त्याचे भीमाशी गदायुद्ध सुरू झाले. प्रचंड गजराज एकमेकांवर तुटून पडल्याप्रमाणे भीम-दुर्योधनाचे गदायुद्ध चालले होते. आषाढी मेघांनी जी गर्जना करावी, जे तांडव करावे त्याची आठवण करून देणारे ते द्वंद्वयुद्ध होते. आपण सहजासहजी दुर्योधनाचे जीवित हरण करू हा भीमाचा गर्व सहजासहजी हरण केला जावा अशा कुशलतेने दुर्योधन त्याच्याशी लढत होता. आणि एकदा लढत देता देता तो अचानक नाहीसा झाला. कोणाला काही समजेना. श्रीकृष्णाला मात्र सारे समजले होते.

पाण्यामध्ये घटकान् घटका लपून रहाण्याची विद्या दुर्योधन जाणत होता, हे श्रीकृष्ण जाणत होता. त्याच्या नेतृत्वाखाली भीम वगैरे सारे योद्धे दुर्योधनाला शोधण्यासाठी नदीच्या काठाकाठाने हिंडू लागले. ते वाट पहात होते. त्यांना वाटत होते की आज ना उद्या दुर्योधन पाण्याबाहेर आल्याखेरीज रहाणार नाही. पण सहा सात दिवस झाले तरी दुर्योधन पाण्याबाहेर आला नाही की त्याचा ठावठिकाणाही पांडवांना कळला नाही.

श्रीकृष्णाच्या समवेत सारे पांडव वणवण हिंडत होते. त्यांची शरीरे आणि मनेही कंटाळली होती. पण दुर्योधन मात्र कंटाळला नव्हता. तो जणू काही पाण्यात दडून बसून पांडवांची गंमत पहात होता. चालता चालता श्रीकृष्ण एकदम थांबला. पाण्यावर काही तरंग उमटले होते. त्यांच्याकडे पहात आणि मिस्किल हास्य करीत श्रीकृष्ण म्हणाला,

" भीमा, अर्जुना चला. आपण परत जाऊ. भेकडाप्रमाणे दडून रहाणाऱ्याशी युद्ध करण्यात तरी कोणता पुरुषार्थ आहे ? " असे म्हणून श्रीकृष्ण खरोखरीच माघारी वळला. आणि भीमार्जुनांनीहि त्याचे अनुकरण केले. इतक्यात--

" थांब. भीमा, भेकडाप्रमाणे रणाला पाठ दाखवू नकोस. " असे म्हणत पाण्याबाहेर उडी घेऊन दुर्योधन गदा उभारून भीमाला आव्हान देऊ लागला. श्रीकृष्णाच्या उपरोधिक बोलण्याने त्याचा अभिमान डिवचला गेला होता आणि तो पाण्याबाहेर आला होता. तो आपण होऊन बाहेर आला नसता तर भीम काहीच करू शकला नसता. श्रीकृष्णाच्या समयसूचकतेने त्याच्यापुढे त्याचा शत्रू उभा केला होता. त्याने उगारलेल्या गदेवर आपल्या गदेचा टोला देऊन भीमाने गदायुद्धाचे आव्हान स्वीकारले. आता पुन्हा गदायुद्ध रंगले.

भीम आणि दुर्योधन दोघेही गदायुद्ध पटू होते. प्रतिस्पर्ध्याने केलेले गदेचे आघात ते आपल्या गदेवर मोठ्या कुशलतेने अचूक टिपीत होते. धाड धाड असे आवाज होत होते. आणि त्या आवाजांच्या तालावर ते दोघेही वीर गगनभेदी आरोळ्या ठोकीत होते. भीम संधी साधून दुर्योधनाच्या शरीरावर आघात करण्याचा एकसारखा प्रयत्न करीत होता. परंतु अतिशय चपलतेने दुर्योधन ते आघात चुकवत होता. एकदा मात्र हा त्याचा प्रयत्न चुकला आणि भीमाची गदा त्याच्या शरीरावर आघात करू शकली. उपयोग मात्र काही झाला नाही. दुर्योधनाच्या वज्रसदृश शरीरावर आदळलेल्या त्या भीमाच्या गदेचेच तुकडे तुकडे झाले. एखाद्या पर्वताप्रमाणे ताठ उभा राहून दुर्योधन विकट हास्य करीत उभा होता. ‘घे दुसरी गदा’ असे मग्रूरपणाने तो म्हणाला. भीमाने मुकाट्याने दुसरी गदा घेतली. तिच्याही वाट्याला पहिलीचेच नशीब आले. आणखी एकदा ह्याच प्रकाराची पुनरावृत्ती झाली.

संतप्त भीमाला काही सुचत नव्हते. तो त्वेषाने दुर्योधनावर आघात करीत होता. विकट हास्य करीत दुर्योधन ते चुकवीत होता. हे भयंकर रणकंदन पाहून भयभीत मनाने धर्म, अर्जुन, श्रीकृष्ण दूर उभे राहिले. पांडवांना सम्राटपदाला पोचविणारा पांडवांचा सखा श्रीकृष्ण होता. नेहमीच संकटकाळी तो त्यांच्या उपयोगी पडला होता. आता देखील भीमाची त्रस्त दृष्टी त्याच्याकडेच गेली होती. भीमाच्या दृष्टीची श्रीकृष्ण वाटच पहात होता. भीम आपल्याकडे पहातो आहे, असे पहाताच श्रीकृष्णाने आपल्या उजव्या मांडीवरील पीतांबर बाजूला केला आणि एखाद्या मल्लाप्रमाणे जोराने मांडीवर थाप मारली. भीमाने त्या थापेचा अर्थ ओळखला. केवढे स्फुरण चढले त्याला. अतिचपलतेने तो गदायुद्ध खेळू लागला. त्याचा तो वेग,

त्याचा तो उत्साह पाहून दुर्योधन गोंधळला. ती संधी साधून भीमाने एकदम मोठ्या चपळाईने दुर्योधनाच्या उजव्या मांडीवर गदेचा टोला ठेवून दिला. त्या मर्मभेदी टोल्याने आपली कामगिरी बजावली. दुर्योधन खाली कोसळला. कौरवांचा अखेरचा वीर गतप्राण झाला. शतपुत्रांची माता गांधारी निपुत्रिक ठरली. शतपुत्रांचा पिता धृतराष्ट्र निपुत्रिक ठरला. अठरा दिवसांचे भारतीय युद्ध संपले. पांडव विजयी झाले. कारण—

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥


जेथे योगेश्वर कृष्ण व जेथे धनुर्धर पार्थ असतील, तेथे श्री, विजय, ऐश्वर्य आणि अढळ नीती ही निश्चित आहेतच.

श्रीकृष्णामुळे पांडव विजयी झाले होते, वैभवशाली झाले होते. पांडवांनी नीती सोडली नव्हती. पुत्रशोकाने विव्हल झालेल्या धृतराष्ट्राने पांडवांच्या भेटीची इच्छा व्यक्त करताच त्यांनी ती तत्काल मान्य केली. धर्म, भीम, अर्जुन, नकुल आणि सहदेव मोठ्या आनंदाने धृतराष्ट्राला भेटायला गेले. धृतराष्ट्राला ते पुत्रांच्या ठिकाणी होते आणि—धृतराष्ट्र त्यांना पित्याच्या ठिकाणी होता. पांडव आलेले कळताच अंध धृतराष्ट्र मोठ्या उत्कटतेने त्यांच्या स्वागतासाठी पुढे आला. धर्मराज अति नम्रतेने पुढे झाला. त्याने धृतराष्ट्राला वंदन केले. धृतराष्ट्राने त्याला दोन्ही हातांनी धरून उभे केले आणि प्रेमभराने त्याला आलिंगन दिले. धर्मराज बाजूला झाला. "माझा भीम कुठे आहे ?" असे म्हणत धृतराष्ट्र हात पसरवीत पुढे येऊ लागला. आडदांड भीमाचे प्रेमळ अंतःकरण उचंबळून आले. तो घाईघाईने आपल्या चुलत्याला आलिंगन द्यायला पुढे झाला. पांडवांचा परममित्र श्रीकृष्ण पांडवांच्या बरोबरच होता. तो झटकन्

पुढे झाला. त्याने भीमाला मागे खेचले. क्षणाचाही अवधी लोटला नाही तोच एक सुवर्णाचा पुतळा, हुबेहूब भीमासारखा, पुढे ढकलण्यांत आला. तो धृतराष्ट्राच्या प्रेमाच्या अलिंगनात नव्हे मगरमिठीत सापडताच त्याचे अगदी चूर्ण झाले. भीमाचे हेच भवितव्य होते जर तो धृतराष्ट्राच्या मिठीत सापडला असता तर श्रीकृष्णाच्या समयसूचकतेमुळेच तो प्रसंग टळला. दुर्योधन, दुःशासन ह्या पुत्रांचा भीमाने वध केला होता. तेव्हा भीमाविषयीची सूडबुद्धी धृतराष्ट्राच्या मनात निश्चयाने धगधगत होती, हे श्रीकृष्ण जाणत होता. तेव्हां जेव्हां धृतराष्ट्राचे पांडवांना भेटीचे बोलावणे आले तेव्हांच त्याने सारी योजना आखून ठेवली होती. आता ती यशस्वी झाली होती आणि भीमाचे प्राण वांचले होते.

ही श्रीकृष्णाची कर्मकुशलता. हा श्रीकृष्णाचा योग. कारण—

'योगः कर्मसु कौशलम् ।'



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ........ वि ........
क्रमांक ........ नोंद दि ........

# पहिला पेशवा



जाधवांचा चौसोपी वाडा म्हणजे त्या गावचे मोठे भूषण होते. गाववेशीतून प्रवेश करून आत फर्लांग दीड फर्लांग आपण आलो म्हणजे डाव्या हाताला महादेवाचे भव्य देवालय आणि त्यापुढे ठाण मांडून उभी असलेली दीपमाल दिसते. मग भक्तिभावाने हात सहजच जुळतात. देवळाची अर्धी प्रदक्षिणा करून आपण माघारी वळलो की, आपली नजर उजवीकडे कलते आणि एका भव्य वास्तूवर खिळून रहाते. ही भव्य वास्तू म्हणजे जाधवांचा भव्य वाडा. त्या वाड्यावर खिळून राहिलेली आपली नजर काहीशी आदराने, काहीशी भीतीने खाली वाकते. कारण धनाजी जाधवांचा दराराच तसा होता शिस्तीचा.

महादेवाचे दर्शन घेऊन घरोघर जाणारे गावकरी जाधवांच्या वाड्याकडे भक्तिभावाने एकवार पहात आणि मग पुढे पाऊल टाकत. जणू त्यांचा तो नित्यक्रम होता. धनाजी जाधवांचा पराक्रम त्या शिस्तीच्या मुळाशी होता. आणि त्यांच्या जहागिरीतील कारभाराला दिलेले पद्धतशीर वळण त्या भक्तिभावाच्या मुळाशी होते. त्यांच्या दौलतीचे कारभारी होते बाळाजी विश्वनाथ भट.

वाड्याचा दिण्डी दरवाजा उघडून आत पाऊल टाकले की, प्रथम मोठे अंगण ओलांडून जावे लागे. जाता जाता उजव्या हाताला तुळशी-वृंदावनाकडे एक दृष्टिक्षेप टाकून समोर बघितले की, मोठी सदर दिसे. मध्यभागी गादी लोड अशी बैठक आणि बाजूला अशीच छोटीशी बैठक, पुढे एक उतरते मेज, त्यावर मोठमोठ्या कीर्द-खतावण्या आणि त्यांच्या मागून डोकावणारी एक कृश सडपातळ व्यक्ती, हे तिथले दृश्य आल्यागेल्यांच्या अगदी परिचयाचे होते.

आज देखील हेच दृश्य तिथे पहावयास मिळत होते. मधल्या रुबाबदार बैठकीवर रुबाबदार व्यक्तिमत्वाचे मराठ्यांचे सेनापती धनाजी जाधव बसले होते. त्यांची मुद्रा चिंताक्रान्त दिसत होती. वर टोके वळविलेल्या मिशांकडे पुन्हा पुन्हा जाणारे त्यांचे हात त्यांच्या मनाची अस्वस्थता सूचित करीत होते. मधेच दृष्टी उजव्या हाताच्या कोपऱ्यावर टाकत सेनापती म्हणाले,

"पंत, प्रसंग मोठा तेढा आला आहे."

"हो, शाहू महाराज येताहेत." वहीमधे लिहिलेली अक्षरे वाळण्यासाठी त्यावर रेती टाकत बाळाजीपंत म्हणाले.

"तुम्ही कसे नेमके ओळखलेत ? आश्चर्य आहे."

"त्यात आश्चर्य काय ? इतकी वर्षे धन्याची सेवा केल्यानंतरही धन्याचे अंतःकरण ओळखता आले नाही तर सेवकाची कुशलता

ती कोणती ? " हे बाळाजीचे बोलणे ऐकताच मन प्रसन्न होऊन सेनापती पुन्हा म्हणाले, " पंत, तुम्ही आमच्या मनाला भेडसावणारा प्रश्न बरोबर हेरलात. ही तुमची हुशारी आम्ही पूर्वीच हेरल्यामुळे शंकराजीपंत सचिवांच्याकडे आम्ही तुमची मागणी केली. त्यांनीही आमच्या विनंतीला मान दिला. तुम्ही आमच्या दौलतीचा कारभार अशा कुशलतेने केला आहे की नुसते धनच जोडले नाही तर लोकांची मनेही तुम्ही जिंकली.....आणि म्हणूनच असा काही विचारांची गुंतागुंत निर्माण करणारा प्रसंग आला की आमचं मन तुमच्याचकडे धाव घेतं."

" हा सेवकाचा गौरव आहे. " बाळाजी विश्वनाथ म्हणाले.

" पंत, राजाराममहाराजांच्या पश्चात श्रीमती ताराबाईसाहेबांनी स्वराज्याचे रक्षण केले आणि आता शाहूराजांचे आगमन–" धनाजी जाधवांचे हे बोलणे बाळाजीपंतांच्या बोलण्याने अर्ध्यावरच तुटले.

बाळाजीपंत म्हणाले, " योग्य अशा प्रसंगीच होत आहे. काही जमीनदार, सरदार त्यांच्या आगमनाचे वर्तमान ऐकताच त्यांना अनुकूल झाले आहेत. ' मनुष्य जरबेत राखावे, रयत लोकांचे रक्षण करावे, बंडे बुडवावी म्हणजे धका नाही." हा बादशहांचा हुकूम शिरोधार्य मानून शाहूमहाराज दक्षिणेत पाऊल ठेवत आहेत. " आता राज्य आम्ही करू. बादशाही आज्ञा अशीच आहे. आपला आशीर्वाद असावा." असा ताराबाईसाहेबांना त्यांचा निरोप आला आहे, अशी बातमी आहे.

" आणि ताराबाईसाहेब शाहूराजांना तोतया ठरवू पहात आहेत, अशीही बातमी आहे. " सेनापती गंभीर होऊन म्हणाले, शिवाय " तुमचा राज्यावर हक्क नाही आणि आम्ही तुम्हांस राज्य देत नाही." असे प्रत्युत्तरही ताराबाईसाहेबांनी पाठविले आहे."

हातातली लेखणी कानावर ठेवत पंत म्हणाले, "विनाशकाल जवळ आणणारी अशी ही विपरीत बुद्धी आहे. "गादीचा लोभ कधी धरणार नाही" असे म्हणणाऱ्या राजाराममहाराजांनी स्वराज्याचे संरक्षक ह्याच केवळ एका भावनेने आपल्या आणि सुभेदार घोरपड्यांच्या सहकार्याने स्वराज्याची सेवा केली. आणि सिंहासनाचा खरा धनी परत आल्यानंतर ही भाषा ? राजाराम महाराजांचा भरतभाव त्यांच्याच बरोबर गेला म्हणायचा."

"स्वराज्याच्या दुफळीची ही लक्षणे दिसतात." सेनापतींची मुद्रा अधिक चिंताक्रांत दिसत होती.

"दुफळीला आरंभही झाला आहे." बाळाजीपंत म्हणाले, "परशुरामपंत प्रतिनिधी आणि शंकराजी नारायण या मातबर मुत्सद्यांनी ताराबाईसाहेबांची तळी उचलली आहे. कोणी शाहू महाराजांस मिळू नये म्हणून सरदारांकडून दूधभातावर हात ठेवून शपथा घेवविल्या गेल्या आहेत. आत्मनाशाचा बेलभंडाराच जणू सगळ्यांनी उचलला आहे. "राज्याचा भार तुम्हांवरी टाकिला असे," अशी साखर पेरण्याची भाषा करून रामचंद्रपंत अमात्यांना देखील जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न चालला आहे. आणि सर्वांवर कडी म्हणजे "जे शाहूस मिळतील त्यांचे पारिपत्य केले जाईल." असे फर्मानही निघाले आहे. साम, दाम, दंड, अशा तिन्ही मार्गांचा मोठ्या चतुराईने अवलंब करण्यात आला आहे." 'पंतऽ' दिलखुलास हास्य करीत सेनापती म्हणाले, "कीर्द खतावण्यांच्या ढिगाऱ्याआड बसून तुम्ही राजकारण अगदी बारकाईने न्याहाळले आहे."

"आपल्या सहवासात इतकी वर्षे राहूनही एवढंही मी शिकलो नाही तर व्यर्थ जन्म म्हणावयाचा." बाळाजी विश्वनाथ नम्रपणाने म्हणाले.

"आता ही कोंडी फोडावयाची कशी?" ह्या सेनापतींच्या प्रश्नाला बाळाजीपंतांनी ताडकन् उत्तर दिले, "शाहूमहाराजांना सामोरे जाऊन."

"पण त्यांच्याविरुद्ध तर इथे सारी मातबर मंडळी एक झाली आहेत. त्यांनी तर माळव्यातून पुढे आलेल्या शाहूराजांना तोतया ठरविले आहे."

"विरुद्ध कारस्थान करणारी माणसे त्यांना तोतयाच ठरविणार. ते त्यांच्या फायद्याचे आहे. लोकमत भडकवून द्यायला त्यांना ते एक निमित्त होते आहे, पण चिटणिसांसारख्या स्वामीनिष्ठ सेवकांची खात्री झाली आहे की शाहू राजेच दिल्लीकरांच्या तावडीतून मुक्त होऊन स्वराज्याचे–सिंहासन सनाथ करण्यासाठी येत आहे. . . . . आपणासही बादशहांची पत्रे आली होती. याच बाबतीत." असे म्हणून बाळाजी विश्वनाथ सेनापतींच्या मुखाकडे एक टक पहात, त्यांच्या विचारांचा अंदाज घेऊ लागले.

सेनापती म्हणाले, "पंत, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. पण बादशहा शाहूराजांची मुक्तता करण्याइतका उदार तरी कसा झाला?"

"हा उदारपणा नाही. हे राजकारण आहे. उभयतांनी आपसात लढून निकाल ठरवावा, असा डाव बादशहाने टाकला आहे. मराठी सामर्थ्य चिरडून टाकणे अलमगिरालाही दोन तपावर प्रयत्न करून साधले नाही. आता तर बादशाही सत्ता कमकुवत झालेली आहे. मराठ्यांचे पारिपत्य करायला बादशहा पूर्णतया असमर्थ आहे. अशा वेळेस मराठे आपसात लढून एकमेकांचा नाश करू लागले तर ते बादशहाला हवेच आहे. आणि अशा वेळेस स्वराज्याचे सेनापती ह्या नात्याने आपणच पुढाकार घेतला पाहिजे." असे म्हणून बाळाजीपंतांनी कानावरची लेखणी हातात घेतली आणि वही पुढे घेतली.

" पण पंत वार्धक्यात ही सारी दगदग आम्हांला कशी झेपावी ? आमचं सर्व सामर्थ्य आता खर्ची पडलं आहे."

ह्यावर पंत म्हणाले, "आपला आशीर्वाद आमच्या जमेच्या बाजूला असला म्हणजे पुरे. "

"आहे ! " हा सेनापतींचा एकच शब्द ऐकताच बाळाजी विश्वनाथांना केवढा धीर वाटला. लेखणी खाली टाकून ते ताडकन उठले आणि कोपऱ्यातली तरवार कमरेच्या शेल्यात खोवून ते म्हणाले, " मग आम्ही आणि चिटणीस शाहू महाराजांना सामोरे जातो."

" आपल्या अगोदरच प्रतिनिधी, अमात्य, सचीव अशी बडी बडी माणसे पुढे गेली आहेत. " सदरेमध्ये येता येता खंडोबल्लाळ चिटणीस म्हणाले.

" मग तर आता अजिबात विलंब लावता कामा नये. चला चिटणीस " असे म्हणून पंतांनी सेनापतींचा निरोप घेतला. त्या पाठमोऱ्या उत्साही मूर्तीकडे कौतुकाने पहात चिटणीसही त्यांच्या मागोमाग पायऱ्या उतरले.

पंतांच्या चतुराईमुळे धनाजी जाधवांची मेहेरनजर शाहू पक्षाकडे वळली. प्रतिपक्ष फार बलवत्तर होता. त्याचे मनुष्यबलही जास्त होते. " हा खरा शाहू नाही. तोतया आहे. " ही ताराबाईपक्षाने उठवलेली हूल पुष्कळ जणांना भूल पाडत होती. शिवाय प्रस्थापित सत्तेला विरोध करायला सर्व सामान्य माणसे तयार होत नाहीत. सर्व साधारण माणसे गतानुगतिक असतात. बदल करण्याची आवश्यकता का आहे ? केला नाही तर कोणते परिणाम होतील ? आणि विरोध करावयाचा कसा ? हे ते काहीच जाणत नाहीत. हे जाणणे ही कर्मकुशलता आहे. हा योग आहे.

' योगः कर्मसु कौशलम् । '

ही कुशलता बाळाजी विश्वनाथांच्या ठिकाणी होती. राजाराम-महाराजांच्यापासून स्वराज्याची स्थित्यंतरे त्यांनी पाहिली होती. त्यांचे कार्यकारणभाव जाणले होते. परक्यांच्या राज्यात स्वकीयांची होणारी दैन्यावस्था त्यांनी बघितली होती. नव्हे स्वत: अनुभवली होती. आणि म्हणून बादशहाच्या आधारावर का होईना, शाहूराजाची स्थिरसत्ता स्वराज्याला आवश्यक आहे, हे गणित त्यांनी मनाशी पक्के करून टाकले होते. काम मोठे बिकट होते. तरी ते पंतांनी तडीस नेले. अंबाजीपंत पुरंदऱ्यासारख्या सावकाराकडून कर्ज घेऊन पंतांनी शाहूच्या सहाय्यासाठी सेना उभारली. माळव्यातून खाली दक्षिणेकडे निघालेला शाहू औरंगाबाद, नगर असे मुक्काम करीत खेडपर्यंत येऊन पोहोचला.ताराबाईच्या पक्षाच्या मातबर सैन्याने त्याला सहज माघारी पळवून लावले असते. नेमाजी शिंदे, खंडेराव दाभाडे, परसोजी भोसले असे काही सरदार शाहू पक्षास मिळणारे होते; पण विरुद्ध जाणारेच जास्त होते. ऐन वेळेला बाळाजी विश्वनाथ आणि खंडोबल्लाळ यांची मदत येऊन पोहोचली आणि खेडच्या लढाईचे स्वरूप पालटले. विजयश्रीने शाहूच्या गळयात माळ घातली. बाळाजी विश्वनाथांच्या चातुर्याचा पहिला विजय झाला. शाहूमहाराजांच्या सत्तेची संस्थापना झाली.

ह्या विजयाचे कौतुक करायला धनाजी जाधव फार दिवस राहिले नाहीत. धनाजीनंतर सेनापतीपदाची वस्त्रे चंद्रसेनास, धनाजी जाधवांच्या मुलास मिळाली. परंतु चंद्रसेनाचा म्हणावा तसा पाठिंबा शाहूमहाराजांस मिळेना. मोगलांनी पेरलेले फितुरीचे विष आपला प्रभाव दाखवू लागले होते. दमाजी थोरात, चंद्रसेन जाधव, रंभाजी निंबाळकर ही सरदार मंडळी नाराज होऊ लागली होती. वरपांगी शाहूपक्षात राहून ताराबाईच्या पक्षास मिळण्याचे मनसुबे ते खेळू

लागले होते. तेव्हा सेनाकर्ते हे पद देऊन शाहूमहाराजांनी सारी भिस्त बाळाजीपंतांवर टाकली. तरी सेनापती ह्या नात्याने थोरात, चव्हाण वगैरे बंडखोरांची बंडाळी मोडण्याची कामगिरी त्यांनी चंद्रसेनावर सोपविली होती. ह्या कामगिरीवर तो असताना बाळाजीपंतही त्याबरोबर होते.

एकदा एका रानात सैन्याचा मुक्काम पडला होता. बाळाजीपंतांच्या पथकातील पिराजी राऊताला एक हरीण आढळले. त्याने त्या हरणाचा पाठलाग केला. योगायोगाने ते हरीण चंद्रसेनाच्या पथकातील व्यासराव नावाच्या सरदाराच्या राहुटीत शिरले. झगड्याला एवढेसे कारण पुरले. "पिराजीस आम्ही शिक्षा करतो." असे बाळाजीपंतांनी चंद्रसेन जाधवास कळविले. पण त्याने भागले नाही. बाळाजीपंतांचा सूड घेण्यासाठी चंद्रसेन निमित्तालाच टेकला होता. त्याने एकदम हल्ला करून पंतांचा पराभव केला. नाथाजी धुमाळ, पिलाजी जाधव आणि कान्होजी शिर्के यांच्या सहाय्याने बाळाजीपंत सुरक्षितपणे निसटून साताऱ्याला गेले, नाहीतर चंद्रसेन जाधवाच्या अटकेत खितपत पडण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला होता. "स्वामींनी बाळाजीस माझ्या स्वाधीन करावे. त्यास आश्रय दिल्यास आम्हांस महाराजांचे पाय सुटतील." असे चंद्रसेनाने शाहूमहाराजांस कळविले. शाहूमहाराज बाळाजीपंतांची योग्यता आणि चंद्रसेनाचे अंतरंग जाणत होते. त्यांनी चंद्रसेनाला भीक घातली नाही.

आता चंद्रसेन उघड उघड ताराबाईच्या पक्षाला मिळाला. जे जाधवांचे सामर्थ्य बाळाजी विश्वनाथांच्या मुत्सद्दीगिरीमुळे शाहूपक्षाला लाभले ते जाधवांचे सामर्थ्य आता ताराबाईच्या पक्षाला गेले होते. सेनापती गेला म्हणजे राज्याचा कणाच गेला. आणि त्या अगोदर सावंत, आंगरे, दाभाडे हे सरदार ताराबाईच्या पक्षाला

गेले होते. मोगलांनी अंतस्थ फितुरी चालविली होती. दाऊदखान पन्नीच्या कारवाईला चंद्रसेनासारखा मातबर सरदार बळी पडला होता. परिस्थितीने बाळाजीपंतांना मोठे आव्हान केले होते. शाहू-महाराजांना सत्ता मिळायला बाळाजी विश्वनाथांची कर्मकुशलता उपयुक्त ठरली होती. आता हे फितुरीचे जंजाळ तोडून ती सत्ता स्थिर करण्याचे कठिण कर्म त्यांना करावयाचे होते. अंबाजीपंतांच्या सहाय्याने कर्ज काढून नवी सेना उभारावयाचे त्यांनी ठरविले. पण कर्ज तरी कोण आणि किती देणार ? एखाद्या झोपडयाचे पडते छप्पर सावरता येईल; कोसळत्या आकाशाला कोण सावरणार ? पण कर्मकुशलतेची कसोटी होते ती अशा प्रसंगीच.शाहूमहाराजांकडून पंधरा लाखांचा सरंजाम पंतांनी आपल्या नावे करून घेतला. तारण म्हणून त्याचा उपयोग झाला. सावकारांनी थैल्या मोकळ्या केल्या. पैशाच्या तालावर सैन्याची पावले पडू लागली.पंतांनी आपले सेनाकर्ते पद सार्थ केले.

चंद्रसेन जाधव आणि दमाजी थोरात यांना हाताशी धरून मोगलांनी कारस्थानाचा एक नवा डाव टाकला. चंद्रसेनाने शाहू महाराजांवर आक्रमण करावे आणि दमाजीने बाळाजीपंतांना घेरावे, असा हा नवा डाव होता. थोराताची गढी हिंगणगावात होती. तिथे त्याचा बंडखोरपणा मोठ्या प्रमाणात चालला होता. दमाजी थोराता-सारखा पराक्रमी सरदार शक्य तर सामोपचाराने आपल्या पक्षाला वळवून घ्यावा, असे धोरण ठरवून बाळाजी विश्वनाथ दमाजीस हिंगणगावास भेटले. " दगाफटका होणार नाही " याची खातरजमा करण्यासाठी बेलभंडार उचलला गेला. दमाजीने बेलभंडार उचलून शपथही घेतली.

तेव्हा निर्धास्त मनाने बाळाजीपंतांनी गढीमध्ये प्रवेश केला. थोराताने हसत पुढे येऊन त्यांचे स्वागत केले. पण त्याच्या मागोमाग बैठकीच्या ठिकाणी आलेल्या त्याच्या सैनिकांनी ताबडतोब पंतांना हातकडचा, पायबेडचा ही भूषणे चढविली. अगोदरच सारे कारस्थान ठरले होते.

पंतांनी शांतपणाने विचारले, "हे काय ?"

"आपले स्वागत." निर्लज्जपणे हसत दमाजी म्हणाला,

"हा विश्वासघात झाला. थोरात आपण शपथ घेतली होती." पुन्हा पंत शांतपणाने म्हणाले.

"कसली शपथ घेऊन बसलात पंत ?" मग्रूरपणाने दमाजी म्हणाला, "शपथ म्हणजे बेलभंडार उचलला, हेच ना. अहो, त्यात काय अर्थ आहे ? बेल म्हणजे पाला आणि भंडार म्हणजे हळद. ह्यापेक्षा अधिक काय किंमत त्यांना !"

"खरंच आहे !" गंभीर होत पंत म्हणाले, "कोणत्याही वस्तूचे मोल वाढते ते भावनेने वाढते. थोरात, तुमच्या लेखी स्वराज्याला मोल राहिले नाही. तिथे ह्या क्षुद्र वस्तूंची काय तमा...!"

"बास् ! बास् ! पंत तुमचे ते तत्त्वज्ञान पुरे. आता गढीची हवा खाणे हेच तुमच्या नशिबी आले आहे."

"अगदी खरं...पण थोरात एक विनवणी आहे–"

"काय ?"

"माझ्या दौलतीची व्यवस्था लावायला मला दोन दिवसांची मोकळीक मिळावी."

"पण तुम्ही परत इथे याल, हे मी कसे खरे मानू ?" पंताकडे दृष्टी रोखून दमाजी म्हणाला.

" अगदी योग्य आहे तुमचा प्रश्न. मी काही बेलभंडार उचलत नाही....माझी बायका मुले इथे ओलीस म्हणून ठेवून जातो. बायका-मुलांविषयींच्याही कोमल भावना मरून जाण्याइतके भयंकर दिवस अजून आले नाहीत, असं मला वाटतं. शिवाय आमचे हे परमस्नेही अंबाजीपंत पुरंदरे इथेच रहातील. आमच्या कुटुंबाच्या समवेत. मोठे सावकार आहेत. नाहीतरी आजकाल पैशालाच मोल आहे. मग तो पैसा आपला असो की परक्याचा ! आपण मला परवानगी द्यावी." असे म्हणून पंतांनी खाली वाकून हात जोडले.

" ठीक आहे. आम्ही आपली वाट पहातो. आमची गढी उभी आहे आपल्या स्वागताला, " असे म्हणून दमाजीने पंतांना निरोप दिला. आणि–" बघू ! काय भवितव्यता असेल ती." ह्या शब्दांनी पंतांनी दमाजीचा निरोप घेतला.

बाळाजीपंतांनी हे फार मोठे साहस केले होते. स्वराज्याच्या कारवाईमधे मधेच निर्माण झालेले हे संकट निवारण्यासाठी बाळाजी-पंतांनी आपल्या कुटुंबाचे पंचप्राण ओलीस ठेवले होते. शाहूमहा-राजांच्या कानी सारे वर्तमान घालून बाळाजीपंत तातडीने शंकराजी मल्हारांच्याकडे गेले. मोगल बादशाही आपल्या हातात ठेवण्याचे डाव खेळणाऱ्या सय्यदबंधूंपैकी हुसेन सय्यद माळव्यात होता. शंकराजी मल्हार यांच्या मध्यस्थीने पंतांनी हुसेन सय्यदशी मैत्रीचा तह केला. मोगलांचा तोफखाना बाळाजी विश्वनाथांच्या मदतीला सय्यदाने दिला. शहाजीराजांची विजापूरकरांच्या तावडीतून सुटका करण्या-साठी शिव छत्रपतींनी जो डाव कुशलतेने टाकला होता त्याचीच पुनरावृत्ती पंतांनी केली. मोगलांचा तोफखाना घेऊन पंतांनी थोराताचे हिंगणगावाला मोर्चे लावले. ज्या मोगलांच्या फितुरीला बळी पडून दमाजी थोराताने स्वराज्याच्या नाशाची कारस्थाने केली त्याच

मोगलांचे सहाय्य घेऊन पंतांनी दमाजीचा पराभव केला. काटचाने काटा काढण्याची ही पंतांची कर्मकुशलता यशस्वी झाली. तोफांच्या भडीमारापुढे दमाजी शरण आला. त्याला पुरंदर किल्ल्यावर अटकेत ठेवण्यात आले. हिंगणगाव पंतांच्या सैन्याने जिंकले. "ही गढी तुमच्या स्वागताला उभी आहे." अशी दर्पोक्ती ज्या गढीविषयी दमाजीने केली होती, ती गढी अगदी जमीनदोस्त झाली. अगदी गाढवाचा नांगर फिरविला गेला. ही भवितव्यता दमाजी जाणत नव्हता. पण पंतांनी मात्र ती गढी सोडताना पक्की योजना मनात आखली होती आणि यशस्वी केली होती. ही कर्मकुशलता. हा खरा योग.

मोगलांनी फितुरीच्या रिंगणात खेळविण्यासाठी चंद्रसेन जाधव आणि दमाजी थोरात या मराठ्यांच्या दोन बाहुल्या हातात धरल्या होत्या. त्यातील एक बाहुले पुरंदर किल्ल्यावर खितपत पडल्यावर दुसऱ्याचे हातपाय आपोआपच गारठले. रहाता राहिला होता दर्या-सारंग कान्होजी आंगरे. थोरात, जाधव, खटावकर यांच्या कारस्थानात सामील होऊन त्याने ताराबाईचा पक्ष धरला होता आणि शाहू-महाराजांना त्रास देण्याचे व्रत स्वीकारले होते. दमाजीचे कारस्थान फसल्याने मोगलांच्या फितुरीच्या कारस्थानात आता फारसा दम राहिला नव्हता. मराठ्यांच्या राज्यात त्यांचा हात शिरकण्याचे भय आता पुष्कळसे कमी झाले होते. जमलेच तर त्यांच्याच राज्यात मराठी हात शिरकविण्याचे स्वप्न पंत पहात होते. पण त्या अगोदर हे सागरी संकट शांत करावयाचे होते. कान्होजी आंगऱ्याचा बंदोवस्त करावयाचा होता.

कान्होजी आंगरे हा मराठी आरमाराचा प्रमुख अधिकारी होता. राजाराम महाराजांनी त्याला सरखेल ही बहुमानाची पदवी देऊन गौरविले होते. राजाराम महाराजांच्या पश्चात् शाहू महाराज

मोगलांच्या ताब्यात असताना मोगल आणि शिद्दी यांचा पश्चिम किनाऱ्यावर उत्तम रीतीने प्रतिकार केला होता आणि स्वराज्याची पश्चिम सरहद्द सुरक्षित ठेवली होती. शाहू महाराजांच्या गैरहजेरीत ताराबाईनेच स्वराज्याचा कारभार चालविला असल्याने अनेक सरदारांचा ताराबाईकडे ओढा होता. आणि याला कान्होजी काही अपवाद नव्हता. प्रथमपासूनच त्याचा ताराबाईकडे ओढा होता. रामचंद्रपंतांचे हुकूम तो मानत असे. आणि ताराबाईची सारी भिस्त रामचंद्रपंत अमात्यावर असल्याने शाहू महाराजांनी स्वराज्यात प्रवेश केल्यानंतरही कान्होजी ताराबाईच्या पक्षाला चिकटून राहिला. एवढेच नव्हे तर शाहूमहाराजांच्या विरुद्ध जी कारस्थाने केली गेली त्यातही तो सामील झाला. स्वराज्याच्या पश्चिम पट्टीवर जणू त्याचेच राज्य होते. तो शाहूमहाराजांचा अधिकार मानीना. तेव्हा त्याचा पुंडावा मोडून काढण्याचा विचार महाराजांनी केला.

कल्याण प्रांताचा कारभार पेशवे बहिरोपंत पिंगळे हे पहात होते. पेशवे म्हणजे स्वराज्याचे प्रमुख अधिकारी. शिवाय आंगऱ्याच्या नजीकच त्यांचे ठाणे होते. तेव्हा शाहूने आंगऱ्याच्या बंदोबस्ताची कामगिरी पिंगळ्यांच्यावर सोपविली. पण आंगऱ्याच्या बंदोबस्ताला पिंगळे निघण्याच्या अगोदरच कुलाबा सोडून कान्होजी आंगरे गरूड भरारीने स्वराज्यावर चालून आला. त्याने कल्याण प्रांत तर पहिल्याच घासात गिळंकृत केला. एवढेच नव्हे तर राजमाची वगैरे किल्ले घेऊन साताऱ्यावर धडक देण्याची तो तयारी करत होता. नव्हे त्याने वेगवान सुरवातही केली होती. ह्या गरूड भरारीला, ताराबाईच्या पक्षाच्या कोणत्याच सरदाराने केला नाही असा अभूतपूर्व पराक्रम कान्होजीने केला होता. बहिरोपंत पिंगळे लोहगडावर जाऊन तिथून निळो बल्लाळ चिटणीस यांच्या समवेत आंगऱ्याच्या बंदोबस्ताची

योजना आखणार होते. तोच लोहगडावर चालून जाऊन त्यांचाच बंदोबस्त करण्याची योजना कान्होजीने कार्यवाहीतही आणली. त्याने लोहगड जिंकून घेतला आणि पेशवे बहिरोपंत पिंगळे आणि निळो बल्लाळ चिटणीस यांना पकडून कुलाब्याला अटकेत टाकले. स्वराज्याची इभ्रतच जणू वेशीवर टांगली गेली. आता तर आंगऱ्याच्या बंडाळीचा जास्तच जोर चढला. कर्नाळा वगैरे किल्ले घेऊन त्याने अगदी धुमाकूळ मांडला.

स्वराज्याचे नामवंत मुत्सद्दी, सेनानी ताराबाईच्या पक्षाला जाऊन नामशेष झालेले. परशुरामपंत प्रतिनिधी सारखे वृद्धपकाळाकडे झुकलेले मुत्सद्दी आता राजकारणातून अंग काढू पहात होते. पेशव्याला तर आंगऱ्याने कुलाब्याची हवा खायला पाठविलेले. आभाळ तर सगळीकडून फाटले होते. आणि ठिगळे तर सारी जीर्ण झाली होती. स्वराज्याच्या उदयाच्या पाठोपाठ अस्ताचा प्रसंग येऊन ठेपला होता. अशा वेळेस एकच ध्रुव तारा दिसत होता...बाळाजी विश्वनाथ.

थोराताच्या मागोमाग खटावकरांचाही बंदोवस्त करण्यात पंतांना यश लाभले होते. शाहूमहाराजांचा पक्ष स्वीकारल्यानंतर ज्या ज्या योजना पंतांनी आखल्या होत्या त्या त्या त्यांनी यशस्वी केल्या होत्या. योजना आखायच्या, पैसा उभा करायचा, सैन्य उभारायचे आणि त्या योजना कार्यवाहीतही आपणच आणावयाच्या. असे हे चतुरस्र कार्यकौशल्य होते पंतांचे आणि म्हणूनच आंगऱ्याने पिंगळ्यांना कुलाब्याला अटकेत ठेवण्याची वार्ता जेव्हा साताऱ्याला आली तेव्हा "बाळाजीपंताशिवाय कोणाच्या हातून हा प्रसंग निभावणार नाही." असे परशुरामपंत आणि खंडोबल्लाळ असे स्वराज्याचे श्रेष्ठ आणि ज्येष्ठ सेवक म्हणू लागले.

तेव्हा शाहूमहारांनी बाळाजी विश्वनाथांस सांगितले, " पंत, ही मोहीम तुम्ही अंगावर घ्यावी, अशी आमची इच्छा आहे. थोरात, खटावकर यांच्या प्रमाणे आंगऱ्याचा बंदोबस्त तुम्ही करा. आम्ही तुम्हांला पेशवेपद देऊ. "

हे बोलणे ऐकल्यावर विचारी मुद्रेने बाळाजी विश्वनाथ म्हणाले, ' महाराजांची आज्ञा मला प्रमाण आहे. पण पदाचा जोर माझ्या मागे असल्याशिवाय ही कामगिरी पार पाडणे जरा कठीण आहे. पेशवे पिंगळे यांना जरी अटकेत टाकले तरी पेशव्यांची गादी रिकामी पडलेली नाही, असे आंगऱ्यांना दिसले तर ते निश्चितच नरम येतील. नेमणुका छत्रपती स्वतःच्या मर्जीप्रमाणे करू शकतात, आंगरे बेफामपणा करू लागले तर सरखेलीची वस्त्रे छत्रपती दुसऱ्या कोणासही देऊ शकतात, हे आंगऱ्यांना कळायला हवे. "

पंतांचा हा युक्तिवाद शाहूला तात्काळ पटला. कालोचित मार्ग लगेच सुचणे हे फार मोठे वैशिष्ट्य होते पंतांचे. सेनाकर्ते बाळाजी विश्वनाथ म्हणून आंगऱ्यांच्या पुढे जाण्यापेक्षा पेशवा बाळाजी विश्वनाथ म्हणून जाण्यात काही दरारा होता, आणि त्यामुळेच अपेक्षिलेले काम होणार होते. हा दूरदर्शीपणा म्हणजे पंतांच्या कर्मकुशलतेचा एक तेजस्वी पैलू होता. बाळाजी विश्वनाथ समयज्ञ होते. प्रसंग पडेल तसे वागून आलेला प्रसंग धूर्ततेने निभावून नेण्याचे त्यांचे कौशल्य अप्रतिम होते. हे सर्व शाहूमहाराज जाणत होते आणि म्हणून लगेच मांजरी येथे बाळाजी विश्वनाथांना पेशवेपदाची वस्त्रे देण्याचा समारंभ देखील थाटामाटाने पार पाडण्यात आला.

लगेच मोहिमेची पूर्ण सिद्धता करण्यात आली. पेशवे बाळाजी विश्वनाथ कान्होजी आंगऱ्याच्या मोहिमेवर निघाले होते. शस्त्राला

शस्त्र अद्याप भिडावयाचे होते. डोक्यात मात्र विचारांची हातघाईची लढाई सुरू झाली होती.

–" पिंगळ्यांचा पराभव केल्याने आंगऱ्यांचे सामर्थ्य वाढले आहे. त्यांच्याशी मुकाबला करणे जडच आहे. पण आंगरे तरी स्वराज्याचेच सेवक, आरमाराचे प्रमुख आहेत. त्यांच्याचमुळे शिद्दी, इंग्रज, मोगल यांच्यापासून स्वराज्य सुरक्षित राहिले आहे. त्यांचा नाश करावयाचा का ? उजव्या हाताने डावा हात तोडावयाचा का ? ह्यापेक्षा युक्ती-प्रयुक्तीने त्यांना आपलेसे करण्यातच स्वराज्याचे हित आहे."

अशा विचारांची अगदी दाटी झाली होती पंतांच्या मनात. तरी विचारात वेळ न घालविता ते मोहिमेवर निघाले, लोहगडच्या दिशेने.

लोहगडावरच कान्होजीचा मुक्काम होता. पाठीवर हात ठेवून कान्होजी येरझाऱ्या घालत होता. त्याच्याही मनामध्ये विचारांचे थैमान माजून राहिले होते, असेच त्याची त्रस्त मुद्रा सांगत होती.

" पिलाजी, आम्ही शरणांगती पत्करावी म्हणता ?" मधेच थांबून मागे वळून कान्होजी म्हणाला.

बाजूला खाली मान वाकवून उभा राहिलेला पिलाजी शांतपणाने म्हणाला, " असे मी कुठं म्हणतो आहे ? आपण स्वराज्याचे सेवक आणि निष्कारण स्वराज्याच्या धन्याशी शत्रुत्व करण्यात काय अर्थ ? "

" स्वराज्याचे धनी कोण ?" कान्होजी म्हणाला.

" शाहूमहाराज. . .आता ताराबाईसाहेबांच्या पक्षाला उरलं तरी आहे कोण ? उगीच शब्दाच्या प्रतिष्ठेसाठी आपल्याच जिवाचा आटापिटा तरी कशाला करायचा ?" पिलाजीचे हे शब्द ऐकल्यावर कान्होजी म्हणाला, " पण पेशवे बाळाजी विश्वनाथ तर आमच्यावर चालून येत आहेत."

तेव्हा पिलाजी म्हणाला, " आपली इच्छा असेल तर ते आपल्या भेटीला चालतही येतील. तेही स्वराज्याचे सेवक. आणि आपणही स्वराज्याचे सेवक. दोघांनी हातमिळवणी केली तर दोघे मिळून मोगल, शिद्दी, इंग्रज ह्या स्वराज्याच्या शत्रूंना हां हां म्हणता खडे चाराल. आणि दोन हात करण्याचा प्रसंग आपसातच निर्माण केलात तर दोन आघाड्यावर लढणे आपणांसच जड जाणार आहे."

" खरं आहे ! " असे म्हणून कान्होजी गप्प झाला. त्याच्या येरझाऱ्या मात्र झपाट्याने होऊ लागल्या. पिलाजीने मात्र तिथून काढता पाय घेतला.

साताऱ्याहून निघालेली मराठी फौज लोहगडच्या पायथ्याशी लवकरच येऊन पोहोचली. राहुट्या, तंबू ठोकले गेले. मराठी फौजेची छावणी लोहगडच्या पायथ्याशी पडली. वातावरण कसे प्रसन्न होते. वाऱ्याने अवखळपणाने छावणीभोवती फेर धरला होता. त्याचा तो हूडपणा पाहून झाडे माना डोलवीत होती. वातावरणाची ही प्रसन्नता प्रसन्न मनाने पहात बाळाजी विश्वनाथ आपल्या शामियानाच्या बाहेर उभे होते. सभोवार फिरून आलेली त्यांची नजर समोरच्या लोहगडा-वर स्थिरावली होती. तो सारा आसमंत सह्याद्रीने वेष्टिलेला होता. सह्याद्रीच्या लहान मोठ्या डोंगरकड्यांनी संरक्षित असा तो भूप्रदेश होता. महाराष्ट्राचा साराच भूप्रदेश असा डोंगरदऱ्यात विखुरलेला आहे. आणि म्हणूनच महाराष्ट्राची स्वतंत्रवृत्ती कधी नष्ट झालेली नाही.–मागील बाजूला भाज्याचे, कार्ल्याचे डोंगर कसे ताठ उभे होते. सह्याद्री महाराष्ट्राचा पाठीराखा आहे, ह्याची ती मूर्तिमंत–साक्ष होती. समोरच्या लोहगडाने मात्र चिंतेचे वादळ निर्माण केले होते. माणसांच्या वृत्ती फिरल्या म्हणजे किल्लेकोटांचाही कणखरपणा कमी होतो. ज्याने स्वराज्याचे रक्षण करावयाचे तोच स्वराज्याचे भक्षण

करायला सिद्ध झाला होता. कुंपणाने शेत खाण्याचे असे हे प्रकार होतात, तेही माणसाच्या कर्माने आणि वैराण जागेवरही नंदनवन फुलविले जाते, तेही माणसाच्या कर्मानेच. ही सारी माणसाची कर्म-कुशलता आहे. हा सारा योग आहे.

इतक्यात कोणाच्या तरी आगमनाने पंतांच्या विचाराची साखळी तुटली. पंतांनी मागे वळून पाहिले. खाली वाकून मुजरा करून, मान खाली घालून एक सैनिक उभा राहिला होता. त्याला अगदी धाप लागली होती. थोडा वेळ त्याच्याकडे शांतपणे पाहिल्यावर पंतांनी त्याला विचारले, " काय बातमी आहे पिलाजी ?"

" काम बहुतेक फत्ते ! " पिलाजी म्हणाला, " परिस्थितीची जाण सरखेलाला आली आहे. जी सत्ता नामशेष होऊ पहात आहे, त्या सत्तेचा पाठपुरावा करण्यात हशील नाही, हे आंगऱ्याला पटले आहे. इंग्रज, शिद्दी यांच्याशी यशस्वी मुकाबला करायचा तर–स्वराज्याच्या इमानाला जागण्यातच फायदा आहे, हे त्याला कळून चुकलं आहे."

" म्हणजे आतापर्यंत चुकलेलं बरंचसं त्यांच्या लक्षात आलंय म्हणायचं. . . ." असे म्हणून मिनिट दोन मिनिटे विचारात घालवल्या-नंतर बाळाजीपंत झटकन् वळून म्हणाले, " पिलाजी, आम्ही भेटायला येत आहोत, असा आमचा निरोप जाऊ द्या."

" साऱ्या गोष्टी, अशा एकदम तडकाफडकी ठरविणं कदाचित् बरोबर होणार नाही . . . . काही दगा फटका–" पिलाजी चाचरत म्हणाला. पण पंत लगेच म्हणाले,

" सगळेच थोरात नसतात. आता साऱ्या गोष्टी एकदम तडका-फडकी करणंच योग्य आहे. तवा तापलेला आहे तोच पोळी भाजून –घेतली पाहिजे. चला. आंगऱ्यांच्या भेटीची व्यवस्था करा." असे म्हणून पंतांनी पिलाजीला निरोप दिला.

दा. क्र. ३२८१०



बाळाजी विश्वनाथांचा अदाज खरा ठरला. कान्होजी आंगरे भेटीसाठी लोहगडाखाली आला. दिलखुलास भेटी झाल्या आणि कुलाब्याच्या भेटीचे आमंत्रण पंतांना देऊन आंगरे कुलाब्याला परत गेला. पुढची बोलणी कुलाब्याला करावयाची असे ठरले.

ठरल्याप्रमाणे बाळाजी विश्वनाथ कुलाब्याला गेले. "आपण स्वराज्याचे सेवक अहात. सरखेल अहातच." बाळाजी विश्वनाथ कान्होजीला म्हणाले. त्यावर कान्होजी म्हणाला, "राजाराम महाराजांनी सरखेली आम्हांला बहाल केली. सहाजिकच ताराबाई-साहेबांच्या पक्षाला आम्ही रहाणे अगदी क्रमप्राप्तच–"

"पण शाहूमहाराज ही गोष्ट मानणार नाहीत, असे आपण का मानता ?" पंत म्हणाले, "दर्याची सरखेली आपल्याकडे आहेच. फार झाले तर शाहूमहाराजांच्या सहीशिक्क्याची नवी कागदपत्रे आपणांस करून देतो. मग तर झाले ?"

"आम्हांला मान्य आहे !" आंगऱ्याच्या या शब्दांनी बाळाजीपंत संतुष्ट झाले. रीतसर समझोता झाला. बहिरोपंत पिंगळ्यांची सुटका झाली. जंजिरेकर हबशांचा आणि आंगरे यांचा कलह होता, तोही बाळाजी विश्वनाथांच्या मध्यस्थीने सामोपचाराने मिटला. आंगऱ्या-सारखा सामर्थ्यसंपन्न सरदार शाहू-पक्षाला आणण्यांत बाळाजी विश्वनाथांनी जे यश मिळविले ते केवळ अनुपम होय. अडमुठेपणाने लढाईची भाषा वापरली असती तर सर्वनाश निश्चित होता; पण रक्तपात न करता हा अंत:कलह पंतांनी मोठ्या कुशलतेने मिटविला होता. एवढेच नव्हे तर आंगरे आणि पेशवे यांच्या सहकार्याने मराठी सत्ता पश्चिम किनाऱ्यावर स्थिरावली आणि बलिष्ठही झाली. ज्या शस्त्राचा घाव आपणावर बसायचा ते शस्त्र पंतांनी खुबीने शत्रु-पक्षाकडे वळविले. अंत:कलह मिटला, एवढेच नाही तर पश्चिम

सरहद्द सुरक्षित झाली. आणि उत्तरेकडील कारस्थाने खेळायला पेशवे मोकळे झाले. ही खरी कर्मकुशलता. जी कर्मकुशलता सत्पक्षाला जास्तीत जास्त यश मिळवून देते तिला योगच म्हटले पाहिजे.

**' योगः कर्मसु कौशलम् । '**

कान्होजीला पेशव्यांचा पाठिंबा मिळाल्याने कान्होजीने शिद्दी, पोर्तुगीझ यांचा ताबडतोब बंदोबस्त केला. सुवर्णदुर्गादि स्थळे स्वराज्यात आली. आंगरे शत्रूला कर्दनकाळ वाटू लागला. आता मराठी राजाची पश्चिम सीमा निश्चित झाली, निर्धास्त झाली. बाळाजी विश्वनाथांच्या दूरदृष्टीचे हे सुपरिणाम होते.

आंगरे प्रकरण मिटले. फौजेसह बाळाजी विश्वनाथ पेशवे साताऱ्याकडे परतले. तोच निजामाच्या नादाने कोल्हापूरकर संभाजी पुन्हा शाहूमहाराजांविरुद्ध कारस्थान खेळू लागल्याच्या बातम्या येऊ लागल्या.

" तुम्हांसारखे अतुल पराक्रमी सेवक असता, स्वामींनी या मन-सुब्याचा हृद्रोग वागवावा असा प्रकार नाही. " असे शाहूमहाराजांचे पत्र आले.

निजामाला दक्षिण पूर्ण परिचित होती. दक्षिणेला स्वतंत्र दौलत निर्माण करण्याची आकांक्षा तो बाळगून होता. त्यामुळे मराठ्यांच्या सत्तेला जबरदस्त विरोध निजामाचाच होता, हे बाळाजी विश्वनाथ प्रथम पासूनच जाणून होते. दक्षिण ताब्यात घेता घेता दिल्लीच्या वजिरीवरही निजामाने डोळा ठेवला होता. अब्दुल्ला सय्यद एक दिल्लीचा मातबर सरदार होता. हसनअली आणि हुसेनअली हे त्याचे दोन मुलगे सय्यद बंधू म्हणून दिल्लीच्या राजकारणात ओळखले जात होते. दिल्लीच्या वजिरीवर तेही नजर ठेवून होते. ह्या समान ध्येयामुळे

निजाम आणि सय्यद बंधू यांच्यात वितुष्ट निर्माण झाले होते. ह्या संधीचा फायदा बाळाजी विश्वनाथांनी पूर्णपणे उचलला. बादशहाने दाऊदखान पन्नी वगैरे सरदारांना सय्यदबंधूंविरुद्ध उठविले होते. दिल्लीत राजकारण रंगात येते आहे, असे पाहिल्यावर निजामास उत्तरेकडे जाणे भाग पडले. निजामाचा आधार तुटल्यावरोबर कोल्हापूरकर संभाजी आपोआपच गप्प बसला. बादशहाविरुद्ध गेल्याने सय्यदबंधूंनी मराठ्यांशी तहाचे बोलणे लावले. ज्या संधीची प्रतीक्षा चालली होती ती संधी चालून आली होती. पंतांनी त्या संधीचा पुरा फायदा उठविला. शाहू-सय्यद तह झाला. पुणे प्रांत स्वराज्यात समाविष्ट झाला. मराठ्यांचा बादशाही राजकारणात प्रवेश झाला.

सय्यदबंधूंशी झालेल्या तहाप्रमाणे मराठ्यांनी सय्यदबंधूंना मदत करावयाची असे ठरले होते. दिल्लीचा बादशहा सय्यदबंधूंच्या हातचे बाहुले ठरणार होता. आणि सय्यदांच्या अंगी हे सामर्थ्य मराठ्यांच्या मदतीमुळे येणार होते. जिथे स्वराज्याचीही घडी बसविणे कठीण कर्म झाले होते, तिथे आता मराठे दिल्लीचे राजकारण खेळणार होते. ह्याचा अर्थ असा की मराठी सत्ता ही आता भारतातील सर्वश्रेष्ठ सत्ता झाली होती. सय्यदांनी मराठ्यांचे सहाय्य घेतले होतेच, पण रजपूतही बादशहाशी झगडा झाल्यास मराठ्यांची मदत घेण्याची भाषा बोलू लागले होते. ही सारी किमया बाळाजी विश्वनाथांच्या कर्मकुशलतेची होती.

हुसेनअल्लीने दिल्लीमध्ये प्रवेश केला तो मराठ्यांची फौज घेऊनच. प्रथम तो माळव्यात असतानाच बादशहाने धाबे दणाणून घेतले. बादशहाने हुसेनअल्ली सय्यदशी तहाचे बोलणेही सुरू केले होते. हुसेन बादशहाचे म्हणणे मान्य करून परत फिरण्याच्या विचारात होता. पण दिल्लीत जाऊन शाहू पक्षाकडील सर्वांना ताब्यात घेतल्याखेरीज

उत्तर सोडायची नाही आणि दक्षिण गाठायची नाही असा मराठ्यांचा निश्चय झाला होता. आणि म्हणून ते माळव्यातून माघारी फिरायला तयार नव्हते. त्यामुळे हुसेनअल्लीचा नाइलाज झाला आणि त्याने सैन्यासह दिल्लीत प्रवेश केला. दिल्लीमध्ये जिकडे तिकडे मराठा सैनिक दिसत होता.पुढे अटकेवर झेंडा रोवण्याचे जे भाग्य मराठ्यांना मिळाले त्याची मुहूर्तमेढ ही अशी रोवली गेली. मराठी सरदारांचे लक्ष घरगुती भांडणातून काढून त्यांना बाहेरच्या उद्योगात लावण्याचा बाळाजीपंतांचा मतलब सिद्धीस गेला. मराठ्यांना नवे कार्यक्षेत्र मिळाले. तीस हजार फौजेनिशी हुसेन सय्यद दिल्लीवर चालून गेला होता. फौज बाहेर ठेवून त्याने बादशहाची भेट घेतली.

बादशहाने हुसेनअल्लीला विचारले, "मुईनुद्दीनखानास कैद करून तुम्ही आणले आहे, असे कळले. कुठे आहे तो ?"

"शाहूची मंडळी सोडून द्या म्हणजे त्यास आणतो." असे हुसेनने उत्तर दिले. प्रकरण चांगलेच विकोपास गेले. सय्यदांनी वाडा ताबड-तोब ताब्यात घेतला. कडेकोट नाकेबंदी झाली सगळीकडे. सय्यदांनी बादशहाला कैद केले आणि रफीउद्दराजत याला तख्तावर बसविले. आपण ठरवू तो दिल्लीचा बादशहा होईल अशी कर्तुमकर्तुम् अन्यथा कर्तुम् शक्ती सय्यदांच्या हाती आली होती. आणि ह्या शक्तीचे उगमस्थान बाळाजी विश्वनाथ पेशवे आहेत, हे मतलबी निजामानेही लगेच ओळखले. त्याने पेशव्यांशी नरमाईने वागण्याचे धोरण ठरविले. एवढेच नव्हे तर त्याने दिल्लीत पेशव्यांना थाटाची मेजवानीही दिली. दिल्लीच्या स्वारीचा असा हा गोड शेवट झाला.

सय्यदांनी बादशहाकडून स्वराज्याच्या सनदा मराठ्यांना देवविल्या. १६७४ मध्ये शिवछत्रपतींच्या राज्याभिषेकसमयी जेवढे मराठी स्वराज्य होते तेवढे स्वराज्य पुन्हा मराठ्यांच्या हाती आले.

याशिवाय स्वराज्याच्या बाहेरील मुलखात चौथाई, सरदेशमुखी वसूल करण्याचे हक्क मराठ्यांना मिळाले. ह्या बादशाही सनदा मिळाल्याने मराठेवीरांना केवढा आनंद झाला. "आकांक्षापुढती जिथे गगन ठेंगणे" अशा पराक्रमी मराठ्यांना पराक्रमाला नवे क्षेत्र मिळाले अशी ही दिल्लीवरची मराठ्यांची स्वारी मोठी फायद्याची ठरली, यशाची ठरली. मराठ्यांचे स्वराज्य निश्चित करून त्या स्वराज्याला साम्राज्याची वाट मोकळी करून देण्याचे महान कार्य या स्वारीने केले. खर्चाच्या दृष्टीनेही ही स्वारी महागात पडली नाही. पेशव्यांना दररोज फौजेच्या खर्चासाठी ५०,००० रुपये बादशाही खजिन्यातून मिळत होते. त्यातील निम्मी रक्कम खर्च होत होती. आणि निम्मी रक्कम साताारच्या खजिन्यात जमा होत होती.

युद्धाच्या शेवटी तीस लाख रुपये छत्रपतींच्या जामदारखान्यात जमा झाले होते. ही स्वारी मराठी सत्तेच्या स्थापनेच्या आणि विकासाच्या दृष्टीने जितकी क्रांतिकारक ठरली तितकीच ती व्यावहारिक दृष्ट्याही नफ्याची ठरली. बाळाजीपंतांची ही कर्तबगारी पाहिली म्हणजे खरोखरच वाटते, "कौशल्य सारे रचनेत आहे."

> "महाराजांची सेवा निष्ठेने करून, 'मर्द व शहाणे' ऐसा लौकिक वाढवून, महाराजांची कृपा संपादून प्रधानपद मिळविले; जीवाभ्यश्रम करून शत्रू पराभवाते पाववून महाराजांच्या राज्याचा बंदोबस्त केला."


ही बाळाजी विश्वनाथांच्या कार्याची इतिहासाने दिलेली पावती आहे.

शिवाजीमहाराजांच्या वेळची धोरणे, कारस्थाने व उमेदी पुन्हा मराठमंडळाच्या दृष्टीपुढे बाळाजी विश्वनाथांनी नवीन स्वरूपात

खेळविल्या. परिस्थितीचे स्वरूप ते तावडतोब लक्षात घेत आणि त्याप्रमाणे पावले टाकत. स्वकीयांच्या सामर्थ्याचा तर त्यांनी उत्तम उपयोग करून घेतलाच; पण सय्यदांसारख्या परकीयांचाही योजकतेने उपयोग करून मराठी राज्य बाळाजी विश्वनाथांनी वाढविले. ह्या त्यांच्या अप्रतिम कौशल्यामुळेच मराठी राज्यात नवा मनू अवतरला.

हा बाळाजी विश्वनाथांचा योग; कारण योग म्हणजे कर्मकुशलता.

'योगः कर्मसु कौशलम्।'





फितुरीची बसली जेथे अढी । ती उडविली थोरातांची गढी ।।



हे खड्ग कलम मीलन । सुखवी आनंदवनभुवन ।।

मराठी ग्रंथ ... वाचनालय शाखा
अनुक्रम ... वि ...
क्रमांक ... नोंद दि ...



# चतुर नाना

माहादेवाच्या देवळात भाविकांनी अगदी गर्दी केली होती दर्शनासाठी. "काशीस जावे। नित्य वदावे।" ही नुसती इच्छासुद्धा भाविकांच्या अंत:करणाला सुखविते. अशा भावनेने घेतलेले महादेवाचे दर्शन कोणा भक्ताच्या हृदयाला प्रेमाचे भरते आणणार नाही ? परमेश्वरदर्शन घेऊन संतुष्ट-मन झालेले लोक आनंदाने शिवमंदिरातून बाहेर पडत होते. जे क्षेत्र निवासी असत, ते आपआपल्या घरी जात होते. दैनंदिन व्यवहार त्यांची वाट पहात असत. यात्रिक असत ते गंगातीरावर जात होते. त्या प्रशांत गंगाकाठावर बसून मन अधिकच प्रसन्न करण्यासाठी ते मोठ्या लगबगीने तीराकडे जात होते. सर्वांना पावन करणारी गंगामातादेखील लहरींच्या रूपाने घाईने त्यांना सामोरी येत होती. पंडितराज जगन्नाथाच्या नशिबी असलेले तिचे वात्सल्य जणू काही सगळ्यांच्याच वाट्याला येत होते. त्यामुळे उल्हसित झालेली सारीच पावले मोठ्या लगबगीने घाटाच्या पायऱ्या उतरीत होती. मात्र मागासलेल्या रेंगाळलेल्या दोन पावलामध्ये ही अधीरता दिसत नव्हती.

एक सडसडीत बांध्याचा उंच अंगकाठीचा विशीतला तरुण अगदी जड पावलांनी घाट उतरीत होता. अंगावर एक उपरणे टाकलेले होते. बगळ्याच्या मानेसारख्या उंच मानेवर रुळणाऱ्या शेंडीची गाठ बांधलेली होती. हात डोक्यावरून फिरविण्याची विशिष्ट लकब आणि पाणीदार डोळे, ह्या दोनच गोष्टी कोणाचेही लक्ष वेधून घेण्यास पुरेशा होत्या. त्यामुळे जाणारा येणारा प्रत्येकजण एकदा तरी त्या तरुणाकडे वळून पहात असे. आणि पाहिल्यावर मात्र त्याच्या चेहऱ्यावरचे गांभीर्य पाहून जास्तच बुचकळ्यात पडत असे. हा तरुण इतका विचारात पडण्याचे कारण तरी काय ? हा प्रश्न मात्र पुन्हा पुन्हा त्यांना त्याच्याकडे पहायला लावीत असे. आणि ते पहातही होते एकसारखे त्याच्याकडे. त्याचे मात्र त्यांच्याकडे मुळीच लक्ष नव्हते. त्याचे लक्ष होते, त्याच्या हातातल्या एका चुरगाळलेल्या कागदाकडे. शेवटी पायऱ्या उतरता उतरता तो बाजूच्या एका चौथऱ्याकडे गेला. बाजूची एकांताची अशी जागा पाहून आणि अंगावरच्या उपरण्याने तिथली ती जागा जराशी झटकून तो खाली बसला. हातातला चुरगाळलेला कागद त्याने साफ केला आणि आपल्या तीक्ष्ण दृष्टीने त्या कागदावरचे शब्द आणि त्या शब्दामागल्या भावना समजून घेण्याचा तो प्रयत्न करू लागला. त्या कागदावर शब्द होते–

" नाना, एकदा तुला भेटायची इच्छा आहे. जर तुला या नानाची काळजी असेल तर मी मरायच्यापूर्वी एकदा ये. "

ह्या शब्दांनी सारा भूतकाळ त्या तरुणाला स्पष्टपणे आठवू लागला –

पितृछत्राला पारखे होण्याचे दुर्दैव लहानपणीच त्याच्या नशिबी आले होते. भटांच्या बरोबरच भानूंचे घराणे कोकणातून देशावर आले होते. स्वराज्याच्या सनदा दिल्लीतून बाळाजी विश्वनाथ घेऊन

जाणार ही घटना अनेकांच्या मनाला जाचणारी होती. बाळाजी विश्वनाथांना मारण्याचे कारस्थान दिल्लीत शिजत असल्याचा वास त्यांच्याबरोबर दिल्लीला गेलेल्या बाळाजीपंत भानूंना आला होता. त्यांनी स्वत:च्या प्राणांचा मोबदला देऊन बाळाजी विश्वनाथांचे प्राण वाचविले होते. त्या भानूंच्या वंशाचा हा कोवळा अंकुर, त्यांचा नातू बाळाजी जनार्दन भानू, पेशव्यांनी आपलेपणाने जतन केला होता. "हा नाना सर्वांचे क्षेम पाहील." असा विश्वास सदाशिवराव भाऊंनी कितीतरी वेळा व्यक्त केला होता. त्या प्रेमानेच त्यांनी त्याला आपणाबरोबर पानिपतलाही नेले होते. जेव्हा युद्धाचा सारा रागरंगच बदलला आणि अखेरच्या गर्दीत भाऊसाहेब दिसेनासे होऊन स्वराज्यावर एकदम जो प्रलयकाळ ओढवला तेव्हा पार्वतीबाईचे म्हणजे सदाशिवरावभाऊंच्या पत्नीचे सांत्वन करताना नानाची आई म्हणाली होती, "हा नाना तुमचाच आहे. त्याच्याकडे पाहून तरीशोक आवरा." त्या पानिपतच्या प्रलयातून जे जिवानिशी जगून वाचून महाराष्ट्रात परतले त्यांना किती हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या होत्या. कमरेला शुद्ध लंगोटी लावून, काटयाकुटयांनी अंग ओरबाडून घेऊन आणि प्रसंगी बोरीबाभळीचा पाला पचवून दिवस काढावे लागले होते. मुसलमान सैनिक पळून जाणाऱ्या काफिरांना शोधून काढण्यासाठी जंगजंग पछाडत होते. झाडीत कोणी लपून बसले असतील ह्या संशयाने ते खसाखस भाले खुपशीत. भाल्याचे आघात सहन करावेत पण हूं का चूं करू नये. असा वनवास काढत नाना कसावसा दक्षिणेत आला. पण पितृवत् भाऊसाहेब नाहीसे झाले, इतरही प्रेमाच्या माणसांची ताटातूट झाली, ह्यामुळे मनाला विरक्ती येऊन नानासाहेब पेशव्यांची अनुज्ञा घेऊन नाना काशीयात्रेला आला होता. पण विश्वेश्वराचे दर्शन नशीबी नव्हते. एका क्षेत्राच्या ठिकाणी महादेवाच्या देवळात महादेचे दर्शन घेत असतांनाच हातात नानासाहेबांची चिठ्ठी पडली.

"नाना, ह्या नानासाठी लवकर ये."

अंतःकरणाच्या गाभाऱ्यातला विश्वेश्वर म्हणाला,

"नाना, त्या नानासाठी लवकर महाराष्ट्रात जा."

जे कार्यरत असतात त्यांच्या कार्याच्या आड देवधर्म ह्या गोष्टी कधीच येत नाहीत. देवधर्म हा त्यांचा योग नसतो. कार्यकुशलता हा त्यांचा योग असतो.

**'योगः कर्मसु कौशलम्।'**

नाना त्याच पावली दक्षिणेकडे येण्यासाठी निघाला. दैवगती वेगळी होती. पारनेरला मुक्काम असतानाच नानासाहेब पेशव्यांच्या शोकजनक देहांताची कटु वार्ता त्याला ऐकावी लागली. पानिपतच्या पराभवाचे दुःख सह्य वाटावे असा हा दुःसह प्रसंग आला होता–स्वराज्यावर. शोकाच्या समुद्रात देश बुडून गेला होता. पेशवाई पोरकी झाली होती. अशा खडतर प्रसंगी धीराचा हात देण्यासाठी नानाने मन खंबीर केले.

माधवरावांना शाहूमहाराजांनी पेशवाईची वस्त्रे दिली. आणि बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना भानू नाना फडणीस झाले. कर्तबगार माधवरावांच्या यशस्वी कारकीर्दीत पेशवाई पुन्हा सावरली गेली, स्वराज्य पुन्हा आकाराला आले आणि नाना बापूंच्यासारख्या कारभाऱ्यांना कार्यकुशलतेचे धडे मिळाले. पण माधवरावांच्याप्रमाणेच हे भाग्यदेखील अल्पायुषी ठरले.

ज्याचे पोरपण अजून पुरते सरले नव्हते त्या नारायणाला–पेशवाईची वस्त्रे देण्यात आली. पण त्यालाही शोभणार नाही असा पोरकटापणा राघोबादादाने आरंभिला. थोरल्या माधवरावांनी शिस्तीची, न्यायाची जी मुहूर्तमेढ रोवली होती ती ज्यांनी पाहिली

होती, त्या नाना फडणिसांना ही सारी अशुभ लक्षणे वाटू लागली. अशुभसूचक लक्षणे अशुभ असतात; पण कधी असत्य ठरत नाहीत, हाच अनुभव नानांच्या नशिबी होता. राघोबादादाच्या घरभेदेपणाचा कळस झाला. त्याच्या बाईलबुद्धीपणाला मर्यादा राहिली नाही. "अटकेवर झेंडे फडकविणारे तुम्ही नुसते थोर आणि सिंहासनाचा मालक मात्र तो शेंबडा पोर." ह्या आनंदीबाईच्या शब्दांनी आग लावली. त्या आगीत राघोबाची सद्सद्विवेकबुद्धी पार जळून खाक झाली. 'ध' चा 'मा' झाला. नारायणाची आहुती पडली. स्वराज्यात सैतानाचा थयथयाट सुरू झाला. पेशव्यांच्या सिंहासनावर राघोबाच्या रूपाने सैतानच बसला आहे, असे जे स्वराज्याचे निष्ठावंत सेवक होते त्यांना वाटल्याशिवाय राहिले नाही. आता ह्या स्वराज्याचे रक्षण कसे होणार ही तळमळ नानांना झोप येऊ देईना. हे बोलण्याचीही चोरी होती. पण हरिपंत, शास्त्रीबुवा आणि बापू अशी माणसे भेटली की ती तळमळ शब्दांनी व्यक्त झाल्याशिवाय रहात नव्हती. "पंत, थोरल्या रावसाहेबांनी जोपासना केलेल्या ह्या स्वराज्य-वृक्षाला लागलेली ही कीड कशी दूर करावी, ही विवंचना रात्रंदिवस आमच्या मनाला टोचणी देत आहे." असे नाना म्हणाले म्हणजे पंत आणि मामा पेठे नुसता हुंकार देऊन गप्प बसत.

त्यांचे हे मौन रामशास्त्रींची तळपायाची आग मस्तकी नेत असे. ते खवळून म्हणत, "काय खुनी पेशवा तुम्ही सिंहासनावर राहू देणार ?"

"शास्त्रीबुवा राग येणं स्वाभाविकच. पण आपल्या रागाला फळ कसे येणार ? सारी सत्ता दादांची. त्यांना सिंहासनावरून आपण खाली कसे उतरविणार ? तो प्रयत्न अशक्यच. पण समजा केलाच प्रयत्न तर बखेडा होणार; दुही निर्माण होणार. गृहछिद्रे चव्हाटयावर मांडल्याप्रमाणे होणार. निजामासारखी कोल्ही कुत्री स्वराज्याचे लचके तोडायला तयारच आहेत."

नानांचा हा तर्कशुद्ध विचार ऐकून शास्त्रीबुवा काहीच बोलले नाहीत. सखारामबापू बोकील मात्र शांतपणे म्हणाले, " नाहीतरी चौथाई सरदेशमुखी सारखे हक्क बुडविण्याचा आणि जमले तर स्वराज्यातही पुंडावा करण्याविषयीच्या आरंभीच्या हालचाली निजामाने सुरू केल्या आहेत, अशा बातम्या आहेत. "

" निजामाचा बंदोबस्त व्हायला हवा. " हरिपंत फडके म्हणाले.
" मग पेशवे म्हणून ही कामगिरी दादांनीच पार पाडली पाहिजे. अटकेवर भगवा झेंडा रोवणाऱ्यांना स्वराज्याच्या सरहद्दीवरचा डळमळू पहाणारा भगवा झेंडा पुन्हा भक्कमपणे रोवणे काहीच कठीण नाही. " तिरक्या हेतुपूर्ण नजरेने बापूंच्याकडे पहात नाना म्हणाले.

बापूही त्यांच्या नजरेला साथ देत म्हणाले, " बरोबर आहे नानांचे म्हणणे आणि त्यांनी सुचविलेला मार्ग. बाजू अगदी बिनतोड ! "

" म्हणजे ? " त्रिंबकराव मामा पेठे म्हणाले.

" मामा, " बापू म्हणाले, " दादा सत्ताधीश असल्याने त्यांना सिंहासनावरून खाली उतरा, असे म्हणण्याची आपली प्राज्ञा नाही. पण निजामाचे पारिपत्य करण्यासाठी आपण पुण्याबाहेर पडा, असे मोठ्या गौरवाने त्यांना म्हणता येईल... असेच की नाही नाना? "

" असंच ! दादांच्यासारख्या पराक्रमी पुरुषोत्तमाखेरीज निजामाचं पारिपत्य करण्याचं हे अवघड कार्य दुसरं कोण करणार ? " आपल्या खोलगट गालावर हात ठेवत नाना म्हणाले.

" निजामाचा बंदोबस्त झाल्यावर–" हरिपंत बोलत होते. पण त्यांना पुरते बोलू न देता नानाच झटकन म्हणाले,

" ते परत पुण्यात येणार नाहीत, नव्हे येऊ शकणार नाहीत हा बंदोबस्त पंत, मामा तुमच्याकडे. "

" आलं लक्षात ! " त्रिंबकराव मामा आणि हरिपंत म्हणाले.

" आता ते कार्यवाहीतही आलं पाहिजे. " असे म्हणून नाना बापूंच्याकडे वळून म्हणाले, " बापू, रघुनाथरावदादा पुणे निर्धास्तपणे कारभाऱ्यांच्या हाती सोपवून स्वारीसाठी निघतील अशी कारवाई झाली पाहिजे. "

बापूंनी ह्या गोष्टीला मान्यता दिली. स्वराज्याच्या रक्षणासाठी एक नवा डाव नानांनी मोठ्या कुशलतेने टाकला. एक श्रेष्ठ दर्जाचा मुत्सद्दी पण आपणांस काही विशेष महत्त्व स्वराज्यात मिळावे या इच्छेच्या आहारी गेल्याने मधूनच राघोबाच्या पक्षाला झुकू पहाणारा सखारामबापू बोकील याच्यासारख्या पाताळयंत्री माणसालासुद्धा नानांनी मोठ्या कौशल्याने आपल्या कह्यात ठेवले होते. रामशास्त्री, हरिपंत आणि त्रिंबकराव मामा ही तर हक्काचीच माणसं होती. शिवाय पानसे, पटवर्धन, भोसले, शिंदे, होळकर ह्या इतरही मातबर सरदारांना नानांनी आपलेसे करून घेतले. नानांनी सर्वांना मोठे कळकळीचे आवाहन केले. " चार पिढ्या ज्याचे अन्न भक्षियले त्याचे सार्थक करावे असे चित्तात आणून सखारामपंत, मोरोबादादा, त्रिंबकरावमामा, साबाजी भोसले वगैरेंनी मिळून कारस्थान केले. शिंदे होळकरही येणार. " असे त्यांनी स्वराज्याच्या एकनिष्ठ सेवकांना कळवून राघोबादादाविरुद्ध सर्व राजकीय वातावरण पूर्णतया तयार केले.

" दादासाहेबांच्याखेरीज निजामाचा बंदोबस्तच अशक्य. " अशी बापूंची साखरपेरणीची भाषा मोठी यशस्वी ठरली. " बाईसाहेबही बरोबर येत असल्या तर काय–अधिकस्य अधिकं फलम् । " ह्या नानांच्या वाक्याने तर बहारच करून टाकली.

राघोबादादांनी पुणे सोडले. सैन्यासह राघोबा निजामाच्या स्वारीवर गेला. पहिला मुक्काम पंढरपुरी पडला.

मात्र तो पंढरपूरचा पांडुरंग राघोबाला पावण्याऐवजी नाना वगैरे

मुत्सद्यांनाच पावला. ह्या मुत्सद्यांचे कारस्थान, बारभाईचे कारस्थान यशस्वी झाले. पुण्याची वाट राघोबाला बंद झाली. पानसे, पेठे यांनी पार नाकेबंदी करून टाकली. नारायणरावाची गर्भवती पत्नी गंगाबाई हिच्या नावाने नानांनी प्रथम कारभार सुरू केला. अंतर्गत फितुरीला काही मर्यादा राहिली नव्हती. तरीसुद्धा मोठ्या सावधानतेने नाना स्वराज्याचा कारभार करीत होते. गंगाबाईला मुलगा झाला. बारभाईच्या कारस्थानाला यशाची उमेद आली. त्या मुलाचे नाव नानांनी सवाई माधवराव असे ठेविले. अधिक सुरक्षिततेसाठी नानांनी गंगाबाईला आणि छोट्या माधवाला पुरंदरला ठेविले. नानांना माणसांची पारख फार उत्तम होती. त्यांनी बालमाधवाच्या संरक्षणाची सारी जबाबदारी पुरुषोत्तम दाजी पटवर्धन नावाच्या स्वामीनिष्ठ सेवकावर सोपविली. फितुरीचा प्रवेश पुरंदरसारख्या भक्कम दगडी किल्ल्यातही झाला होता. एकदा एक कुणबीण किल्ल्यात प्रवेश करीत होती. तिची कावरीबावरी नजर इतरांच्या नजरेतून निसटली; परंतु दाजींनी मात्र तिची झडती घ्यायला लावले. आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, त्या कुणबिणीच्या केसांच्या बुचड्यात छोटीशी सुरी निघाली. माधवाचे प्राण वाचले. दाजींच्या चातुर्यामुळे आणि नानांच्या योजकतेमुळे.

अल्पवयी माधवाला पेशवाईची वस्त्रे शाहूमहाराजांकडून आली. आणि नाना पेशव्यांचा पेशवा म्हणून कारभार पाहू लागले. राघोबादादास पुण्याबाहेर काढून नानांनी जरी गृहकलह तात्पुरता मिटविला होता तरी स्वराज्यावरच्या साऱ्याच संकटांचे निरसन झाले नव्हते. म्हैसूरचा हैदरअली व कोल्हापूरकर छत्रपती यांनी थोडी हालचाल सुरू केली होती. अल्पवयी पेशवा आहे. बघावे हल्ला करून. त्यांची मनोराज्ये मनोराज्येच ठरली. त्यांना बेवारशी, निराधार, वाटलेले मराठ्यांचे स्वराज्य बेवारशी नव्हते, निराधार नव्हते. नानांच्या

मुत्सद्दीपणाचा फार मोठा आधार लाभला होता त्याला. हरिपंताकडून नानांनी हैदरची लुडबूड बंद केली होती आणि महादजी शिंद्यांना हाताशी धरून कोल्हापूरकरांची वटवट थांबविली होती. शिवाय महादजी आणि हरिपंत दोघेही तुल्यबल ठरले होते.कोणीही एकजण डोईजड होणार नाही अशी काळजी नानांच्या डोक्याने घेतली होती. स्वत: त्यांनी शस्त्र हातात धरले नाही; पण पंत किंवा महादजी यासारख्या शस्त्रधारींना हाताशी धरून स्वराज्यरक्षणाचे डावपेच ते यशस्वीपणे लढवीत. हीच नानांची कर्मकुशलता होती.

राघोबाला स्वराज्याबाहेर काढून नाना स्वराज्याचा कारभार करीत होते. पण स्वराज्याबाहेर पडलेला राघोबा मात्र स्वस्थ बसला नाही. त्याच्या अंगात कली पुरताच संचारला होता. स्वार्थासाठी तो स्वराज्यावरही निखारे ठेवण्यास सिद्ध झाला. तो सुरतेला गेला. तिथे इंग्रजांचे ठाणे होते. त्याने इंग्रजांची मदत मागितली. स्वत:ला पेशवेपद मिळण्यासाठी. "इंग्रजांनी आपल्याला पुण्याला नेऊन सिंहासनावर बसवावे. आपण इंग्रजांना साष्टी वगैरे मुलूख देऊ." अशी राघोवाने इंग्रजांशी बोलणी केली. इंग्रजांना हवी असलेली संधी आयतीच चालून आली. ती सोडण्याइतके इंग्रज दुधखुळे नव्हते. त्यांनी तह मान्य केला आणि राघोबाला मदत करण्याचे ठरविले.

आता नानांच्या पुढे हा नवा पेच आला. साष्टी वगैरे सव्वीस लक्षाच्या मुलुखावर उदक सोडून राघोबाने इंग्रजांना प्रसन्न करून घेतले होते. कर्नल कीटिंग सैन्य घेऊन राघोबाच्या मदतीला निघाला. तो राघोबाला घेऊन पुण्याला येणार आणि पुण्याचे पुण्य मळणार, ही सारी अशुभ लक्षणे नानांनी ओळखली आणि त्यावरचा तोडगाही नानांनी शोधून काढला. . . .स्वत:च्या बैठकीच्या खोलीत नाना बराच येरझारा घालीत होते. नेहमीच्या लकबीप्रमाणे डोक्यावरून एक

दोनदा हात फिरला. मागे वळून हेतुपूर्ण दृष्टीने त्यांनी एकदा पाहिले. त्यांचा नेहमीचा लेखनिक लोडापाशी बसला होता. ते काही तरी पुटपुटले. त्या लेखनिकाला मात्र ते उमगले. जुन्नरी कागदावर काळी मोत्याची अक्षरे उमटली. लखोटा तयार झाला आणि स्वार घोड्यावर मांड टाकून चपळाईने निघालाही.

कर्नल कीटिंगचे सैन्य घेऊन राघोबा पुण्याला येण्याच्या उद्देशाने निघालाही होता. पण कळ अचूक फिरली गेली होती. कलकत्त्याच्या ब्रिटिश कंपनीचा स्वार घाईने आलेला सुरतेच्या इंग्रजांनी पाहिला, सगळ्यांच्या नजरांनी प्रश्नचिन्हे धारण केली. तो स्वार कर्नल कीटिंगच्या कानाशी लागला. अगदी थोडाच वेळ. आणि कर्नलचा हुकूम फिरला साऱ्या पलटणीत.

" परत, सुरतेच्या वखारीत. "

राघोबाला हा काय प्रकार आहे, हेच कळेना. कर्नल कीटिंग त्याला म्हणाला,

" कलकत्त्याचे गव्हर्नर जनरल लॉर्ड वॉरन हेस्टिंग्स् ह्यांचा हुकूम आहे परतण्याचा. पुण्याचे मुत्सद्दी कंपनीशी तह करीत आहेत. "

राघोबाची निराशा झाली होती, नानांनी डाव पुरता उलटविला होता. लॉर्ड हेस्टिंग्ज्च्या वतीने कर्नल अॅप्टन पुरंदरला आला. साष्टी भडोच वगैरे सहा लक्षांचा मुलूख इंग्रजांना देऊन राघोबाला ताब्यात घेण्याचा तह नानांनी केला. सुरतेच्या तहाला पुरंदरच्या तहाने शह दिला.

इंग्रज महाकारस्थानी. ह्या तहाने ते स्वस्थ बसणारे नव्हते. मराठ्यांच्या राज्यात हात शिरकवण्याची एक संधी हुकली. एवढ्या-वर हिंमत गमावणारे इंग्रज नाहीत, हे नानासुद्धा जाणून होते. तसे मराठ्यांच्या दुर्दैवाने घरभेद्यांचे अमाप पीक आलेले ते पहात होते.

फितुरीची जखम अधिकाधिक चरत चालली होती. इंग्रज, हैदर निजाम यांसारखे शत्रू व्रणावर चोची मारायला टपून राहिले होते. अशा परिस्थितीतही स्वराज्य टिकवायचे म्हणजे मोठी कठीण समस्या होती. ती सोडविण्यातच खरी परीक्षा होती.

पुरंदरचा तह पाळण्याची शक्य तितकी टाळाटाळ इंग्रज करीत होते. तशातच इंग्रजांना पुन्हा एका घरभेद्याचे आमंत्रण मिळाले. पेशव्यांच्या घरातले भाऊबंदकीचे दुष्परिणाम नाना निस्तरत होते. तोच स्वत:च्याच घरातल्या भाऊबंदकीचे चटके सहन करण्याचे त्यांच्या नशिबी आले. "नाना मुत्सद्दी असले तर मीही मुत्सद्दी आहे. नानाइतकाच मलाही मान मिळावयास हवा." अशी भाषा नानांचे बंधू मोरोबादादा बोलू लागले होते. त्यांच्या विचाराला अनुकूल प्रतिसादही मिळू लागले. नानांचे राजकारणातले वाढलेले प्रस्थ ज्या दरबारी लोकांना पहावत नव्हते ते मोरोबादादांच्या बाजूने तुणतुणे वाजवायला उभे राहिले बजाबा पुरंदरे व तुकोजी होळकर यासारखे मातबर सरदार मोरोबादादांच्या पक्षाला मिळाले. इंग्रज लक्ष देऊनच होते, ह्या साऱ्या गोष्टीकडे. मोरोबा त्यांच्याशी करार-मदाराच्या भाषा बोलू लागले. नाना-महादजींची युती होळकराला पहावत नव्हती म्हणून होळकरांचे भरभक्कम सहाय्य मिळाले मोरोबा-दादांच्या पक्षाला. असे सारे कारस्थान शिजत गेले आणि मोरोबादादा त्या कारस्थानाची सांगता करण्यासाठी मॉन्स्टिनसाहेबाला जाऊन भेटलाही. इंग्रजांची फौज मदतीला घेऊन राघोबादादाने पुण्यास प्रवेश करावा आणि पेशव्यांची गादी सांभाळावी आणि मोरोबा-दादांनी फडणिशी स्वीकारावी, अशी सारी पद्धतशीर आखणी झाली. नव्हे हालचालीही सुरू झाल्या.

पुरंदरावर बालपेशव्याचे रक्षण डोळ्यात तेल राखून करत असताना

स्वराज्यावरची ही नवी अभ्रे नाना पहात होते. बापू, होळकर, बजाबा वगैरे ही सारी मंडळी आता म्हणू लागली होती की–

दादांनी वडीलकीच्या नात्याने कारभार पहावा. नानांचा संबंध नाही.

"गाड्यांना हाताशी धरून पुतण्याचा वध करणारा खुनी पेशवा जोपर्यंत गादीवर आहे तोपर्यंत पुण्यात पाणी घेणार नाही." असे म्हणणाऱ्या रामशास्त्रींच्या न्यायी दृष्टीला मान देऊन बारभाईनी खुनी पेशवा पुण्याबाहेर काढला होता. त्याच खुनी पेशव्याला त्याच पुण्यामध्ये राजरोस आणण्याचे प्रयत्न चालले होते. एवढेच नव्हे तर ज्या गाडदी पठाणांच्या साहाय्याने नारायणाच्या खुनाचे कारस्थान पूर्णत्वाला गेले होते त्याच गाडदी पठाणांचे साहाय्य ह्याही कारस्थानात घेतले जाणार होते.

ह्या साऱ्या गोष्टींचा मोठ्या गंभीरपणाने नाना विचार करीत होते. पुरंदरच्या एका बुरुजावर नाना आणि पुरुषोत्तम दाजी शिळोप्याच्या गप्पा करीत होते. स्वामीनिष्ठ मुत्सद्द्यांच्या शिळोप्याच्या गप्पांना स्वराज्यरक्षणाशिवाय दुसरा विषय नसतो.

"कुणबिणीच्या बुचड्यात सुरी सापडली, ह्याचा अर्थ दादा-बापूंच्यासारख्या राहूकेतूंची दृष्टी आता परत पुण्याकडे वळली, असा आहे." पुरुषोत्तमदाजी म्हणाले.

"बरोबर आहे तुमचा कयास, दाजी." नाना म्हणाले, "आणि आता तर काय आमचे बंधूच सूत्रधार झाले आहेत. मॉन्स्टिनसाहेबाकडे त्यांच्या वाऱ्या सुरू झाल्या आहेत." "मॉन्स्टिन साहेबाकडचे खेटे, हैदर-निजामांचे गंडेदोरे आणि गाडदी पठाणांचे अंगारे धुपारे अशा ह्या साऱ्या मार्गांनी स्वराज्याच्या अस्ताची आसुरी स्वप्ने ही दिवाभीते पाहू लागली आहेत." दाजींचे हे शब्द ऐकल्यावर नाना खिन्नतेने म्हणाले, "आपल्याच लोकांचे हे चाळे पाहिले की मन अगदी खिन्न

होते आणि....अरे अरे तो माधव पहा रांगत अगदी कडेला गेला. दाजी उचला लबाडाला." "काय महाराज, काय विचार आहे ?" असे म्हणून दाजींनी छोटचा माधवाला उचलून घेतले...थोडे थांबून दाजी परत नानांना म्हणाले, 'इतर कोणत्याही गोष्टी माझ्या मनाला घाबरवीत नाहीत. पण तुमच्या मनाची खिन्नता पाहिली म्हणजे मात्र मनाची सारी उमेद खचून जाते. हैदर, निजाम, इंग्रज, गाडदी, पठाण सगळे एकदम आले तरी आम्ही त्यांना पुरे पडू. तुमच्या खंबीर-मनाचा पाठिंबा तेवढा हवा."

"तुमची निष्ठा जाणतो मी." नाना म्हणाले, "पण सत्तेसाठी आपसात भांडून इंग्रजासारख्याला आपल्या घरात घ्यायचे त्यापेक्षा सत्तेची अभिलाषा सोडावी, असं वाटतं. स्वराज्याची धूळधाण करणाऱ्या परक्यांची पावले राष्ट्राच्या उंबरठचा आड पडू देऊ नयेत... दाजी ते दूरवर धुळीचे लोट कसले ? कोणी तरी स्वार छाती फुटे-पर्यंत घोडा पिटाळीत येत आहे. संकटे आता घोड दौडीने येऊ लागली म्हणावयाची. "चला खाली सदरेला जाऊ." असे म्हणून नाना बुरुजाच्या पायऱ्या उतरू लागले. बाल माधवाला घेऊन दाजीसुद्धा त्यांच्या मागोमाग निघाले.

नाना खाली दिवाणखान्यात येत स्तवर तो स्वार गड चढून आला होता. नानांना मुजरा करून त्याने नानांच्या पुढे लखोटा टाकला. दाजींनी लखोटा सोडला. आतील कागद काढून त्यावर त्यांनी एकवार आपली दृष्टी फिरवली... संतापाने तो कागद लखोटचात कोंबून आणि लखोटा नानापुढे टाकत दाजी म्हणाले, "स्वराज्याच्या मानगुटी बसलेल्या भुतांची उलटी पावले वाट चालू लागली. स्वराज्याबाहेर दिग्विजयासाठी बाहेर पडून अटकेवर झेंडे पुण्याच्या शनिवारवाडचा-वर फडकविण्यासाठी पुण्याकडे येत आहेत...... औरंगाबादेहून गाडद्यांचे सैन्य पुण्याकडे निघाले आहे, अशी बातमी आहे."

'ठीक!' नाना शांतपणाने, "भुते जरी येत असली तरी त्यांचेही स्वागत आपण केलंच पाहिजे की,"

दाजींनी नानांच्या शब्दांचा अर्थ जाणला.

पुरंदराहून मराठ्यांचे सैन्य पुण्याच्या रोखाने निघाले. नानाही गड सोडून निघाले. निघता निघता ते दाजींना म्हणाले, "दाजी, तुम्ही गड सोडून जाऊ नका. सरदार पानसे वगैरे मंडळी पुण्याच्या रक्षणाची जबाबदारी सांभाळतील. बालमाधवाची सारी जोखीम तुमच्यावर आहे."

"त्याविषयी आपण निर्धास्त रहा. प्रसंग आला तर श्रीमंतांच्या शरीरावर पालथा पडेन पण जिवंत असेपर्यंत श्रीमंतांच्या केसाला धक्का लागणार नाही." ही दाजींची आश्वासनाची भाषा ऐकल्यावर नाना शांतपणाने गड उतरू लागले.

पायथ्याशी मेणा तयारच होता. मराठे घोडेस्वार तर केव्हाच पुण्याच्या रस्त्याने दौडू लागले होते. गडाकडे एकवार दृष्टी टाकून नानांनी मेण्यात पाऊल ठेवले. भोयांनी मेणा उचलला. मेणा निघालेला दाजींनी पाहिला आणि मग ते गडावर परतले.

मेणा खालीवर झोके देत हळुहळू पुण्याचा रस्ता आक्रमीत होता. मधेच कधी गती वाढत असे तर कधी चाल रेंगाळतही असे. नानांचे विचारचक्र असेच फिरत होते. सारे हिंदुस्थानचे राजकारण त्यांच्या डोक्यात गरगरत होते. त्यांना वाटत होते—

"भवितव्यता काही समजत नाही. पण ह्या टोपीवाल्यांनी आपल्या कावेबाजपणाने सारा हिंदुस्थान ग्रासण्याची पाळी आणली आहे... बंगाल्यात त्यांनी पाय रोवले आहेत.

काशीच्या राज्याची तशीच स्थिती झाली.. कर्नाटकातही त्यांनी राजकारण जिंकले.. दिल्लीची सूत्रेही हलवू पहातात. अशा वेळेस

मानाने जगायचे असेल तर सारा हिंदुस्थान हलवून सोडला पाहिजे. " हे शिवशाही राज्य आहे, केवळ यवनाक्रांत होते असे नाही. " ह्या अभिमानाने सारा मराठा उठला पाहिजे... पण दुर्दैव आमचे, आमचेच भाऊ आमच्याविरुद्ध उभे राहिले आहेत इंग्रजांच्या कुबडीचा आधार घेऊन.. इतके लंगडे झाले आज मराठी राजकारण ? "

इतक्यात मेणा जरा जास्तच हलला आणि विचारांची साखळी तुटली. मेण्याचीही गती थांवली होती. मेणा खाली उतरवला गेला. मधेच मेणा का थांबविला गेला, हे पहाण्यासाठी नाना मेण्याच्या बाहेर आले.

एक स्वार नानांना आदबीने मुजरा करून बाजूला उभा राहिला. त्याच्याकडे एक चौकसदृष्टी टाकून नानांनी विचारले, " काय आहे? "

" हा खलिता ! " असे म्हणून त्या स्वाराने नानांच्यापुढे खलिता ठेवला. नानांच्या खिजमतगाराने खलिता फोडून नानांच्या पुढे केला. कागद उलगडला. दृष्टी खालीवर होऊ लागली. किंचित्शी संकुचितही झाली.

" फत्ते जाली ! गाडदी पठाण मारून काढले. जे वाचले ते पुण्याकडे पळाले... मोरोबादादांचा त्यांना आसरा असावा असे वाटते...पुण्याकडे होळकरांच्याही फौजा गेल्या आहेत असे समजते. निर्णय कळावा. "

कागदाची पुन्हा भेंडोळी करून नानांनी स्वाराला विचारले, " कुठे गाडदी भेटले ? "

" घाटाखाली " स्वार म्हणाला.

नाना थोडा वेळ विचारमग्न झाले. डोक्यावरून एकदा हात फिरवून ते कारकुनाकडे वळून म्हणाले,

" सखारामपंत, जरा लेखणी उचला. "

सारे लेखनसाहित्य एका नोकराने सखारामपंतांपुढे आणून ठेवले. सखारामपंतांनी लेखणी उचलली आणि नाना सांगू लागले,

" पाटीलबाबांना लिहा . . . जासूद ग्वालेरास जाऊ द्या–

श्रीमंत सूर्यपराक्रमी पाटीलबाबा . . . . विजयी असावे. इंग्रजांचे मानस हैदरखान, श्रीमंत व निजाम तिघांच्याही दौलती घ्याव्या. एकाशी शकटभेद करून दुसऱ्यास खाली पाडावे. असे करता एक राहील त्यास शेवटी गुंडाळावे हीच भेदनीती ते स्वराज्यातही खेळू पहातात. स्वराज्याचे दुर्दैव असे की राघोबा, मोरोबासारखे मूर्ख कुलक्षणी सत्तेच्या तुकड्यासाठी इंग्रज कोल्ह्याला घरात घेऊ पहातात. आज हे राजकारण पुण्यात आकाराला आले आहे. स्वराज्याचे मारेकरी पुण्यात शिरू पहात आहेत, तर स्वराज्याच्या स्वामीनिष्ठ शिलेदारांवर रानोमाळ हिंडण्याचा प्रसंग आला आहे. स्वराज्याचे पुण्य मळू पहात आहे. पाप्यांच्या पापी दृष्टीने . . . . पाटीलबाबांस श्रीमंताचे दौलतीची काळजी आहेच व भारही सर्व त्यावरच. . अधिक काय लिहावे ? "

–लखोटा बंद झाला. शिक्के मारले गेले. नंतर स्वाराकडे लखोटा द्यायला सांगून नाना नंतर स्वारास म्हणाले,

" सेनापतींना सांगा, पाटीलबाबांकडे हा लखोटा पाठवायला . . . आणि फौजेचा तळ स्थिर ठेवू नका. पुण्याच्या आसपास स्वार फिरते ठेवा. पाटीलबाबांकडून काय निरोप येतो आहे त्याची वाट पहात आम्ही कदाचित् पुरंदरला माघारी जाऊ नाहीतर वाईकडे मेणवलीला.

लखोटा घेऊन स्वाराने घोड्यावर मांड टाकली आणि वाऱ्याशी स्पर्धा करीत त्याने घोडा फेकला. स्वार गेला म्हणतस्तवर तो घाटाच्याखाली मराठ्यांच्या छावणीत आलाही. स्वाराने हरिपंतांच्या पुढे लखोटा टाकला आणि नानांचा निरोप सांगितला. लगेच निरोपा-प्रमाणे लखोट्याची रवानगी झाली. नंतर हरिपंत आपल्या शेजारी बसलेल्या एका उग्र-गंभीर चेहऱ्याच्या गृहस्थांना म्हणाले, " ऐकलेत

त्रिंबकराव, आपण गाड्यांचा पाठलाग केला नाही, हेच योग्य झाले म्हणायचे.

आपल्या मिशांची टोके वळवून ते उग्र गृहस्थ आपला चेहरा अधिकच उग्र करीत म्हणाले, ' हा भ्याडपणा आपणास पसंतही ना पंत . . . आज पुणे शत्रूच्या तावडीत गेले. काय साधले आपली कातडी वचावून ? ''

" हा भ्याडपणा नाही. हा मुत्सद्दीपणा आहे. व्यर्थ आत्मनाश हुतात्मेपण देईल कदाचित् पण यश देणार नाही. आज आपली कातडी वचावली तर उद्या पुणे वाचविण्याचा विचार तरी करीता येईल." हरिपंतांचे हे शांत बोलणे ऐकून त्रिंबकराव म्हणाले,

" आता पुणे शत्रूच्या घशात गेल्यावर काय मुत्सद्दीपणा लढवणार अहात कुणास ठाऊक ? " तेव्हां पंत म्हणाले, " हे आता तुम्हा आम्हांला सांगता येणार नाही. कार्याच्या सफलतेनंतरच नानांचे डावपेच आपणास कळायचे. . . . आपल्या स्वाराने नानांचा मेणा सासवडास गाठला . . . कदाचित् घटका दोन घटकात ते घाटाखाली येतीलही . . . काय वाजलं हो ? "

त्रिंबकरावांनी मागे वळून पाहिले आणि म्हटले, ' काही तरी खसपसलं खरं त्या जाळीत ! असेल एखादा साप ! "

" एखादा साप का काही दुखावलेले साप ? . . . काही असो. आपला मुक्काम हलवला पाहिजे नानांच्या सूचनेप्रमाणे . . . ही जागा आता झपाटलेली दिसते . . . नाना मात्र इकडे न येवोत. "

असे म्हणून पंत उठले आणि मराठी फौजही उठली. " मेणे शिरवळ-वरून जाऊ द्या–" नानांनी हुकूम केला होता आणि मेण्यात पाऊल ठेवले होते. मेणे शिरवळकडे निघाले होते.



मराठी ग्रंथ [illegible] वाचनालय शाखा.
अनुक्रम ... वि ...............
नोंद दि. ...............

नानाला मिळणारा बडेजाव आपणास नाही म्हणून असंतुष्ट असलेले मोरोबादादा आणि शिंद्यांची प्रतिष्ठा पहावत नसलेले तुकोजी होळकर यांनी राघोबादादाला सहाय्य करायचे ठरवून हालचाली सुरू केल्या होत्या. होळकरांची दहा-पंधरा हजाराची फौज पुण्यात शिरली होती. साऱ्या पुण्याची नाकेबंदी झाली होती. शनिवारवाडा घेरला होता सैनिकांनी. नानांना पकडण्याचे प्रयत्न झाले. पुरंदराहून नाना निघाले अशी वातमी घाटाखालच्या हरिपंतांच्या छावणीत होळकरांच्या– सैनिकांना मिळाली. पण घाटाखाली नानांचा मेणा आलाच नाही. पेठे, पानसे, फडके असे सगळे वारभाई सरदार पांगले होते. त्यामुळे सैन्यही पांगले होते. अशावेळेस ह्या सर्वांचे सूत्रधार नाना फडणीस ह्यांना पकडणे आवश्यकही होते आणि सोपेही होते. आणि म्हणून मोरोबादादा आणि होळकर अगदी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. पुरंदरापर्यंत सैनिक जाऊन आले आणि मेणे पुण्याकडे गेले ही वातमी ऐकून परतले. पुण्याच्या चारी वाटा रोखल्या होत्या. पण नानांची वाट मात्र रोखली गेली नाही. आपल्याला पकडण्यासाठी आकाशपाताळ एक होणार, हे नानाही जाणून होते आणि म्हणूनच त्यांनी पुरंदर सोडला, पुणे सोडले आणि सरळ शिरवळ, वाई वरून मेणवली गाठली. ज्याला विधायक कार्य करावयाचे असते, त्याला स्वसंरक्षणाच्या प्रश्नाला अग्रेसरत्व द्यावेच लागते. धावपळ नाही, गडबड नाही. उलट धावपळ गडबड करणाऱ्याला शांतपणे फजितकरणे हीच खरी कार्यकुशलता. मेणवलीला जरी नाना जाऊन राहिले तरी पुण्याला काय घडते आहे ते त्यांना रोजच्या रोज कळत होते. नानांनी तशी व्यवस्था केली होती.

मोरोबादादांनी शनिवारवाड्यात जाऊन पार्वतीबाईंची गाठ घेतली होती. फडणिशीची वस्त्रे पार्वतीबाईकडून घेण्याचे त्यांचे कारस्थान यशस्वी होऊ पहात होते आणि मॉन्स्टिनसाहेब प्रसन्न

होण्याची लक्षणे दिसू लागली होती. साऱ्या अशुभ ग्रहांची युतीच होत होती एक प्रकारे. नानांचे मन चिंताग्रस्त झाले. पुरंदरावर गेलेली फितुरांची सेना पुण्याला परतल्याचे वृत्त नानांना मिळाले होते. नानांनी ताबडतोब मेणवली सोडली आणि पुरंदर गाठला. फितुरीचा वणवा चहुकडून घेरत असला म्हणजे एकच जागा कायम पकडून रहाणे, शहाणपणाचे ठरत नसते. शिवाय ज्याच्यासाठी हा सारा आटापिटा केला होता, तो बालपेशवा पुरंदरावरच होता. पुरंदरावर गेल्या गेल्या नानांनी पुण्याला मोरोबादादाला पत्र पाठवून निरोप कळविला–

" दादांना सन्मानाने पुण्यात आणून त्यांना पेशवाई द्यावी. आपण फडणिशी करावी. आम्हांला त्यात संतोष आहे. आपले आपण राज्य करावे. टोपीकराला घरात घेऊ नये. "

मोरोबादादांना जसा नानांचा निरोप मिळाला तसाच तुकोजी होळकरांच्या हातातही नानांचा एक लखोटा येऊन पडला–तुकोजी वाचू लागले.

" राघोबा, मोरोबा यांची कारस्थाने यशस्वी होतात हे देशाचे मोठे दुर्दैव आहे. न्यायासाठी बारभाईनी केलेल्या कारस्थानाचा काय उपयोग झाला ? स्वराज्यरक्षणाचे उपाय फसावेत हे आपल्यासारख्या स्वराज्यरक्षकांना भूषणास्पद आहे, असे कसे म्हणावे ? राघोबादादांना पेशवाई मिळणार, मोरोबादादांना फडणिशी मिळणार, इंग्रजांच्या घशात साष्टी वगैरे सव्वीस लाखाचा मुलूख जाणार. आपल्यासारख्या स्वामीनिष्ठ सेवकाला काय मिळणार ? डोकं अगदी गरगरू लागते ह्या प्रश्नाने. "

आणि हे सारे वाचून तुकोजीचे डोके मात्र खरोखरच गरगरू लागले. त्याला काही सुचेना. " स्वराज्यद्रोहाचे हे पातक आपण कशासाठी केले ? " काही समजेना त्याला. त्याच क्षणी त्याने शनिवारवाडा

वेढण्याचा हुकूम दिला. होळकरांच्या सैन्याने वाड्यात प्रवेश केला. पार्वतीबाईसाहेबाकडून फडणिशीची वस्त्रे घेण्याचे मोरोबादादांचे स्वप्न भंग पावले. फडणिशीच्या वस्त्राऐवजी कैद्याची भूषणे मात्र त्यांच्या नशिबी आली.

पुरंदराहून पुण्यातली सूत्रे नानांनी हलविली. इंग्रजांना तर मोरोबादादा घरात घेऊ शकले नाहीतच; उलट त्यांनाच घराबाहेर पडण्याचा प्रसंग आला. ही खरी योजकता. हे सारे स्वराज्याच्या रक्षणासाठी होते. हा खरा योग.

## ' योगः कर्मसु कौशलम् । '

" न धरी शस्त्र करी मी । " ह्या प्रतिज्ञेचे पालन श्रीकृष्णालादेखील जमले नव्हते. ही किमया नानांनी करून दाखविली. सत्तेसाठी आणि संपत्तीसाठी मोरोदादांनी पुण्याकडे वक्र दृष्टी टाकली; पण सर्वस्वाला मुकण्याचा त्यांच्यावर प्रसंग आला. म्हणून तर शाहिरांनी यथार्थ वर्णन केले आहे.

" ज्यांनि पुण्याकडे विलोकिले ते संपत्तीला मुकले । "

इंग्रजांनाही हा अनुभव घ्यायचा होता. सुरतेचा तह पक्का करायचा, पुरंदरचा तह रद्द समजायचा, अशी नवी भाषा त्यांनी आता सुरू केली होती. मोरोबादादांच्या कारस्थानाने त्यांचा स्वार्थ उफाळून आला होता. मोरोबादादांचे प्रकरण मिटवायला होळकर उपयोगी पडले. आता पाटीलबाबांची, महादजी शिंद्यांची, जरूरी होती. पत्रे गेली होती. पाटीलबावा मात्र आले नाहीत, का आले नाहीत ? हा प्रश्न सतत भेडसावीत होता. इतक्यात वानवडीपाशी शिंद्यांच्या सैन्याचा तळ पडला असल्याच्या बातम्या येऊन थडकल्या. पुन्हा पत्रापत्री झाली नाना आणि महादजी एकाच दिवशी पुण्यात आले. शनिवारवाड्याने आनंदाने त्यांचे स्वागत केले.

वातमी होती, " मुंबईहून इंग्रजांचे सैन्य निघाले आहे. " मसलती झाल्या. अगदी जलदीने कारण वेळच नव्हता. पाटीलबाबांच्या नेतृत्वाखाली मराठी फौजा पुण्याहून निघाल्या. तळेगावला तळ पडला. इंग्रज बोरघाट उतरून येत असल्याच्या बातम्या थडकत होत्या. पाटीलबाबाही पुढे निघाले. वडगावला दोन्ही सैन्यांची गाठ पडली. मराठ्यांनी दणदणीत टोला दिला इंग्रजांना. दुसऱ्यांच्या वादात नाक खुपसले की ते कसे छाटले जाते, ह्याची सुरेख प्रचीती आली इंग्रजांना. इंग्रज तहाची भाषा बोलू लागले. " आधी दादा आणि साष्टी स्वाधीन करा. आणि मग तहाची भाषा करा. " पुण्याहून नानांचा आवाज आला. इंग्रजांचा आवाज पार बसला. कसाबसा सालबाईचा तह उरकून नाक मुठीत धरून इंग्रजांनी मुंबई गाठली.

इंग्रजांचे अंतःकरण नानांनी पूर्ण जाणले होते. दिल्लीच्या बादशाही-पासून दक्षिणेच्या निजाम-हैदरापर्यंत सारा हिंदुस्थान इंग्रजांविरुद्ध त्यांनी उठविला होता. चहुकडून आटोकाट प्रयत्न केल्याशिवाय इंग्रजाची खोड मोडणार नाही, हे त्यांनी ओळखले होते. बंगालसारखा सुपीक प्रदेश ताब्यात असल्याने त्याचे जोरावर इंग्रज देशोदेशी राज-कारणे खेळतात, हे नानांनी ओळखले होते.

आणि म्हणून भोसल्यांच्यामार्फत बंगालमधील इंग्रजांना शह देण्याचा नानांनी प्रयत्न केला. काशीचा राजा चेतसिंग ह्याला त्यांनी आपल्या कारस्थानात ओढले होते. " इंग्रजांच्या नुसत्या बोलण्यावर जाऊ नये. ते दगाबाज आहेत." असा त्यांनी पाटीलबाबांना वारंवार इशारा दिला. इंग्रजांनी अवलंबलेली भेदनीती नानांनीही अवलंबिली होती. इंग्रजांना शह देण्यासाठी फ्रेंचांशी जवळीक केल्याचे नाटकही नानांनी उत्तम वठविले. ह्या नानांच्या सर्व कामगिरीला आलेले उत्तम फळ म्हणजे मराठेशाहीचे रक्षण. भांडणारे सर्व सरदार एकत्र

आणून खड्र्याच्या लढाईत निजामाला पाणी पाजण्याचा अभूतपूर्व पराक्रम नानांनीच करविला आणि आणि मराठी सत्ता अजूनही शिखरावर आहे हे साऱ्या हिंदुस्थानला दाखविले. म्हणून तर इंग्रजासारख्या शत्रूने कानाला खडा लावून घेतला की,

**'जबतक नाना तबतक पूना'**


जोपर्यंत नाना आहेत, तोपर्यंत पुण्याकडे पहाणे नको.

त्यावेळी इतिहासकारांनी नानांच्याबद्दल काढलेले उद्गार महशूर आहेत ते असे,


**" भले बुद्धीचे सागरनाना ऐसे नाही होणार ।<br>शर्थीनेहो राज्य राखिले मनसुबीची तलवार ।। "**

माधवरावांचा अंत झाल्यानंतर कोलमडलेली पेशवाई नानांनी सावरली. नाना प्रकारच्या संकटातून नाना युक्त्यांनी व कारस्थानांनी नाना फडणिसांनी राज्याचा बचाव केला. हीच नानांची सर्वात मोठी कामगिरी होय.

सत्कार्यासाठी जीवन वेचणे आणि ते सत्कार्य कुशलतेने करणे हाच खरा योग असतो. स्वराज्य रक्षणासाठी नानांनी हाच योग आचरिला. आणि ठवतात.



# कर्मवीर भाऊराव पाटील




उदास आणि गंभीर असे ते दृश्य होते. ससून हॉस्पिटलमधील तो एक स्पेशल वॉर्ड होता. कुठे आनंद नाही. कुठे हास्य नाही. शब्दांची देवाण घेवाण नाही. केवळ एक मूक कार्यतत्परता तेवढी दिसत होती. फक्त शुभ्रवेषधारी परिचारिका काय त्या इकडे तिकडे करीत होत्या, आपल्या कामात क्षणाचीही दिरंगाई न करता जरी त्या ये जा करीत होत्या, तरी मध्यभागी असलेल्या कॉटकडे मात्र त्यांची नजर दरखेपेला वळत होती, थोडी स्थिर होत होती आणि पुन्हा आपल्या कामाकडे वळत होती. त्या मध्यवर्ती असलेल्या खाटेवर दुखण्याने क्षीण झालेले एक शरीर पहुडले होते. खादीचा शुभ्रवेष, अंगावर ओढलेली शुभ्र चादर आणि ह्या शुभ्रतेत भर घालणारी

शुभ्र दाढी, शुभ्र केस ह्या सर्व गोष्टींनी एक आगळेच वातावरण त्या दालनात निर्माण केले होते. ती व्यक्ती काही बोलत नव्हती. त्या व्यक्तीचे डोळे बोलत होते. त्या खाटेभोवती त्या व्यक्तीला मुद्दाम आवर्जून, काही विशिष्ट हेतू मनात धरून भेटायला आलेली चार प्रतिष्ठित माणसे उभी होती. तीही माणसे काही बोलत नव्हती. त्यांच्याही भावना बोलून दाखविण्याइतक्या साध्यासुध्या नव्हत्या. त्यांचेही डोळेच बोलू बघत होते. हृदयाची भाषा डोळ्यांच्या माध्यमातून एकमेकांना समजली. नेत्र पाणावले. त्या खाटेवरच्या व्यक्तीच्या तेजस्वी नेत्रातून अश्रू ओघळू लागले. त्या आसवांनी तिथले ते उदास गंभीर चित्र पुसट केले. स्पष्ट दिसू लागली ती फार फार मागली स्मृतिचित्रे—

—कुंभोज गावाचा रम्य परिसर होता तो. सृष्टि देवता हसत होती त्या गावावर. नदीचा अवखळ प्रवाह प्रसन्न मनाने पहाणारी हिरवीगार शेते दुतर्फा डोलत होती. नदीत डुंबावे, शिवारात बागडावे, गोफण गुंडे गोळा करावेत, सूं सूं बंदुकीच्या गोळ्याप्रमाणे गोफणीतून गोटे सुटावेत आणि चिंचांच्या झाडांनी चिंचांच्या आकड्यांचा वर्षाव करावा हे तिथल्या त्या रानकिशोरांचे मुक्त जीवन पाहून कधी कधी झाडांवरच्या पक्ष्यांनासुद्धा त्यांचा हेवा वाटायचा. झाडे तर कौतुक करीत. दगडांचा मारा सहन करून चिंचांचा खाऊ त्यांना देत. केवढा हा वृक्षांचा थोरपणा ! आपणाजवळ जे काही आहे ते मुक्त मनाने, मुक्त हस्तांनी रसिकांसाठी उधळावे हा निसर्गाचा स्वभावच आहे. माणसांनी हे शिकण्यासारखे आहे. पण माणसे हे शिकत नाहीत. आणि म्हणूनच माणसे दुःखी होतात. निसर्गाची विशालता माणसांची मने घेत नाहीत. ती संकुचित रहातात. आणि मग सारे काही आपल्यासाठी राखून ठेवण्याचा वेडा प्रयत्न करतात. धन, अन्न, वस्त्र, निवारा,

ज्ञान साऱ्या साऱ्या बाबतीत माणसाची ही वृत्ती आपणास दिसून येते. पाण्याइतकी मुबलकता तर कशाची नसेल ना? पण माणसाने तिथेही आपल्या संकुचित वृत्तीचे बांध घातले. अशा पराकोटीला ही संकुचितता गेली म्हणजे एखादेतरी बंडखोर मन उसळी मारून उठतेच.

आजही कुंभोज गावाची मुले नदीत डुंबून, रानात बागडून आणि चिंचांचे आकडे गोळा करून गावाकडे परतत होती. चालता चालता चिंचा खाण्याचा आवडता कार्यक्रम चाललाच होता. तोंडे आंबट होत होती. तरी पण हसत होती. इतक्यात वाटेवरच्या विहिरीवर कसली तरी गर्दी झालेली दिसली. म्हणून ही सारी वानरसेना तिकडे वळली.

"म्हारड्याचा पोर! पाण्याला शिवला!" असे म्हणून एका चाळीशी ओलांडलेल्या माणसाने एका बावरलेल्या पोराच्या पाठीत एक जोराचा धपाटा ठेवून दिला.

त्या वानरसेनेचा हनुमंत रागाने पुढे झाला आणि त्या माणसाला म्हणाला, "का हो पाव्हणं त्या पोराला मारलंत?"

"अरे, तो पाण्याला शिवला ना?"

"मग काय बिघडलं? तुम्ही नाही साऱ्या विहिरीला शिवलात. त्या मुलाने म्हटले."

"अरे पण शहाण्या तो महाराचा पोर आहे ना!" तो मनुष्य म्हणाला.

"तो माणूस नाही? त्याला तहान लागत नाही? त्याला पाणी द्यायचं सोडून त्याला मारलंत तुम्ही. किती कठोरपणा हा! तुमच्या दुष्टपणाने ही सारी विहीर विटाळली." असे तावातावाने म्हणत त्या दांडगट बजरंगाने झटकन त्या विहिरीचा रहाट मोकळा सोडला आणि महाराच्या मुलाला तो म्हणाला, "आण तुझी घागर आणि भर पाणी. बघतो मी कसं पाणी भरू देत नाहीत ते?"

त्या मुलाला केवढा धीर आला. त्याने पळत जाऊन घागर आणली. त्याच्याबरोबर इतरही काही हरिजन आपल्या घागरी घेऊन आले. आणि मग ही वानरसेना गावाकडे परतली.

हिरमुसले तोंड घेऊन त्या हरिजन बालकाला मारणारा मनुष्य जडपावलांनी चालू लागला. जाता जाता एका माणसाने त्याला विचारले, " कोण हो तो मुलगा ? " " पायगौंडा पाटलाचा पोरगा, भाऊ ! " असे म्हणून तो मनुष्य आपल्या घराकडे वळला.

भाऊ पाटलाच्या व्रात्यपणाची बातमी भाऊच्या अगोदरच घरी गेली होती. वडिलांना राग आला भाऊच्या ह्या वागण्याचा. आजचेच काही विशेष नव्हते. रोजचाच हा धिंगाणा होता. " पोराची जात, खेळण्याचे वय आहे, " असे काही म्हणत. पण पायगौंडा पाटलांना ते पटत नव्हते. भाऊने शिकले पाहिजे, असे त्यांना फार वाटे. " मी अडाणी राहिलो तरी माझा मुलगा अडाणी रहाता कामा नये," अशी त्यांनी आपल्या मनाशी खूणगाठ बांधली होती. पण ती गाठ अजून पक्की होत नव्हती. मुलाचे लक्षण काही वेगळेच दिसत होते. कानामध्ये वारा भरलेल्या वासराप्रमाणे अहोरात्र हुंदडावे, ह्याखेरीज दुसरा उद्योग नाही.

खेड्यातल्या तात्या पंतोजीने तर सांगून टाकले होते, " ह्या वर्गातल्या बाकाला शिकविणे एकपरीस सोपे आहे, पण तुमच्या पोरापुढे डोकं फोडलं तरी काही उपयोग व्हायचा नाही."अशातच रोजच्या भाऊच्या खोड्या ऐकू आल्या म्हणजे तर पायगौंडा पाटील जास्तच विषण्ण होत. आज कोणीतरी कोल्हापूरचे पाहुणे त्यांच्याकडे आले होते. भाऊच्या शिक्षणाचा प्रश्न त्यांनी त्यांच्यापुढे काढला होता. थोडी फार शक्यता वाटत होती. आपल्या नशिबी नव्हते. निदान मुलांनी तरी ज्ञानगंगेच्या प्रवाहात अवगाहन करून पावन व्हावे असे त्यांना

फार फार वाटत होते. कोल्हापूरला जैन वसतीगृहात रहाण्याची सोय होईल आणि राजाराम हायस्कूलमध्ये शिक्षणाची सोय होईल, असे ते पाहुणे म्हणाले होते. जवळ जवळ सारे नक्की होत आले होते. इतक्यात तात्याने, पाटलांच्या धाकटचा मुलाने भाऊच्या विहिरी-वरच्या पराक्रमाचा पाढा वाचला.

तात्या म्हणाला, " भाऊने विहिरीवर महाराच्या पोराला पाणी भरू दिले. सारा महारवाडा पाण्यासाठी विहिरीवर लोटला आहे."

आश्चर्य वाटून पाहुणे म्हणाले, " वा भलतीच सुधारणा झाली म्हणायची तुमच्या गावात, आमच्या कोल्हापुरात मोठमोठे देशभक्त व्याख्याने झोडतात पण सारी फुकट जातात. आणि तुमच्या भाऊने गावाचा पाणवठा झट की पट हरिजनांना मोकळा करून दिला! "

" थोडी शिक्षणाच्या वळणाला गाडी लागली पाहिजे. . .नाहीतर आमचा भाऊ जे मनात आणील ते करून दाखविल्याशिवाय रहायचा नाही कधी. तेवढी हुषारी आहे त्याच्यात." खोलीच्या दाराशी उभी असलेली भाऊची आई म्हणाली.

इतक्यात बाहेरून भाऊ आला. घरात बसलेले अपरिचित पाहुणे पाहून तो जरासा थबकला आणि हळूच आत जाऊन चुलीपुढे सदऱ्यातल्या चिंचा टाकून तो आईला म्हणाला, "आई ठेचा कर आज."

रागावलेल्या मुद्रेने आतून उसळी मारून आलेले हसू पदरामागे कसे तरी लपवून भाऊची आई म्हणाली, "आता हे असे चिंचा-बोरे पाडण्याचे रानगट वागणे पुरे झाले . . . कोल्हापुरात शिकायला जायचंय, पाहुण्यांच्याबरोबर." आणि मग हंसू पुसणारा लुगड्याचा पदर जरा डोळ्याकडेही गेला.

कुंभोज गावातले हरिणाप्रमाणे स्वैर बागडण्याचे दिवस आता संपले होते. ते एक सुरम्य चित्र आता बाजूला झाले होते.

कोल्हापूरचे शहरी जीवन आता सुरू झाले होते. जैन वसतीगृहात भाऊची आणि तात्याची रहाण्याची सोय झाली होती. राजाराम हायस्कूलमध्ये दोघांची नावे घातली होती. सरस्वतीची उपासना सुरू झाली होती. रुळलेल्या वाटेने जाणारी माणसे अगदी नाका-समोर जातात आणि कसेवसे ठरलेले गाव गाठतात. कृतकृत्य झालो असे त्यांना वाटते. पण झापडे लावून त्यांनी केलेली ती वाटचाल त्यांचेच जीवन उजळत नाही तर इतरांच्या जीवनातील अंधार ते कसा नाहीसा करणार? ते पदव्या पटकवतात पण जीवनाचा अर्थ त्यांना कधी सापडत नाही. वसतीगृह, शाळा, अभ्यास ह्या ठराविक चाकोरीतून रोजच्या रोज चकरा मारणारे आपल्या भोवतालचे अनेक शाळूसोवती पाहून भाऊच्या मनात असे विचार अनेक वेळा येत. आपल्या दैनंदिन जीवनक्रमात ते थोडादेखील बदल करू इच्छित नसत. अगदी काही गोष्टी जाचक झाल्या, असह्य झाल्या तरी ते बदलत नसत. मेंढरांची सवय कशी असते ? अगदी एकमेकांना लागून ती चालतात. ती मेंढरे खड्ड्यात जातील पण मार्ग बदलणार नाहीत, कोणी तंगडे धरून ओढल्याखेरीज. त्यांचे हे वागणे पाहून भाऊचा अगदी संताप होई.

हीच संतापाची भावना आजही त्यांच्या चेहेऱ्यावर अगदी स्पष्ट दिसत होती. कोल्हापूरला येऊन काही दिवस झाले होते. एवढ्या काळात आलेले काही अनुभव अगदी संतापजनक ठरले होते. वसती-गृहामध्ये भोजनास मुकटा नेसून बसावे, असा नियम होता. " मुकी बिचारी कुणी हाका," ह्या तालावर पावले टाकणारी मुले मुकाट्याने मुकटा नेसून पाटावर बसत. पण हे मुकेपण भाऊरावांना कधीच मानवण्यासारखे नव्हते. त्यांनी तो मुकटा आणि तो नियम ह्या दोघांनाही धाब्यावर बसवले." कळकट सोवळ्यापेक्षा मळकट धोतर

वरे." ह्या त्यांच्या शब्दांनी वीज चमकावी असा परिणाम झाला. इतर मुलांना नवविचाराचा प्रकाश मिळाला. भाऊरावांच्या भाळी मात्र भोजनबंदी आली. ह्या बंदीमुळे भाऊरावांच्या बेबंद वागण्याला पायबंद बसला, असे मात्र नाही. "भाळी ज्यांच्या कटकट लिहिली अखंड वटवट करण्याची" अशी बंडखोर माणसे, अडथळ्याची शर्यत खेळायलाच जन्माला आलेली असतात. ती माणसे सतत पुढे जाऊ पहात असतात, अडथळे त्यांच्यापुढे येत असतात आणि त्यांच्यावरून उड्या घेऊन ही बंडखोर माणसे आगेकूच करीत असतात; आपणा-बरोबर इतरांनाही पुढे नेत असतात. हीच त्यांची कर्मकुशलता असते. हाच त्यांचा योग असतो.

भोजनच काय पण वसतीगृहात रहाणेच बंद होण्याचा प्रसंग भाऊरावांवर आला. नव्हे त्यांनी तो ओढवून घेतला. अस्पृश्यासाठी एक वसतीगृह होते. त्या वसतीगृहात एकदा भाऊराव काही सहकाऱ्यां-सह जाऊन आले. शिवाशिव झाली. ती अशिव मानणारेच सारे. शिव म्हणजे कल्याणकारक मानणारा भाऊरावांच्यासारखा एखादाच. अस्पृश्यांच्या वसतीगृहात जाऊन आलेल्या सर्वांनी स्नान केल्याखेरीज वसतीगृहात प्रवेश करू नये, असा जैन वसतीगृहाच्या चालकांनी वट-हुकूम काढला. अन्याय्य हुकूम मानावयाचाच नाही अशी मनाची धारणा असणाऱ्या भाऊरावांनी आंघोळ करण्याचे साफ नाकारले. ते म्हणाले, "अस्पृश्य हे आपले बांधवच. मी अस्पृश्यता मानीत नाही." ह्या बंडखोरीचा परिणाम असा झाला की जैन वसतीगृहातून हद्दपार व्हावे लागले भाऊरावांना. छत्रपतींचे छत्र सर्वच कर्तबगारांना मायेची सावली देत असे. वसतीगृहाचा आधार तुटला तरी राजवाड्यात सोय झाली. एक नवे जीवन सुरू झाले.

बाळासाहेब खानविलकर आणि भाऊराव ही जोडी जमली. साऱ्या

खेळांच्या आघाडीवर ही जोडी असावयाचीच. वसतीगृहाच्या बंदिस्त वातावरणापेक्षा हे मोकळे वातावरण भाऊरावांना अधिक मानवले· इंग्रजी सहाव्या इयत्तेपर्यंत शिक्षण झाले. पण वर्गाच्या चार भिंतींच्या आत त्यांना जे काय शिकायला मिळाले त्यापेक्षा किती तरी जास्त त्यांनी बाहेरच्या उघडच्या जगात शिकून घेतले. त्यांनी आपला देश आपला समाज फार जवळून अभ्यासिला. अज्ञान, दारिद्रय, रूढी, अशा समाजपुरुषाला झालेल्या रोगांचे त्यांनी अचूक निदान केले. ह्या विचारांच्या भोवऱ्यातच सतत मन गुंतून राहिल्यामुळे, इयत्ता मागे इयत्ता पास होत जात आपली स्वत:ची प्रगती करण्याचे प्राकृत सामान्य ध्येय त्यांना जमले नाही. 'श्रवणबेल गोळ' या गावी भरलेल्या जैन धर्म परिषदेला विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून ते गेले होते. त्यांचा कामसूपणा, त्यांची हुषारी, त्यांचे प्रभावी नेतृत्व पाहून अध्यक्ष शेठ माणिकचंद यांनी भाऊरावांना आपल्याबरोबर मुंबईला नेले. त्यांनी भाऊरावांच्या शिक्षणाची सारी व्यवस्था केली. ज्याचा जन्म झगडण्यासाठी असतो त्यास हा व्यवस्थितपणा कधी मानवतच नसतो. शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने भाऊरावांचे पाऊल काही पुढे पडेना. नाइलाजाने त्यांनी मुंबई सोडली. कोरेगावी वडिलांच्याकडे भाऊराव आले. शिक्षणासाठी भाऊरावांनी घर सोडले होते. पण शिक्षण गाठीस न बांधताच त्यांनी घर गाठले होते. वडिलांना फार वाईट वाटले. ते नेहमी विषण्णमन असत. भाऊरावांच्याविषयी कोणी काही म्हटले तर ते काही बोलत नसत. एकदा असेच कोणी तरी काही विचारले. तेव्हा ते खिन्नमनाने म्हणाले, " आमचा मुलगा काही करीत नाही. फक्त खाण्याचे काम करतो. "

'सावधान' ह्या शब्दाने समर्थांच्या जीवनात जी क्रांती केली तीच क्रान्ती पायगौंडा पाटलांच्या वरील शब्दांनी भाऊरावांच्या जीवनात घडवून आणली.

भाऊरावांनी कोरेगाव सोडले आणि सातारा गाठले. काळाशी झुंज देण्याचे भाऊरावांनी ठरविले. आणि ही झुज सुरू झाली छत्रपतींच्या साताऱ्यात. सनदशीर पुस्तकी शिक्षण पूर्णतया घेणे स्वतः भाऊरावांना जमले नव्हते. पण ह्या शिक्षणाची थोरवी मात्र त्यांनी ओळखली होती. सरस्वतीच्या मंदिरात मनसोक्त विहार त्यांनी केला नाही तरी इतरांना मात्र त्या मंदिरात प्रवेश मिळवून देण्याचे त्यांच्या मनाने ठरवून टाकले. मनाचे बेत लक्ष्मीची कृपा डावलून पार पाडता येत नाहीत. भाऊरावांनी खाजगी शिकवणीचे वर्ग काढले. त्या वर्गांना लवकरच चांगली लोकप्रियता मिळाली. भाऊराव कोणताही कठिण भाग अतिशय सोपा करून समजून सांगत. जो भाग वर्गात शिकवावयाचा तो भाग ते घरी उत्तम रीतीने तयार करीत आणि मगच शिकवीत. त्यामुळे त्यांचे शिकविणे मुलांच्या मनावर लगेच ठसत असे. लक्ष्मी आणि सरस्वती या दोघींची कृपादृष्टी आता भाऊरावांच्याकडे वळू लागली होती. अविश्रांत श्रम आणि तेही सतत नवा मार्ग शोधत करावयाचे, ही भाऊरावांची पद्धती मोठी यशस्वी झाली. जीवन जसे प्रभावी तसेच प्रवाही असावे लागते. ते सतत पुढे जात असले तरच त्याच्या प्रभावाने सारा आसमंत फुलवून टाकते.

शिकवण्या सुरू झाल्या. जवळजवळ शंभर रुपयांइतकी मासिक प्राप्ती सुरू झाली. संसाराचा गाडा सुरळीत चालू लागला. एखाद्या अल्पसंतुष्टाला एवढ्यातच कृतकृत्य झाल्यासारखे वाटलेही असते. पण " बुडती हे जन न देखवे डोळा " ह्या तळमळीने विश्वाची चिंता करणाऱ्याला त्यात समाधान वाटत नाही. भाऊरावांनी तर प्रथम-पासूनच रंजल्या गांजल्यांचे दुःख दूर करण्याचा कर्मयोग स्वीकारला होता. आणि आता तर ते दीनांचे दुःख दूर करण्याचा ज्ञानगंगेचा मार्ग त्यांना सापडला होता. त्या मार्गाने सतत पुढे जाण्याचे भाऊरावांनी

ठरविले होते. भाऊ कुदळे, मध्वाण्णा यांसारखी समान विचारांचे सहकारी मिळताच विचाराला आचाराचे रूप यायला वेळ लागला नाही. दुधगाव शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना झाली. शाळा ही सुरू झाली. नेर्लेगावी दुसरी शाळा निघाली. सर्व जातीच्या मुलांना ह्या ज्ञानमंदिरात प्रवेश मिळाला. आज जो रयतशिक्षणसंस्थेचा विशाल वटवृक्ष विविध शाखा पल्लवांनी ज्ञानछायेचे सुख महाराष्ट्रीयांना देत आहे त्याचेच हे छोटेसे रोपटे भाऊरावांनी दुधगाव शिक्षण प्रसारक संस्थेच्या रूपाने लावले.

रोप लावणे सोपे होते. ते टिकविणे, त्याची जोपासना करून त्याचा प्रचंड वृक्ष करणे, मोठे कठिण काम. ते कठिण काम भाऊरावांनी अत्यंत चिकाटीने, कुशलतेने करून दाखविले. सहाय्य थोडयांचे विरोध अनेकांचा. अशा परिस्थितीतही त्यांनी आपल्या विचारांना मूर्त रूप दिले. अस्पृश्यांसाठी त्यांनी वसतीगृह सुरू केले. प्रथम एक मुलगा होता वसतीगृहात. मोहिते नाव त्याचे. वसतीगृहाला नाव दिले छत्रपती बोर्डिंग हाऊस. हे बोर्डिग हाऊस घरातच सुरू झाले. चार पाच मुलांची घरात सोय झाली. हरिजनांची मुले. ती घरात आलेली जुन्या वळणाच्या भाऊरावांच्या पत्नीला आवडत नसे. बाहेर ओसरीवर मुले झोपत. शंकर कांबळे नावाचा मुलगा फार लहान होता. तो बाहेर थंडीत कुडकुडत असायचा. भाऊरावांना पोटात भडभडायचे. ते शंकरला मायेने जवळ घेत आणि आत माजघरात आणून झोपवीत. परत पत्नी जागी व्हायच्या आत ते शंकरला बाहेर नेऊन झोपवीत. असा मायेचा जिव्हाळा होता भाऊरावांच्या कार्यामागे. आणि म्हणूनच त्यांचे कार्य एकसारखे यशाची वाटचाल करीत असे.

वसतीगृहातील मुलांची संख्या वाढू लागली. भाऊरावांचा सारा वेळ ह्याच कामात जात असे. घरात सगळयांची सोय होणे कठीण.

शेजारी एक प्रेमळ स्वभाच्या मावशीबाई रहात होत्या. त्यांनी काही मुलांची सोय केली. इच्छा आहे तिथे मार्ग सापडतोच. भाऊरावांनी चालविलेले हे जातपात विरहित कार्य पाहून अनेकांनी समाधान व्यक्त केले. गांधीजींनी स्वातंत्र्याचे रणकुण्ड पेटविले होते. भाऊरावांनी सातारा जिल्हा जागृत केला. विचारांचे द्वंद्व मनात निर्माण झाले होते. आपण ह्या स्वातंत्र्य संग्रामात उडी टाकली तर ह्या सुरू केलेल्या कार्याचे काय ? हा विचार सतावू लागला. पत्नी म्हणाली, ‘ मी दोन मुलांची आई आहे. तुम्ही ह्या पासष्ट मुलांचे आईबाप अहात. ’ तरीही भाऊरावांनी माघार घेतली नाही. भाऊरावांनी सत्याग्रह करायचे ठरविले. सभास्थान श्रोत्यांनी फुलून गेले होते. पण ऐन वेळेला पाऊस आला. सभा मोडली. सत्याग्रह थांबला. जणू काही बोर्डिंगातल्या मुलांचेच देवाने गाऱ्हाणे ऐकले.

ह्या साऱ्या कार्याच्या व्यापामुळे भाऊरावांना स्वत:च्या घराकडे, घरधनिणीकडे लक्ष द्यायला फुरसत मिळेना. साऱ्या गृहसौख्याची अवहेलना झाली होती. अखेर घरधनिणीने अंथरूण धरले. दैवयोग इतका कठोर होता की ते अंथरुण कायमचे ठरले. लक्ष्मीबाईची प्रकृती जास्तच खंगत होती.

पाडव्याचा आदला दिवस होता. सकाळपासून थोडी हुषारी वाटत होती लक्ष्मीबाईना. त्यांची चौकस नजर सारे घर धुंडाळून आली. नित्याच्या परिचित ठिकाणी थोडीशी अडखळलीसुद्धा. भाऊरावांनी त्या नजरेचा अर्थ ओळखला. त्यांनी लक्ष्मीबाईना म्हटले देखील, “ काय, सांगायचे आहे तुला ? ”

कांबळचाच्या बाहेर आपला कृश हात हळूच काढत क्षीण आवाजात लक्ष्मीबाई म्हणाल्या, “ पाडवा आहे. सण साजरा करा. मुलांना उपाशी ठेवू नका... लावलेले रोपटे मरू देऊ नका. ”

हे लक्ष्मीबाईंचे अखेरचे शब्द ठरले. भाऊरावांच्या समाजकार्याला मंगल आशीर्वाद देऊन त्या गृहलक्ष्मीने निरोप घेतला. त्या साध्वीचा आशीर्वाद फुकट जावयाचा नव्हता. भाऊरावांच्या दुर्दम्य कार्यशक्तीने आणि त्यांच्या योजकतेने फार मोठे यश त्यांच्या कार्याला मिळवून दिले. झंझावाती दौऱ्यांनी त्यांनी सारा महाराष्ट्र खडबडून जागा केला. त्यांचे साधेसुधे पण क्रान्तिकारक विचार लोकांच्या मनाची पकड घेत.

" देव देवळात नाही. देव तीर्थक्षेत्रात नाही. माणसाने माणसावर प्रेम करणे हा धर्म. देव माणसाच्या हृदयात आहे. देवाच्या घरी भेदाभेद नाही. भोळेपणा सोडून द्या. मुलांमुलींना शिक्षण द्या. " हे त्यांचे विचार सर्वांना पटत आणि त्यांनी दाखविलेला मार्ग सर्वजण स्वीकारीत.

लोकमताची ही अनुकूलता—भाऊरावांना मोठी प्रोत्साहन देणारी वाटली. दाजी पाटील, नारूकाका खोत, बाबूराव चौगुले यांच्या सहाय्याने काले येथे झालेल्या सभेत त्यांनी एका शिक्षण-संस्थेची घोषणा केली. ही संस्था म्हणजेच सारा महाराष्ट्र व्यापणारी रयत शिक्षणसंस्था.

महाराष्ट्रात खेरमंत्रीमंडळ सत्तारूढ झाले. ह्या मंत्रीमंडळाने साक्षरता-प्रसाराचा कायदा केला. कायदा केल्याने साक्षरता-प्रसार जादूसारखा थोडाच होणार ? त्यासाठी भाऊरावांसारखा कर्मकुशल योजकच हवा. महर्षी अण्णासाहेब शिंदे यांच्या निवासस्थानी नव्या मंत्रीमंडळाचा सत्कार झाला. त्याप्रसंगी भाषण करतांना भाऊरावांनी एक हजारापेक्षा कमी वस्ती असलेल्या एकूण एक खेड्यात प्राथमिक शिक्षणाची सोय करण्याची घोषणा केली. मंत्रीमंडळाचे मदतीचे आश्वासन मिळाले आणि महर्षींच्या आशीर्वादाने यवतेश्वरी पहिली

शाळा निघाली. बारा वर्षांत ५७८ शाळा काढून २५००० मुलांच्या शिक्षणाची सोय भाऊरावांनी केली.

मुलांसाठी शाळा निघाल्या. पण त्या शाळातून मुलांना शिकविण्यासाठी प्रशिक्षित शिक्षकांची आवश्यकता होती. सरकारदेखील ही गरज जाणून होते. भाऊरावांच्या कार्याची प्रशंसा करून कलेक्टरांनी भाऊरावांना म्हटले, " एक ट्रेनिंग संस्था काढीत असाल तर पैशाची व्यवस्था करतो." भाऊरावांना ती सूचना पटली. त्यांनी ताबडतोब प्राथमिक शिक्षकांसाठी ट्रेनिंग कॉलेज काढण्याची घोषणा केली. दहा एकर सरकारी जागा मिळाली आणि रा. ब. काटे यांनी दहा हजार रुपये दिले. सिल्व्हर ज्युबिली रूरल ट्रेनिंग कॉलेज सुरू झाले. ह्या ट्रेनिंग कॉलेजच्या मागोमाग महात्मा फुले ट्रेनिंग कॉलेजची स्थापना झाली. भाऊरावांची कार्यक्षमता पाहून त्यांच्या कर्मकुशलतेबद्दल ज्यांच्या मनात मोठा आदर होता, असे थोर समाजसेवक महर्षी अण्णासाहेब शिंदे भाऊरावांना म्हणाले, " भाऊराव तुम्ही जोपर्यंत मुलांबरोबर मुलींच्या शिक्षणाची सोय करीत नाही, तोपर्यंत तुमचे कार्य एकांगी आहे."

भाऊरावांचे कार्य एकांगी रहावयाचे नव्हते. त्यांनी महर्षींच्या शब्दांपासून स्फूर्ती घेतली आणि ' जिजामाता अध्यापिका विद्यालया 'चा नारळ फोडला. विद्यालय सुरूही झाले. एका मागोमाग एकेक नवा नवा कार्यक्रम भाऊरावांनी प्रत्यक्षात आणलेला पाहून कोणालाही आश्चर्य वाटले असते. जणू काही पैशाचा पाऊस पाडणारा ढग मिळाला होता. भाऊरावांना. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, वसतीगृहे, ट्रेनिंग कॉलेजे, महाविद्यालये, शिक्षणसंस्था ह्यांचे केवढे मनोहर जाळे विणले होते भाऊरावांनी. लोकांचे फार मोठे प्रेम भाऊरावांनी संपादन केले. लोक भाऊरावांच्या कार्याशी समरस झाले.

त्यांनी तन मन धन भाऊरावांच्या कार्याला वाहिले. कोणी जमिनी दिल्या. कोणी पैसा दिला. कोणी कष्ट दिले. त्यामुळे भाऊरावांच्या योजनांना, कल्पनांना मूर्त स्वरूप प्राप्त झाले. सातारला कॉलेज काढण्यासाठी ५०,००० रुपये डिपॉझिट भरावयाचे होते, भाऊराव रुग्णालयात होते. हृदयविकाराने ते आजारी होते. अगदी आणी-बाणीचा प्रसंग होता. पण धोंडजी पाटलांच्या रूपाने परमेश्वर उभा राहिला. साताऱच्या कॉलेजची योजना आकाराला आली. असे किती तरी अद्‍भुत रम्य प्रसंग भाऊरावांच्या जीवनात आले होते.

कॉलेज सुरू झाले होते. विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण द्यावयाचे होते. विद्यार्थ्यांनी काम करावे आणि फीपुरते पैसे मिळवावेत, अशी योजना कार्यवाहीत आली. विद्यार्थी खडी फोडत, माती ओढत. ते घाम गाळत आणि मग त्यांच्यावर सरस्वती प्रसन्न होत असे.

– सरस्वतीच्या उपासनेचे असे हे अभिनव दृश्य इतरत्र क्वचितच पहावयास मिळायचे.

ह्या सर्व सुखद दृश्यांची एक अखंड मालिका भाऊरावांच्या नजरे-पुढून हळुहळू पुढे सरकत होती.... ती सारी दृश्ये आता पुसट झाली. .... पुन्हा ते रुग्णालयातील गंभीर वातावरण दृष्टीपुढे आले. शुभ्र-वस्त्रधारिणी परिचारिका लगबगीने इकडे तिकडे फिरत होत्या. कॉटपाशी पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. र. पु. परांजपे उभे होते. त्यांच्याबरोबर रजिस्ट्रार श्री. गोळे, डॉ. जेजुरीकर, प्रि. तावडे, बॅ. पाटील आणि आचार्य लिमये हेही तिथे आले होते. असह्य अशा गंभीर शांततेचा भंग करून डॉ. परांजपे म्हणाले, " भाऊराव, आपल्या अद्वितीय शैक्षणिक कार्याबद्दल उतराई होण्याचा एक अल्पसा प्रयत्न म्हणून पुणे विद्यापीठातर्फे मी आपणांस डी. लिट्. ही पदवी अर्पण करीत आहे."

भाऊरावांचे नेत्र पाणावले. ते म्हणाले, "मी शिकलो नाही अगर कुठलीही परीक्षा दिली नाही. तरीसुद्धा आपण डॉक्टरेट देऊन माझा जो सन्मान केला त्याबद्दल मला धन्यता वाटते."

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ज्ञानप्रसाराचे फार महत्त्वाचे कार्य केले आहे. महाराष्ट्रात रयत शिक्षण संस्थेतर्फे त्यांनी शिक्षणसंस्थांचे जाळे विणले. ५०० प्राथमिक शाळा, ५७ माध्यमिक शाळा, ७ महाविद्यालये आणि ५ प्रशिक्षण विद्यालये काढून शिक्षणाचे प्रचण्ड कार्य भाऊरावांनी केले. ह्या त्यांच्या कार्याची अल्पशी पोच म्हणजे विद्यापीठाने त्यांना दिलेली डॉक्टरेट होय. भारत सरकारने पद्मभूषण ही पदवी देऊन त्यांच्या कर्मयोगाचा गौरव केला. एखाद्या सत्ताधारी राज्यसत्तेला जे साधले नसते ते कार्य कर्मवीरांनी करून दाखविले. हीच त्यांची कर्मकुशलता. हाच त्यांचा योग.

## 'योगः कर्मसु कौशलम्।'

मूलोद्योग शिक्षणाची कल्पना गांधीजींनी देशापुढे मांडली. ती यशस्वी करून दाखविली कर्मवीर भाऊराव पाटील ह्यांनी. इच्छा असेल तिथे मार्ग सापडतो. गरिबी ज्ञानाचा मार्ग अडवू शकत नाही. एकलव्य, डॉ. आंबेडकर अशा थोरांच्या जीवनात हे सत्य अनुभवास येते. पण अनेक गरिबांना, दीन दुबळ्यांना दारिद्र्याचा अडसर बाजूला करून ज्ञानमंदिराचा दरवाजा खुला करून देण्याचे अभूतपूर्व महान् कार्य कर्मवीरांनी करून दाखविले. त्यांच्या शिक्षणमंदिरातील विद्यार्थ्यांनी शिक्षणमंदिराच्या इमारती बांधल्या, विहिरी खोदल्या, शेत जमिनी नांगरल्या आणि अन्नब्रह्माची उपासना केली. एका कर्मवीराने अनेक कर्मवीर निर्माण केले. ज्या कित्येक गोष्टी अनेक पुस्तकी पण्डितांना ध्येयवाद्यांची स्वप्ने वाटतात आणि जी स्वप्ने

वास्तवात कधीच उतरणार नाहीत अशी त्यांची खात्री असते अशा गोष्टी प्रत्यक्षात आणण्याचे यशस्वी कार्य कर्मवीरांनी करून दाखविले. खरोखर–


'योजकस्तत्र दुर्लभः ।'

असे म्हणतात ते अगदी योग्यच आहे.


महाविद्यालयीन शिक्षण गरीब विद्यार्थ्यांना विनामूल्य द्यावे अशी कर्मवीर भाऊरावांची इच्छा होती. पण विद्यापीठाचे नियम आड येऊ लागले. तेव्हा विद्यार्थ्यांनी काम करावे आणि शिक्षण करावे अशी भाऊरावांनी योजना सुरू केली. ती यशस्वीही केली. भाऊरावांच्या कार्यपद्धतीला अपयश माहीतच नव्हते, कारण त्यांची कर्मकुशलता. म्हणून ते थोर योगी होते.

'योगः कर्मसु कौशलम् ।'





हा कर्मवीर पडला शरपंजरी । ज्ञानवीर त्या पदवी वितरी ॥



चोज पुरवुनी कामकऱ्याचे । आचार्य उघडिती द्वार यशाचे ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा.
अनुक्रम ... वि ...
क्रमांक ... नोंद दि ...

# आचार्य विनोबा भावे



बडोद्यातला तो एक मोठा प्रशस्त वाडा होता. दिंडीदरवाजातून आत शिरताना प्रथम एक पाय टाकला आणि नंतर दुसरा पाय आत घेतला म्हणजे आत येणाऱ्याची नजर सहजच वर उचलली जायची आणि माडीच्या पेशवाई थाटाच्या खिडकीत उभे राहून वाड्यात येणाऱ्याला मोकळ्या मनाने, 'या याऽ' म्हणारे नरहरपंत भावे दिसायचे. हा अगदी नित्याचा अनुभव होता. पण त्या दिवशी मात्र जर कोणी दिंडीतून माडीकडे दृष्टी टाकली असती तर हा अनुभव आला नसता अतिथी अभ्यागताला. त्याने अधिक चौकस नजरेने माडीचे अंतरंग शोधले असते तर आत खिडकीला लागूनच असलेल्या आराम खुर्चीवर बसलेले अस्वस्थचित्त नरहरपंत दिसले असते. त्यांच्या हातात कसला तरी कागद होता. आणि त्यांची दृष्टी एकटक समोरच्या भिंतीवर खिळून राहिली होती. इतक्यात–

–" इतकं काय आज अगदी गप्प गप्प असायचं ?" असा आवाज मागून आला. तरी ही दृष्टी अस्थिर झाली नाही. पुन्हा त्या आवाजाची नव्हे त्या घराची धनीण म्हणाली, " अगदी लक्षही नाही... विनूची आठवण झाली वाटतं ?... मी आई त्याची. पण अगदी पाषाणाचं मन करून सारे सहन करते आहे आपल्यासाठी... मुंबईला परीक्षेला जाण्याऐवजी काशीला गेला तो. आपल्याला पत्र आलं होतं. त्यानंतर काहीच कळलं नाही." त्या माउलीचा कंठ गहिवरून आला. पदर डोळ्याकडे गेला. तिची ती अवस्था पाहून नरहरपंतही धोतराच्या सोग्याने डोळे कोरडे करीत म्हणाले, "पाषाणालाही पाझर फुटलाच की–तो ब्रह्मचर्यपालनाची भाषा करायचा. तुम्ही काही विरोध केला नाहीत. एकदा तर प्रोत्साहन दिलंत मला आठवतंय. तुम्ही म्हणाला होता, " उत्तम गृहस्थाश्रम केला तर पितृऋण फिटते. ब्रह्मचर्य साधले तर चाळीस पिढ्यांचा उद्धार होतो." हेच सर्वोद्धाराचे, सर्वोदयाचे काम आरंभलं आहे त्यानं."

" कुठे हिमालयाकडे गेला आहे तो ? पत्र आलंय त्याचं ? " किती उतावीळपणाने त्या माउलीने विचारले.

" हिमालयाकडे नाही, हिमालयासारख्या एका थोर पुरुषाकडे गेला आहे तो. महात्माजींच्या आश्रमात गेला आहे तो." नरहरपंत शांतपणाने म्हणाले.

" तिथून त्याचं पत्र आलंय ? " विनूच्या आईने विचारले.

" त्याचं नाही. महात्माजींचं."

" महात्माजींचं पत्र ? आणि आपल्याला ? वाचा तरी लवकर." विनूच्या आईची ती उत्सुकता पाहून आणि स्वतःशी किंचितसे हसून नरहरपंत पत्र वाचू लागले.

" सप्रेम नमस्ते ... तुमचा विनोबा माझ्यापाशी आहे. तुमच्या

मुलाने एवढ्या कोवळ्या वयात जी समाधानी आणि आनंदी वृत्ती मिळविली आहे आणि जे वैराग्य संपादन केले आहे, तितके मिळवायला मला अनेक वर्षे कष्ट करावे लागले आहेत."

ते पत्र ऐकता ऐकताच विनूचे एक एक गुण विनूच्या आईला आठवू लागले.

गांधीजींनी लिहिल्याप्रमाणे खरोखरच कुठलीही कला म्हणा विद्या म्हणा साध्य करायला विनूला फारशी यातायात कधीच करावी लागत नसे. त्याच्या शाळेतल्या गुरुजींनी सांगितलेला एक प्रसंग त्यांना आठवला.

–गुरुजी वर्गात विद्यार्थ्यांना काहीतरी लिहून घ्यायला सांगत होते. गणितप्रेमी विनायकराव ते लिहून घेण्याऐवजी कसले तरी उदाहरण सोडवीत होते. गुरुजींच्या लक्षात हा प्रकार आला. विनूने टिपण लिहून घेतले नाही, हे त्यांनी जाणले होते. तरी ते मुद्दाम विनूला म्हणाले, "भावे, तू तुझे टिपण वाचून दाखव पाहू." विनायकराव सरळ उठले, त्यांनी आपली वही तोंडापुढे धरली आणि सारे टिपण घडाघडा अक्षरन् अक्षर म्हणून दाखविले.

गुरुजी म्हणाले होते, "बघू, तुझी वही!" आणि विनूने उत्तर दिले होते, "तुम्हांला नाही वाचता यायची ती वही."

गुरुजींनी वही बघितली. एक अक्षर नव्हते लिहिले त्या वहीवर. अशी विनूची स्मरणशक्ती मोठी तीव्र होती.

–काही न बोलता विनूच्या आई इतका वेळ गप्पच उभ्या राहिलेल्या पाहून नरहरपंतच परत बोलू लागले, "का? बोलत कां नाहीस? कसला एवढा गंभीर विचार करता विनूचा? त्याच्या भवितव्याचा?"

विचारसृष्टीतून माघारी येऊन विनूच्या आई म्हणाल्या " छे ! छे ! त्याच्या भवितव्याची मी कसली चिंता करते ? साऱ्या विश्वाची चिंता करणारा रामदास तो ! "

आणि तेवढ्यावरच तो पतिपत्नीसंवाद तुटला. भाव दाटून आले आणि शब्द पुसले गेले.

विनूच्या आईने म्हटल्याप्रमाणे खरोखर त्यांचा रामदास, त्यांचा विनू घर सोडून गेला होता. लग्नाच्या मांडवातून ठोसरांचा नारायण निघून गेला होता; तर भाव्यांचा विनायक विश्वविद्यालयाच्या परीक्षेच्या मांडवात प्रवेश करता करता निघून गेला होता, काशी-यात्रेला. दोन-तीन महिन्यांचा काशीनिवास झाला पण मनाला समाधान लाभेना. संस्कृत अध्ययन मनाजोगते झाले तरी आत्मज्ञान लाभेना. तिन्ही त्रिकाळ गंगास्नान, विश्वेश्वर दर्शन आणि घाटावर बसून मनन चिंतन करण्याचा साधकाचा मार्ग ह्या साधकाला काही मानवेना. जिथे नुसतीच विरक्ती तिथे ही आसक्ती असते. पण " बुडती हे जन न देखवे डोळा " अशी तळमळ आणि क्रियाशीलतेची ओढ जिथे असते तिथे हा क्रियाशून्यतेचा मार्ग योग्य वाटत नाही. बुद्धाला ज्याप्रमाणे अचानक एके दिवशी बोधिवृक्षाखाली ज्ञानप्रकाश लाभला त्याप्रमाणेच काशीतच एके दिवशी एक तेजस्वी ज्ञानसूर्य पहाण्याचे भाग्य विनायकाला लाभले.

कसली तरी सभा होती. सभास्थान श्रोत्यांनी फुलले होते. मध्य-भागी व्यासपीठावर एक कृश व्यक्ती उभी होती. त्या व्यक्तीचा वेश जितका साधा होता, तितकेच त्याचे व्यक्तिमत्व प्रभावी होते. त्या व्यक्तीच्या मुखातून जणू वेदव्यासांची वाणीच बाहेर पडत होती. सारी सभा तटस्थ होती चित्रासारखी. विनायकसुद्धा अगदी एकचित्त होऊन ती वाणी ऐकत होता. जनसेवेची पवित्रतम उपनिषदेच जणू

तो श्रवण करीत होता. त्या वातावरणात व्यासपीठावरील त्या दरिद्री नारायणाची वाणी अगदी घुमून राहिली होती–"सुखविलास करायला आपणाला परवानगी नाही. ही चोरी आहे. आपण जनतेचे विश्वस्त आहोत." ह्या गांधींच्या शब्दांनी, होय महात्मा गांधीच होते ते,– विनायकाच्या मनाची पकड घेतली. स्वत:पुरते आत्मज्ञान मिळवून तृप्त व्हावे अशी त्याची इच्छा नव्हती. जरूर होती ती प्रत्यक्ष निष्काम कर्मयोग आचरणाऱ्या आदर्शाची. गांधींच्या व्यक्तिमत्वामध्ये त्याला हा आदर्श दिसला. मन गांधींच्याकडे ओढ घेऊ लागले. त्यांच्या मनात विविध शंका येत. निरनिराळे प्रश्न त्यांच्या डोळ्यापुढे उभे रहात. ज्यांना प्रत्यक्ष कार्य करावयाचे असते, त्यांच्या मनाची ही अशीच स्थिती होते. आणि त्यांच्या शंकांचे निरसन होते. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळतात तीही अशा क्रियाशील माणसाकडूनच. विनायकाने गांधीजींना पत्रे लिहिली आणि त्यांच्यापुढे आपल्या शंका मांडल्या. पहिल्या दोन पत्रांची उत्तरे गांधीजींनी मोठ्या तत्परतेने पाठविलीही. पण विनायकाच्या शंका संपेनात तेव्हा गांधीजींनी त्यांना कळविले, "आपण समक्ष आश्रमात यावे. अधिक खुलासेवार निरसन करता येईल आपल्या शंकांचे किंवा कदाचित् करावेही लागणार नाही. आश्रम जीवनच आपल्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे देईल."

विनायकाला तरी हेच पाहिजे होते. अवघ्या तीन साडेतीन महिन्यात काशी सुटली. विनायक महात्माजींच्या साबरमतीच्या आश्रमात आला. त्या आश्रमजीवनाने विनायकाचे प्रश्न सुटत चालले आणि विनायकाच्या आगमनाने आश्रमाचेही प्रश्न सुटण्यास मदत झाली. कर्मकुशलांच्या व्यक्तिमत्वाचा हा मोठा प्रभाव असतो.

आश्रमजीवनात सेवेला महत्त्व असते. स्वावलंबनाला अग्रेसरत्व असते. अहंकार आणि महत्त्वाकांक्षा ह्या बंधुभगिनींना तिथं अजिबात

स्थान नसते. आणि विनायक जन्माला आला होता तोच मुळी ह्या दोन्ही गोष्टी विसरून. त्यामुळे आश्रमवासीयांना त्याच्याबद्दल आत्मीयता वाटत असे. आस्वाद म्हणजे सुखाची पहिली वहिली ओळख, अपरिग्रह म्हणजे काही न घेणे, तसेच स्वदेशी, सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य इत्यादी व्रतांचे त्याने अत्यंत श्रद्धापूर्वक पालन केले होते. त्यामुळे त्याच्या रूपाने मूर्तिमंत आश्रमजीवनाचा आदर्शच आश्रमवासीयांच्या डोळ्यापुढे उभा राहिला होता. आश्रमवासीच काय पण खुद्द महात्मा गांधीसुद्धा तसेच मानत. ते एकदा म्हणालेसुद्धा, " विनोबा, तुझे प्रेम आणि तुझे चारित्र्य मला मोहात बुडवून टाकते. तू मला पित्याचे ठिकाणी मानले आहेस. तुझे पितृपद सांभाळण्यासाठी अंगी पात्रता आणण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीन. सत्यप्रिय पित्याने आपल्यापेक्षा अधिक सत्यप्रिय पुत्र निर्माण केला पाहिजे– पण चुकून जर मी हिरण्यकश्यपू ठरलो तर भक्त प्रल्हाद होण्याला तू चुकू नकोस. "

गांधीजींनी विनायकाला बिनोबा म्हटले. विनायक आश्रमातील विद्यार्थ्यांना विविध ज्ञान देत असे, गीतेवर प्रवचन करीत असे. सर्व आश्रमवासी त्याला आचार्य म्हणत. विनायक भावे आता आचार्य विनोबा भावे झाला.

बडोद्यात इन्फ्लुएन्झाची साथ पसरली होती. गृहपाश तोडूनच विनोबा बाहेर पडलेले होते. महात्माजींनी त्यांना बडोद्याला पाठविले. सेवेचा श्रीगणेशा घरातच गिरविला जातो. घर सोडून जी सेवा तो देखावाच. मातापित्यांच्या सेवेचे पुण्य विनोबांना लाभावयाचे होते. ते बडोद्याला गेले. मातापित्यांची ती अखेरचीच भेट ठरली. आपला विनू आचार्य विनोबा भावे झालेला पाहून केवढी धन्यता वाटली असेल त्या मातेला. " मला गीतेच्या ओटीत घालून ती गेली. " ह्या

शब्दांनी त्यांनी आपल्या मनाचे सांत्वन केले. त्यांचे आईच्या खालोखाल गीतेवर प्रेम होते. "आईच्या दुधावर मी पोसलो आहे. त्यापेक्षा गीतेच्या दुधावर अधिक पोसलो आहे," असे ते म्हणतात. त्यांची ही गीतेवरची श्रद्धा पाहून त्यांची आई नेहमी म्हणावयाची, "बाबा, तुझी ती गीता संस्कृतमध्ये. मला कशी समजणार ती. माझ्यासाठी मराठीत तरी सांग ती." आईचे हे शब्द आता त्यांना आठवले. महाराष्ट्रातल्या अशा कितीतरी माता ह्या गीतामृतासाठी–आसुसलेल्या असतील, हा विचार त्यांच्या मनात आला. ह्या विचाराने प्रेरणा मिळाली आणि 'गीताई'चा जन्म झाला. गीता म्हणजे कर्मयोगाची शिकवण. प्रत्येकाला ह्या शिकवणुकीची जरूरी आहे. गीतेतील श्लोकांचे समश्लोकी सुगम भाषांतर आचार्यांनी केले. तीच गीताई. लक्षावधी आबालवृद्धांना ती आईप्रमाणे वाटते. ज्याला त्याला त्याच्या कर्माची, कर्ममार्गाची ओळखण करून देण्याचे कठिण कार्य आचार्यांनी कुशलतेने केले आहे.

गीताधर्माचा प्रचार नुसत्या श्रवणाने किंवा प्रवचनाने होणार नाही कारण गीता हे बोलाचे शास्त्र नाही, असे ते मानत. आणि म्हणूनच ते आपल्या प्रवचनातही सांगत, "गीता कुरुक्षेत्रात सांगितली आहे. संस्कृतात कुरू म्हणजे कर्म असा अर्थ आहे. कुरुक्षेत्र म्हणजे कर्माची भूमी. या कर्माच्या भूमिकेवर गीता सांगितली आहे." वर्ध्याच्या आश्रमाची सूत्रे जेव्हां त्यांनी हातात घेतली तेव्हांसुद्धा त्यांची हीच विचारसरणी होती. गीतेतील कर्मयोग त्यांनी पूर्णतया आचरणात आणला होता. आश्रमातील प्रत्येक विद्यार्थ्याला दळण, कांडण, पिंजण, शेती आणि बौद्धिक काम करावे लागे. आचार्यांच्या योजकतेमुळे आश्रमाला गुरुकुलाचे स्वरूप प्राप्त झाले होते. आचार्यांची ही कर्मकुशलता गांधीजी जाणत होते. असामान्य बुद्धिमत्ता, प्रखर

वैराग्य हे त्यांचे असामान्य गुणच आश्रमात आवश्यक ती कठोरता, शिस्तबद्धता आणू शकतील, असा गांधीजींचा विश्वास होता म्हणूनच आश्रमाची सूत्रे त्यांनी आचार्यांच्या हाती दिली होती.

आचार्य स्वत: अत्यंत शिस्तबद्ध जीवन जगत होते. संयमन, विशुद्ध चारित्र्य, अस्तेय, अहिंसा, सत्यप्रियता असे अनेक तेजस्वी पैलू त्यांच्या जीवनाचे आहेत, ते इतरांना प्रकाश देण्यासाठीच. ज्यांना प्रकाश द्यावयाचा ते अंधारात आहेत. अज्ञानाच्या, दुबळेपणाच्या, हे ते जाणत. दुसऱ्याच्या दुबळेपणाचा ते तिरस्कार करीत नसत. तो घालविण्याचा मायेचा प्रयत्न ते करीत.

आश्रमात एक कसबी विणकर होता. त्याला विडी ओढण्याचे व्यसन होते. आश्रम जीवनात व्यसनाला प्रवेश नाही. मोकळेपणाने विडी ओढता येत नसे. पण तल्लफ थोडीच स्वस्थ बसू देणार. थोडंसं काम झालं की लहर यायचीच. मग काम अगदी सुचेनासं व्हायचं. मग आसपास कोणी नाही असे पाहून तो विणकर जरा आडोशाला जायचा आणि मग चार दोन झुरके मारले की मग त्याला कसे बरे वाटायचे. नवा जोर यायचा कामाला. ही गोष्ट लक्षात आली होती आचार्यांच्या.

दुपारची वेळ होती. तीन साडेतीनचा सुमार असावा. नेहमीप्रमाणे विणकराचे काम चालले. आश्रमाच्या सर्व विभागात आचार्यांची रोजची फेरी असायची. त्याप्रमाणे ह्या विणकर विभागातही त्या दिवशी ते आले होते. पण रोजच्याप्रमाणे नुसती विहंगम दृष्टी टाकून ते तिथून निघून गेले नाहीत. एक मृगाजिन खाली पसरून ते त्यावर बसले आणि गीता पठनास त्यांनी सुरुवात केली. मधून मधून त्यांचे लक्ष मागाकडे जात होते. दहा मिनिटे झाली. पंधरा मिनिटे झाली. अर्धा तास होऊन गेला. त्या विणकराची चुळबूळ सुरू झाली. जरा गती मंदावली कामाची. मागाचे संगीत कानांना बेसूर, बेताल

वाटू लागले. "मनाचा कोंडमारा असेच बेसूर जीवन संगीत निर्माण करणार" एक विचार येऊन गेला आचार्यांच्या मनात. त्यांनी गीतेला वंदन करून गीतेचे पुस्तक मिटवून आणि हरिणाजिन गुंडाळून काखेत घेतले. ते शांतपणाने विणकरापाशी गेले. प्रेमाने त्याच्या पाठीवर हात फिरवून ते त्याला म्हणाले, "बरेच काम झालं. आता थोडी विश्रांती घे."

त्याने मागावरचा हात काढला. निढळाचा घाम बोटाने निथळला आणि खाली बसला तो. आचार्यांच्याकडे त्याने पाहिले आणि त्याचे डोळे चमकले. आनंदाने आणि आश्चर्याने. माणसाला जे पाहिजे असते ते त्याला मिळाले म्हणजे त्याला जो आनंद होतो, तो आनंद त्याच्या नेत्रातून ओसंडत होता; पण दैव असे लहरी असते की, ते हा आनंद माणसाला उपभोगू देत नाही. आणि म्हणूनच आचार्यांनी पुढें केलेल्या विड्या पाहून आश्चर्यातिशयाने तो अगदी गोंधळून गेला. त्याला काही सुचेना. बळेच त्याच्या हातात विड्यांचे बंडल ठेवून आचार्य म्हणाले, "घे, संकोच करू नकोस. मन मारू नकोस."

तीन-चार तासाचे काम झाले म्हणजे विश्रांती घेण्याची, विडी ओढण्याची आचार्यांनी त्याला कायमची परवानगी दिली. इतरांना मोठे आश्चर्य वाटले. आचार्यांनी त्याला व्यसनापासून परावृत्त करायचे सोडून त्याला विडी ओढायची परवानगी दिलीच कशी? हाच प्रश्न ज्याच्या त्याच्या मनात थैमान घालत होता. हा कोणता आदर्श! असे आश्रमवासीयांना वाटत होते. आचार्य त्यांना म्हणाले, "त्याला विडी ओढायची बंदी केल्याने त्याचे व्यसन तर सुटणार नाहीच. शिवाय तो खोटे बोलणार, चोरी करणार, कदाचित् तो आपल्या कठोर शिस्तीला कंटाळून कामही सोडायचा. म्हणजे त्याच्या कलेचा आपणांस फायदा मिळणार नाही. व्यवहारही जमणार

नाही, आदर्शही साधणार नाही... दुसरे कोणी व्यसनाच्या अधीन नाहीत. आपणच एकटे आश्रमात विडी ओढतो, हे त्याच्या लक्षात येऊन त्याची त्यालाच लाज वाटून तो आज ना उद्या निश्चितच व्यसनमुक्त होईल, ही खरी मुक्ती. व्यवहाराकडे पाठ फिरवून चालत नाही."

आचार्यांचे हे साधे विचार सर्वांना पटले. ज्याला आदर्श आणि व्यवहार यांची सांगड साधून प्रत्यक्ष कार्य करावयाचे असते त्यालाच कुशलतेने हा असा लोकसंग्रह करता येतो. माणसे समजून घेणे, सांभाळून घेणे आणि त्यांच्याच कलाने इष्ट त्या वळणावर आणणे, ही आचार्यांची कार्यकुशलता मोठी अप्रतीम होती.

ह्या कुशलतेमागे त्यांची निष्ठा ही प्रेरक शक्ती होती. सारी जीवने सुखसंपन्न झाली पाहिजेत, ही त्यांची तळमळ होती. ह्या तळमळीने प्रत्येक कार्य ते करीत असल्याने ते यशस्वी होत असे. हीच त्यांची कला होती. एकदा त्यांच्या परिचयाच्या एका रसिक कला-प्रेमी माणसाने त्यांना एक सुन्दर निसर्गचित्र दाखविले. ते त्या रसिक माणसाने पन्नास रुपयांस विकत घेतले होते. आचार्यांनी त्या माणसाच्या समाधानासाठी थोडेसे ते चित्र पाहिल्यासारखे दाखविले आणि त्याला म्हटले, "चला, माझे कलामंदिर तुम्हांला दाखवितो." तो मनुष्य आचार्यांच्या मागोमाग चालू लागला. लवकरच ते एका घाणेरड्या हरिजन वस्तीजवळ आले. तो रसिक म्हणाला, "इथं कुठे आणलंत मला ?"

"हे खरं जीवन आहे." आचार्य गंभीर होऊन म्हणाले, "ह्या जीवनाकडे पाठ फिरविणारी कोणतीही कला मला मान्य नाही. हे जीवन सुन्दर करणारी कला मला प्रिय आहे. ह्या चित्रासाठी तुम्ही पन्नास रुपये खर्च केलेत... त्या पैशांचा विनियोग इथे झाला असता...

ह्या हरिजन बालकांना दूध मिळालं असतं. त्यांच्या गालावर गुलाबी रंग चढला असता. तुमच्या ह्या निर्जीव चित्रातल्या गुलाबी रंगापेक्षा तो गुलाबी रंग कितीतरी मोहक वाटला असता मला."

ही नुसती आचार्यांची विचारसरणी नव्हती. विचारापेक्षा आचारास ते महत्त्व देत. ते आदर्श विचार प्रत्यक्ष आचारात ते आणत. हरिजनांची सेवा हा त्यांचा नित्य नेम होता. ते म्हणत, " जो सर्वांत मागासलेला आहे तो आधी पुढे येऊ दे." हरिजनांसाठी महात्माजींनी उपवास केला होता तेव्हा तर ते वर्ध्याजवळच्या नालवाडी गावामध्ये हरिजन वस्तीतच जाऊन राहिले होते. " अस्पृश्यांना दूर ठेवून तुमचा उद्धार होणार नाही ?" असे ते स्पृश्यांना सांगत.

" देव सर्वांचाच आहे, पात्रता असली की तो भेटतोच. त्यासाठी मंदिर प्रवेशाचा वाद कशाला ? चोखा मेळा ह्याला देव नाही का भेटला ? त्याला आम्ही श्रेष्ठ संत मानतोच की नाही ? " असा युक्तिवाद स्पृश्य करू लागले म्हणजे आचार्य म्हणत, " तुमच्या मंदिरातून यायला हरिजनांनी चोखा मेळ्याच्या योग्यतेचे व्हायला हवे. आणि तुम्ही ?" असे आचार्य म्हणाले म्हणजे स्पृश्यांचा युक्तिवाद फोल ठरे. नाही तरी जिथे कार्याचा भरीवपणा नसतो तिथे शब्दांची फोलपटेच सापडायची. नालवाडीला जेव्हां ते रहात होते तेव्हां तिथल्या हरिजनवस्तीची सुधारणा तर त्यांनी केलीच पण आसपासची खेडीही त्यांनी उजळली. त्या हरिजनांना आचार्य देवतुल्य वाटत. त्यांचे आपल्यावरचे प्रेम, भक्ती पाहून ते हरिजनांना म्हणत, " तुमचे प्रेम आणि भक्ती माझ्या डोळ्यात अश्रू आणते. "

आचार्यांचे जे विचार असत तेच ते बोलून दाखवत एवढेच नव्हे. तर ते विचार आचारातही ते तत्क्षणी आणत. त्यांचे विचार, त्यांचे उच्चार आणि त्यांचे आचार यामध्ये फार थोडे अंतर असे. हाच

त्यांचा फार मोठा मोठेपणा होता. ते वाचीवीर नव्हते कृतीवीर होते. इतरांनीही तसे असावे, असे त्यांना वाटे. कामाबद्दल कोणी अप्रीती दाखविली तर ते त्यांना आवडत नसे. विविध मार्गांनी ते अशा लोकांना कार्यप्रवृत्त करीत असत. वर्ध्याच्या आश्रमात जी शिकवण ते आश्रम वासींना देत ती शिकवण तुरुंगातील कैद्यांनाही त्यांनी दिली. तुरुंगात त्यांनी गीतेवर प्रवचने दिली. राजबंदी असताना अकोल्याच्या तुरुंगात एक मोठा मजेदार प्रसंग घडला. राजबंद्यांनी काम करायचे एकदा नाकारले. ही गोष्ट आचार्यांना पसंत पडली नाही. त्यांनी साऱ्या कैद्यांना एकत्र जमविले. ते त्या कैद्यांना म्हणाले, " आपण आपले काम केले पाहिजे, ही भगवन्ताची शिकवण विसरलात तुम्ही. काम न करता अन्नग्रहण करणे हे एक पाप आहे. काम करावयाची सक्ती म्हणजे एक ईश्वरी प्रसादच समजला पाहिजे. तुम्हांला शारीरिक श्रमाची सवय व्हावी म्हणून जणूकाही ही सुवर्ण संधी प्राप्त झाली आहे."

शब्दांनी आपले काम बजावले आणि सारे बंदी काम करू लागले. तुरुंगावरच्या अधिकाऱ्यांना केवढी धन्यता वाटली. त्यांच्या शिव्यांनी आणि फटक्यांनी जे झाले नसते ते आचार्यांच्या शब्दांनी केले. ते निर्मल अंत:करणाचे बोल होते. कैदी तुरुंगावरच्या अधिकाऱ्यांना वाईट म्हणत, त्यांच्यावर रागवत. आचार्य त्यांना सांगत, " दुसऱ्यावर रागवू नये. क्रोध स्वत:साठी आहे. दुसऱ्याचे दोष पाहून त्याची करुणा करावी. स्वत:चे दोष असतील तर स्वत:वर रागवावे. क्रोध चांगला नाही. क्रोधाने नीट ज्ञान होत नाही. तुम्ही जेलरवर रागावता. पण जेलर अगदीच वाईट नाही. तुलसीरामायणाला त्याने नमस्कार केला."

कैदीही शांतपणे वागू लागले, काम करू लागले. अधिकाऱ्यांनीही कठोरपणा टाकला. तुरुंगातही आचार्यांनी विधायक कार्ये करून घेतली. ही त्यांची कर्मकुशलता आणि हाच त्यांचा योग.

' योगः कर्मसु कौशलम् । '

हा त्यांचा योग महात्माजी उत्तम प्रकारे जाणत होते म्हणून तर त्यांनी १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही म्हणून त्यांचीच निवड केली. ते खरेखुरे सत्याग्रही होते. सत्याचा आग्रह धरणारे होते. आणि आपल्या प्रेमाच्या आग्रहाने विरोधकालाही ते जिंकीत असत. सतत पुढे पाऊल, हे क्रियाशीलतेचे एक महत्त्वाचे गमक आहे. आचार्यांच्या जीवनात हा विकास आपणास सतत पहावयास मिळतो. " शक्तिगृहात वीज नुसती उत्पन्न होऊन भागत नाही. ती लहान मोठ्या तारांनी सर्वत्र पोचवावी लागते. तेव्हां सर्वत्र प्रकाश होतो. अंधार दूर होतो. " असे आचार्य नेहमी म्हणतात. हे प्रकाश देण्याचे आणि अंधार दूर करण्याचे कार्य ते सतत करीत आले आहेत. आणि ह्याच एका हेतूने गांधीजींच्या मृत्यूनंतर सेवाग्राम येथे सर्वोदय समाजाची स्थापना झाली. ह्या समाजाचे चैतन्य म्हणजे आचार्य विनोबा भावे. सर्वोदय समाजाचे शिवरामपल्ली ह्या गावी संमेलन भरावयाचे होते. काही अडचणीमुळे आचार्य प्रथम ह्या संमेलनाला उपस्थित राहू शकत नव्हते. पण आचार्य नाही तर संमेलनच नको असा कार्यकर्त्यांच्यामध्ये सूर निघाला. तेव्हां आचार्य सर्व अडचणी बाजूला सारून संमेलनाला उपस्थित राहिले. ते ह्या संमेलनाला उपस्थित रहाण्यासाठी पायी गेले होते.

त्या संमेलनप्रसंगी त्या सर्वोदय कार्यकर्त्यांना त्यांनी कर्मयोगच सांगितला. ते म्हणाले,

> " शारीरिक कष्टाने तुम्ही शेती करा. पैशाच्या विनिमयाशिवाय संस्था चालवायला शिका. खेड्यांच्या सेवेकरिता शांतिसेना स्थापा. सूत काता. सफाईचे काम अंगावर घेऊन भंग्याचा व्यवसायच नष्ट करा आणि जीवन विशुद्ध करा. "

सर्व सुखी व्हावेत, सर्वांचे कल्याण व्हावे, हीच एक कल्पना ह्या सर्वोदय समाजाच्या कार्यामागे होती. शांततेच्या, अहिंसेच्या मार्गाने सर्वांचे सर्व प्रश्न सुटावेत, अन्याय दूर व्हावा आणि सारा समाज सुखी व्हावा अशी आचार्यांसारख्या कार्यकर्त्यांची इच्छा होती. पण अंधारातून चालताना डोळसांनादेखील ठेचा लागतात. अशीच काही स्थिती झाली. आणि विधायक मार्गाऐवजी विध्वंसक मार्गाकडे जनता वळली. तिने कम्युनिस्टांचे नेतृत्व स्वीकारले. आणि जमीनदार विरुद्ध शेतकरी ह्या लढ्याने उग्र स्वरूप धारण केले.

जमिनीची मालकी मूठभर जमीनदाराकडे होती. शेत जमिनीवर शेकड्याने मजूर राबत होते. त्यांच्या कष्टाने येणारे मोत्याचे पीक जमीनदाराच्या घशात पडत होते. मजूर मात्र पिळले जात होते. अर्धपोटी राबावे लागत होते त्यांना. काहींच्या मालकीची जमीन होती. पण ती किती ? अगदी क्वचित एखादा लहानसा तुकडा. त्याचे, त्याच्या कुटुंबाचे त्यावर भागणे अशक्य असे. त्यातही सरकार, सावकार हे सारे होतेच. त्यामुळे त्या बिचाऱ्यांना अठरा विश्वे दारिद्र्याची कायमचीच सोबत लाभली होती. सहनशक्तीलाही सीमा असते. ज्यांनी वर्षानुवर्षे सतत अन्याय सहन केला होता त्यांना शांतता, अहिंसा ही तत्त्वे सुचावीत तरी कशी? अशांततेने त्यांच्या डोक्यात थैमान चालवले होते. त्यांना कम्युनिस्टांनी हाताशी धरले. आता अत्याचाराचे राज्य झाले तेलंगण राज्यात. जाळपोळ, लुटालूट, खून, मारामाऱ्या यांचे भीषण तांडव सुरू झाले. जमीनदारांच्या जमिनी जबरदस्तीने घेऊन त्या भूमिहीनांना देण्याची मोहीम कम्युनिस्टांनी सुरू केली. ह्या जमिनी मिळण्याचा सोपा मार्ग भूमिहीनांनाही पसंत पडला. तेही ह्या हिंसाचारात सामील झाले. ह्या हत्याकांडात तीन हजार लोकांचे खून पाडण्यांत आले. आठ कोटींच्या मालमत्तेचा विध्वंस झाला. अत्याचाराला सीमा राहिली नाही.

नव्याने स्थापन झालेल्या भारतीय लोकशाहीला हे मोठे आव्हानच होते. आपलेच दात आणि आपलेच ओठ अशी स्थिती झाली होती. अल्पसंख्य जमीनदाराकडून बहुसंख्य शेतमजूर पिळले जात होते. हे सत्यच होते. ह्या अन्यायाने चिडलेले मजूर हिंसेच्या मार्गाने सर्वनाश करीत होते. त्यांचेही कृत्य काही क्षम्य नव्हते. त्यांना शासन करू नये तर हा अत्याचार कसा थांववावा ? आणि हा अत्याचार थांबवावयाचा तर जमीनदाराकडून होणारे रक्तशोषण कसे थांबवायचे ? विषमता नष्ट कशी करायची ? सारेच यक्ष प्रश्न होते लोकशाही सरकारपुढे. ते सोडविणारा धर्मराज मात्र कुणी पुढे येत नव्हता. जे आले ते हंगामी लष्करी राजवटीचे आडदांड अधिकारी. त्यांनी लाठी हल्ला, अश्रुधूर, गोळीबार असे आपले ठरलेले उपाय अंमलात आणले. पण ह्यामुळे आग विझली नाही. आगीत तेल ओतल्यासारखे मात्र झाले.

दांडग्या मुलाला समजून घेऊन त्याला शांत करणाऱ्या मातेचे कौशल्य या प्रसंगी आवश्यक होते.

सामान्य लोक अगदी अगतिक झाले होते. स्वस्थ बसावे तर अन्नान्नदशा वर्षानुवर्षे चाललेलीच होती. हिंसक दंगलीचा मार्ग स्वीकारला म्हणजे काही सुखाचे ताट ताबडतोब पुढे वाढून येते, असेही नाही. जो दुसऱ्याची घरे पेटवायला निघाला त्याचे स्वतःचेही हात भाजल्याशिवाय रहात नाहीत. तरीही नैराश्याने बेफाम झालेली माणसे चिथविली जात होती. त्यांच्याकडून घरे चेतविली जात होती. धान्याचे साठे जाळून भस्मसात केले जात होते. रात्र अशा हलकल्लोळात जागून काढली जात होती. आणि दिवस कायद्याच्या बडग्यापासून वाचण्यासाठी दारे खिडक्या लावून लपून घालविला जात होते. रावणराज्य थैमान घालीत होते तेलंगणात. आणि अशा वेळेस—

**'रघुपति राघव राजाराम**
**पतित पावन सीताराम।'**

असे रामरायाचे स्मरण करीत पवनारचे संत आचार्य विनोबा भावे तेलंगणात पदयात्रेला निघाले. रामनवमीचा शुभ दिवस होता तो. भीतिग्रस्तांना, "अजि राम जन्मला" हा दिलासा देणारा मंगल दिवस होता तो. सर्वोदय संमेलनासाठी आचार्य शिवरामपल्लीला आले होते. तेथे एका मागून एक तेलंगणातील कम्युनिस्टांच्या अत्याचाराच्या वार्ता येऊन धडकत होत्या. कम्युनिस्टांची भयंकर कृत्ये कम्युनिस्टां-विषयी सर्वसामान्यांच्या मनामध्ये मोठी अप्रीती निर्माण करीत होती. "पण कम्युनिस्ट झाले तरी माणसेच आहेत, ते राक्षस नव्हेत." या दृष्टीने पहाणारे व कम्युनिस्टांबद्दलही समभाव राखणारे आचार्य होते. ते श्रीमंतांना सांगत, " गरीब व श्रीमंत यांच्यात लढाया होऊ नयेत. परंतु त्या व्हायला नको असतील, तर तुम्ही श्रीमंतांनी त्याग करायला हवा." ही समतेची भावना धरून ते तेलंगणातील खेड्यात हिंडले. प्रत्येक ठिकाणी तेथील जमीनदार वर्गापुढे भीषण विषमतेचे करुण चित्र त्यांनी रेखाटले आणि दीनदलितांच्याविषयी त्यांच्या मनात सहानुभूती निर्माण केली. " या गावात काहींच्या जवळ हजारो एकर जमीन तर काहींच्याजवळ एक एकरही नाही. तीन हजार एकर जमीन नव्वद कुटुंबांच्या मालकीची तर सहाशे कुटुंबे बेघर. " असे किती तरी बोलके आकडे त्यांनी लोकांच्यापुढे ठेवले. त्यांनी लोकांच्या भावनेला आवाहन केले. ते म्हणाले,

> " ह्या चळवळीचे मूळ सूत्रधार कम्युनिस्ट असले तरी कारण श्रीमंत आहेत. आपण सुग्रास भोजन करत असताना शेजारी बसलेल्या क्षुधार्ताकडे आपण ढुंकूनही बघितले नाही आणि मग त्याने आपल्यापुढचे ताट ओढून घेतले तर तो त्याचा दोष नाही. आपल्या कठोरतेचा हा परिणाम आहे. त्याने ताट ओढतस्तवर

'आपण वाटच पाहू नये. आपण होऊन सारखी वाटणी
करावी. दोघेही सुखी रहातील. जमिनीची अन्याय्य
वाटणी शांततेच्या मार्गाने आता आपण नाहीशी करू या."

आचार्यांच्या ह्या आवाहनाने लोकांच्या अंतःकरणातील भाव-सागर हेलावला गेला. त्यांच्या कानांवर पुन्हा आचार्यांचे पुढील शब्द आले –

"सरकारकडे न जाता आपणासच काही
करता येणार नाही का ? एखादा जमीन-
मालक जमिनीची देणगी द्यायला तयार
होणार नाही का ? भूदान देणार नाही का ? "

आणि शांत गंभीर झालेल्या त्या जनसागरावर एक अभूतपूर्व लाट उसळली. एक रेड्डी नावाचे गृहस्थ उठून उभे राहिले. त्यांच्याकडे सर्वांच्या नजरा लागल्या. ते गृहस्थ म्हणाले, "मी माझी शंभर एकर जमीन ह्या परम पवित्र कार्यासाठी आत्ताच्या आत्ता देत आहे."

आचार्यांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. केवढी धन्यता वाटली त्यांना. हरिश्चंद्र, रघू, कर्ण, हर्ष ह्यांची जीवने अगदीच व्यर्थ ठरली नाहीत. जगाच्या इतिहासात अभिनव अशी ही घटना त्या पोचमपल्ली गावात घडली. लोकांना सुखी करण्याच्या ईश्वरी कार्याचा एक अभिनव मार्ग आचार्यांना सापडला. त्या मार्गानेच ते आजतागायत जात आहेत.


सरकारी कायद्याने जी शांतता प्रस्थापित होऊ शकली नाही, ती शांतता आचार्यांच्या मार्गाने प्रस्थापित झाली. तेहतीस लाख एकरा-पेक्षा जास्त जमीन त्यांनी भूमिहीनांना मिळवून दिली. कम्युनिस्टांच्या जबरदस्तीच्या मार्गाने हे स्वप्न कधीच साकार झाले नसते.जमिनीच्या फेरवाटणीची ही क्रान्तीच आचार्यांनी घडवून आणली. आणि ही

क्रान्ती केवळ शान्ततेच्या, अहिंसेच्या आणि प्रेमाच्या मार्गाने त्यांनी घडवून आणली.

अमेरिकेतील वृत्तपत्रांनी "भूमिवितरण करणारा परमेश्वर" असा आचार्यांचा यथार्थ गौरव केला.

हे देवत्व त्यांना कुठल्या योगमार्गाने मिळाले? त्यांचा योग एकच. त्यांची कर्मकुशलता. त्यांचे हे यश पाहिले म्हणजे भगवंताचे वचन स्मरते.

'योगः कर्मसु कौशलम्।'



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 12670 मो दि ..........
वि. ......

IRBK-0112810

योगः ... ळम्।